
वसंत दांडेकर
अपूर्व देश-
चीन



अपूर्व देश-चीन हे पुस्तक अपूर्व देश या सिरीजमधील दुसरे पुस्तक आहे. हे पुस्तक वाचण्यापुर्वी याचा आधीचा भाग अपूर्व देश-जपान वाचण्यासाठी खालील लिंक वापरा

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/apurv_desh__japan_vasant_dandekar.pdf

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

अपूर्व देश- चीन

(प्रवासवर्णन)

लेखक : वसंत दांडेकर

अपूर्व देश- चीन

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

अपूर्व देश- चीन

लेखक :   वसंत दांडेकर

सम्पर्क- ई मेल -- dandekarv@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते. लेखक अमेरिकेतील असल्यामुळे ही केस अमेरिकेतील कोर्टामध्ये होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३१ मार्च २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अपूर्व देश

चीनः

लेखकः

वसंत दांडेकर

वसंत दांडेकर

जन्म : मुंबई, दादर शिवाजी पार्क.

गेले चाळीस वर्षे अमेरिकेत स्थायिक.

व्यवसायाने मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल इंजिनियर.

आता निवृत्त झालो आहे.

काल्पनिक साहित्यापेक्षा वस्तू-स्थितीवर आधारित साहित्य वाचायला आवडतं.

थोर लोकांची चरित्र वाचायला आवडतात.

हस्तकलेची आवड आहे.

प्रवास करणे करणे, फोटोग्राफी हे छंद आहेत.

काही कविता लिहिल्या आहेत.

हे दुसरं पुस्तक प्रकाशित होत आहे.

आगामी : तिबेट

ताई आणि बाबूजी दांडेकर ह्यांना

सर्मपण

ज्यांना प्रवासाची आवड आहे

त्यांना हा मानाचा मुजरा

अनुक्रम

भाग	विभाग	उप विभाग	पृष्ठ क्रमांक
भाग ६	ओसाका – चीन		
भाग ७	चीन		१०
		बेइजींग	१३
		चीनची भिंतः	१८
		हुतोंगः	२४
		तिआनानमेन चौक	३७
		फॅारबिडन सिटी	४४
		टेंम्पल ऑफ हेवन	७१
		बर्ड नेस्ट	७७
भाग ८	क्षिॲनः		८७
		वाईल्ड गूस पॅगोडा	८९
		व्हाशिंग गरम पाण्याचे झरे	९६
		टेराकोटा वॅारियर्स	१०१
भाग ९	चेंगडूः		१११
		पांडा रिसर्च सेंटर	११४
		यलो ड्रॅगन	१२०
		डु फू कॉटेज	१२३
		डुज्यानयांग धरण	१२६

अपूर्व देश

चीनः

चीनः

चीनला जाण्याचे ठरवल्या पासून माझ्या मनात संभ्रमावस्था होती. मी मुख्यत्वे करून दोन गोष्टींबद्दल साशंक होतो. एक म्हणजे आम्हास खाण्यास कसे मिळेल, कारण चीनी लोक काहीही खातात असे ऐकले होते व अनुभवले होते, दुसरी शंका चीन सरकारच्या उद्दाम आणि दडपशाहीच्या कारभाराबद्दल होती. त्यांच्या कारभाराबद्दल बरेच ऐकून होतो. त्यामुळे आम्हाला कशी वागणूक मिळेल ह्या बद्दल साशंक होतो. परिस्थितीशी मिळतेजुळते घ्यायचे, आपला मराठी बाणा घरी ठेवायचा, हुज्जत घालायची नाही तशीच वेळ आली तर दहा आकडे मोजायचे. हा विचार करतो आहे तो पर्यंत जेवण आले. जेवण मला अगदीच बेचव लागले. खरे म्हणजे जेवणाच्या व खाण्याच्या बाबतीत मी अत्यंत साधा माणूस आहे. भूक लागली की समोर खाण्याजोगे काही असेल तर चालते. (वर्षाला हे वरदानच आहे). त्यामुळे मला शक्यतो जेवण आवडले नाही किंवा बेचव लागले असे होत नाही.

माझ्या माहिती प्रमाणे आमचे विमान कोठेही न थांबता थेट बेइजींगला जाणार होते. पण ५ वाजून ३५ मिनिटांनी आमचे विमान यानटाइ येथे उतरले. विमानात चीनी भाषेत काहीतरी घोषणा केली गेली पण आम्हाला काहीच समजले नाही. आम्हाला पुढे बेइजींगला जायचे असल्यामुळे आम्ही विमानात बसून राहीलो. पण नंतर बघितले तर सर्वच प्रवासी उतरत होते. आमच्या शेजारी एक युरोप मधून आलेली स्त्री बसलेली होती, तिला पण बेइजींगला जायचे होते. तिने आम्हाला विचारले की आपण पण उतरायचे आहे का? मी तिला नाही म्हणून सांगितले. पण तिचे समाधान झाले नाही. तिने आणखी चौकशी केली व उतरण्याची तयारी केली. आम्ही विचार केला की येथे उतरण्याबद्दल तिला माहिती मिळालेली दिसते तेंव्हा आपण पण उतरावे. विमान कंपनी कदाचित विमान स्वच्छ करणार असेल व म्हणून आम्हास उतरण्यास सांगत असावेत. मी उतरून बाहेर आलो. बाहेर लक्षात आले की सर्वजण त्यांचे सामान घेऊन उतरत आहेत. मी माझी हातात घेण्याची बॅग विमानातच ठेवली

होती. ती आणण्याकरता मागे वळलो तर तेथे एक पोलीस उभा होता त्याने मला अडवले व परत विमानात जाण्यास बंदी केली. मी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण काही फायदा झाला नाही. आकडे मोजायची पाळी एवढ्या लवकर येईल अशी कल्पना नव्हती. वर्षा अजून विमानातच होती. आता ही चीनी मिरची किती वेळा झोंबणार आहे कोणास ठाऊक असा विचार करत मी आकडे मोजायला सुरुवात केली व वर्षा दिसली की तिला बाहेर येण्याआधी आमच्या बॅगस् आणण्याबद्दल सांगायचे अशा तयारीत होतो. आणि समोरून वर्षा आमच्या दोघांच्या बॅगा घेऊन येतांना दिसली. मला हायसे वटले. पुरूषांपेक्षा स्त्रियांना समज जास्त असते हे वर्षाने बऱ्याच वेळा सिद्ध करून दाखवलेले आहे.

यानटाइ हे चीन मधले शहर. येथे उतरलो आणि चीनच्या भूमीवर आम्ही प्रथमच पाऊल ठेवले. बाहेर आल्यावर कस्टमस्‌चे सोपस्कार करावे लागले. आम्हाला दोन फॉर्म भरण्याकरता दिले होते. त्या फॉर्ममध्ये नेहमी प्रमाणे माहिती भरायची होती. मी आमची सर्व माहिती माझ्या आयपॅडमध्ये भरून ठेवली होती. मी आयपॅड उघडून त्यात बघून माहिती भरू लागलो तेंव्हा तिकडच्या एका अधिकाऱ्याला संशय आला व तो माझ्या जवळ येऊन जास्त खोलात चौकशी करू लागला. तो जरा बऱ्यापैकी इंग्लीश बोलत होता. त्याचे समाधान झाल्यावर आमच्या पासपोर्टवर चीनचा शिक्का पडला. तेथे आम्हाला प्रत्येकी तीन तिकीटे दिली. पुढे जाऊन वेटींग रूम मध्ये थांबलो. वेटींग रूममध्ये जातांना तीन तिकीटां पैकी एक तिकीट द्यावे लागले. आमच्या विमानातील बहुतेक सर्व प्रवासी तेथे होते. समोर दोन विमाने उभी होती. एक आमचे आलेले व एक दुसरे विमान होते. थोड्यावेळाने लाऊड स्पीकर वरून चीनी भाषेत एक घोषणा झाली. काय घोषणा केली समजायला मार्ग नव्हता. पण वेटींगरूममधले अर्धे अधिक प्रवासी एका लाइनीत उभे राहीले. आम्हाला वाटले की दुसऱ्या विमानाचे प्रवासी विमानात बसण्याकरता लाइनमध्ये उभे राहिले आहेत. मग मघाचीच युरोपियन स्त्री लाइन मध्ये उभी राहीलेली दिसली तेंव्हा आम्ही समजलो की ही आमचीच लाइन आहे. आम्ही पण लाइनमध्ये उभे राहीलो. तेथे समजले की आमचे विमान बदलले जाणार होते. आम्ही आता दुसऱ्या विमानाने प्रवास करणार होतो. वेटींग रूममधून बाहेर पडतांना तीन तिकीटांपैकी दुसरे तिकीट द्यावे लागले व तिसरे तिकीट विमानात चढतांना द्यावे लागले. पुढचा बेइजींगपर्यंतचा प्रवास चीनच्या कृपेने काही त्रास न होता झाला. बेइजींगला विमान टर्मिनलच्या रँपला लागले नाही. टर्मिनल पासून जरा लांबच उभे राहीले. विमानाच्या शिडीवरून खाली उतरल्यावर आमचे म्हणजे प्रवाशांचे दोन भाग केले. एक

ओसाकाहून आलेला व दुसरा यानटाईहून आलेला. ओसाकाहून आलेल्या प्रवाशांचे कस्टमस् वेगळ्या भागात होणार होते. त्यांना (ओसाकाहून आलेल्या प्रवाशांना) वेगळ्या बसमधून तेथे नेण्यात आले. हा बस प्रवास बराच लांबचा वाटला. आम्हाला जवळ जवळ १५ मिनिटे लागली. आमचे इमिग्रेशन यानटाइला झाले असल्याने फक्त कस्टमस्च बेइजींगला होणार होते. बॅगा मिळायला व पुढे कस्टमस् मध्ये काही त्रास झाला नाही. सामानाची गाडी घेऊन बाहेर आलो. वर्षाला बाथरूमला जायचे होते म्हणून ती गेली. मी सामान घेऊन उभा असतांना कँडी नावाची टूर गाईड आमच्या नावाचा फलक घेऊन आम्हाला शोधत आली. वर्षा परत येईपर्यंत आम्ही थांबलो. तेव्हढ्यात कँडी कोठेतरी गायब झाली. वर्षा येऊन आम्ही बोलत असतांना कँडी वर्षाच्या मागून आली व लहान मुलाला भो करून घाबरवतात तसे तिने वर्षाला घाबरवले. आम्हाला हा प्रकार नवीनच होता. पण ही मुलगी खेळकर वाटली. आम्हाला विमानतळावरून घ्यायला ती मिनी व्हॅन घेऊन आली होती. व्हॅनमध्ये असतांना आपला प्लॅन बदलला असल्याचे कँडीने सांगितले. हवामानाचा अंदाज घेऊन दुसरे दिवशीच आम्ही चीनची प्रसिद्ध भिंत बघण्यास जाणार होतो. हॉटेलवर जातांना ट्रॅफिक लागला. सव्वा नऊ वाजता हॉटेलवर पोचलो. हॉटेलवर सुलभा, शशी, अलका व चारू आमच्या स्वागताला सिद्ध होते. रूमवर सामान ठेवून परत अलका व चारूच्या रूममध्ये आलो. त्यांच्या रूममध्येच जेवण मागवले. जेवण करून थोड्या गप्पा मारून आमच्या रूमवर आलो आणि मस्त पैकी गादीवर अंग टाकले.

बेइजिंगः (बेजिंग, बैजिंग, बिजिंग)

बेइजिंग ला बेजिंग, बैजिंग, बिजिंग एवढ्या नावाने संबोधतात. चीनी लोक बे नंतर इ थोडा लांबवतात म्हणून मी बेइजिंग असे लिहीले आहे. उत्तरेकडील राजधानी म्हणून बेइजिंग हे नांव प्रचलित झाले. रात्री विमान तळावरून हॉटेलवर येतांना बेइजिंगचे काळोखात दर्शन होत होते. रस्त्यावर पुढे अपघात झाला होता म्हणून वाहने संथ चालत होती. बाजूने एक रुग्णवाहीका वाट काढत पुढे जाण्याचा प्रयत्न करत होती परंतु तिला यश येत नव्हते. मला भारताची आठवण झाली. भारतात रस्त्यावर रुग्णवाहीकेला आणि आगीच्या बंबाला कधीही प्राधान्य मिळत नाही. सर्वजण आपले घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न करत असतात.

चीन हे एक अद्‌भूत राष्ट्र आहे. चीनची भिंत ही जणू ह्या राष्ट्राने सबंध राष्ट्राभोवती बांधलेली तटबंदी आहे. त्यामुळे बाकीच्या जगाचे आणि चीनचे राजकीय संबंध आल्याचे जास्त वाचनात आले नाही. भारत आणि चीन ह्या दोन राष्ट्रांमध्ये हिमालय उभा असल्यामुळे पूर्वीच्या काळी दळणवळण व व्यापार कमी झाला. भारताचे आणि चीनचे सामाजिक संबंध आले असे म्हणायला थोडासा वाव आहे. भारतात बौद्ध धर्माचा उदय झाल्यानंतर बौद्ध भिक्षुकांनी चीनमध्ये जाऊन धर्माचा प्रसार केला. त्यानंतर बरीच सांस्कृतीक व अध्यात्मिक देवाणघेवाण सुरू झाली. घेवाणपेक्षा देवाणच जास्त झाली. ह्युएन त्संग सारखे काही प्रवासी चीनमधून भारतात आल्याच्या तुरळक घटना सोडल्यातर चीन मधून फारसे कोणी आले नाही. बौद्ध भिक्षुकांची ही खरच कमाल आहे. गौतम बुद्धाची शिकवण सर्व जगाला सांगणे ह्या भावनेने भारावलेल्या भिक्षुकांच्या आड गगनाला भिडणारा हिमालयसुद्धा येऊ शकला नाही. पुढे ब्रिटीशांच्या आमदानीत इंग्रजांनी कलकत्त्यामार्गे चीनशी व्यापार सुरू केला. इंग्रज व्यापारी चीनला अफू सारखे मादक पदार्थ पुरवून त्याच्याबदल्यात त्यांच्याकडून कला कुसरीच्या वस्तू घ्यायचे व त्या नंतर युरोपियन राष्ट्रात विकायचे. ह्या अफूने चीनची बरीच दुर्दशा केली. चीनच्या राजकर्त्यांनी त्याला पायबंद घालण्याचा बराच प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरला. त्यातूनच पुढे जे युद्ध झाले ते अफूचे युद्ध म्हणूनच प्रसिद्ध झाले. चीनच्या लाल क्रांतीचा कलकत्त्याच्या जिवनावरही बराच प्रभाव पडला. बरीच वर्षे कलकत्ता व बंगालवर कम्युनिष्टांचे

वर्चस्व होते. अजूनही भारतात माओवादी धुडगूस घालत आहेत. त्या चीनची आता आम्ही सहल करणार होतो.

दुसरे दिवशी सकाळी लवकर जाग आली. कँडीने सांगितल्या प्रमाणे आमच्या प्रवासमार्गात थोडा बदल केला होता. दोन दिवसांनी आम्ही चीनची भिंत बघण्यास जाणार होतो. परंतु त्या दिवशी पावसाचा अंदाज असल्याकारणाने आजच भिंतीवर चढाई करण्याचे ठरले होते. आजपण हवा पावसाळीच होती. आमच्या बॅगा व रूम आवरून खाली उपहारगृहात न्याहरी करण्यास गेलो. तेथे सुलभा, शशी, व खोपकर जोडपे आधीच येऊन स्थानापन्न झाले होते. सकाळी लवकर गेलो तर गर्दी कमी असते म्हणून लवकर निघण्याचा विचार होता. न्याहारी करून बाहेर येतो तेवढ्यात कँडी आलीच. साडे आठ वाजता आम्ही जगप्रसिद्ध भिंत बघण्यास बाहेर पडलो. सी. टी. एस. सहल कंपनीने चीनमध्ये आमची चांगलीच बडदास्त ठेवली होती. आमच्या दिमतीला खास एक मिनी व्हॅन, एक ड्रायव्हर व एक मार्गदर्शक (गाईड) देऊन आमची खास सोय केली होती.

बेइजींग हॉटेल डावीकडून चारू व अल्का खोपकर, वर्षा, सुलभा, कँडी, शशी व मी

बाहेर पावसाची रिपरिप चालू होती. आम्हास जाण्यास दोन तास लागणार होते. तो पर्यंत पाऊस संपेल असे भाकीत होते. चीनचे हवामान खाते किती अचूक अंदाज सांगू शकते ह्याचा प्रत्यय आता आम्ही घेणार होतो. जातांना व्हॅनमध्ये कँडी आमची भरपूर करमणूक करत होती.

आमच्या व्हॅनमध्ये कॅंडी सर्वांची करमणूक करत असे

अलका आणि आमची टुर गाईड कॅंडी
मधून मधून असाही प्रकार चालत असे

ऑलिंपीकची पदके जेडच्या कोंदणात बसवलेली होती

बराच वेळ पाऊस कमी झाला नाही म्हणून आधी आम्ही जेडचा कारखाना बघण्यास गेलो. जेड हा हिरव्या रंगाचा अतिशय टणक दगड असतो. त्याचा दागिन्यांकरता व अन्य शोभेच्या वस्तू बनवण्यास उपयोग करतात. चीनमध्ये ऑलिंपिक झाले तेंव्हा सर्व पदके जेडच्या वर्तुळाकृती कोंदणात बसवलेली होती.

जेड कारखान्यात प्रवेश केला तेथेच काही कारागीर लकी बॉल कसा बनवतात त्याचे प्रात्यक्षिक दाखवत होते. साधारण ५" गोलाकृती जेडच्या दगडाला प्रथम साधारण दोन ते अडीच इंच व्यासाचे अर्धा इंच खोलीचे सारख्या अंतरावर सहा खड्डे करतात. त्या खड्ड्याच्या आत कोरून आतमध्ये आणखी एक चेंडू सारखा गोळा करतात.

बाहेरच्या गोलामध्ये हा गोळा खुळखुळ्यासारखा सैल असतो, त्याच्या आत आणखी एक गोळा करतात. एकात एक असे तीन ते अकरा गोळे असलेली कलाकृती हे कारागीर बनवू शकतात. आम्हाला जी कलाकृती दाखवली त्यात एकात एक असे चार गोळे होते. बाहेरच्या गोळ्यावर कोरून छान नक्षीकाम केलेले होते.

जेडच्या मॅजिक बॉलवर काम करत असलेला कारागीर

जेडच्या दगडापासून केलेला मॅजीक बॉल. ह्यात एकात एक असे सैल फिरणारे चार गोळे आहेत

जेंव्हा सहल कंपनी अशा कारखान्यात आपल्याला घेऊन जातात तेंव्हा त्यात त्यांचा एकच उद्देश असतो. ते लगेच आपल्याला त्या कारखान्याच्या दुकानात घेऊन जातात. तेथे गेल्यावर तेथील वस्तू बघून तुम्हाला खरेदी करण्याचा मोह आवरता येत नाही आणि त्यांचा उद्देश सफल होतो. सहल कंपन्या आणि अशा प्रकारची दुकाने हयांचे साटे लोटे असते. आम्ही तेथील दुकानात गेलो. तेथे खरा जेड व नकली जेड कसा ओळखावा ह्याचे प्रात्यक्षिक दिले. नंतर अर्थातच दुकानातल्या इतर वस्तू दाखवल्या. दुकाने आणि व्यापार हा चीनी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जेडचे हे दुकान प्रचंड मोठे होते. तेथे काम करणाऱ्या विक्रेत्या मुली फारच गळेपडू, पिच्छा पुरवणाऱ्या व आगाऊ वाटल्या. आम्हाला जरा विचित्र वाटले कारण इतका गळेपडू प्रकार आम्ही कधी बघितला नव्हता. आम्ही विचारण्या आधीच किंमती कमी करण्यास सुरुवात करत. वर्षाला एक गळ्यातला दागिना आवडला. त्याची किंमत २४६० युवान लावली होती. त्यांनी १२०० युवान पर्यंत कमी केली. आम्ही ७५० युवानला मागितला. त्यांनी दिला नाही. मग आम्ही तेथून बाहेर पडलो व चीनची भिंत बघण्यास निघालो.

चीनची भिंतः

चीनच्या भिंतीबद्दल मला फार पूर्वीपासून आकर्षण होते. असे म्हणत की चंद्रावरूनसुद्धा ही भिंत दिसते. पण नासाने एक पत्रक काढून हे विधान असत्य असल्याचे प्रसिद्ध केले. ही एक सलग भिंत नसून बऱ्याच भिंतींचा समूह आहे. काही ठिकाणी दुहेरी किंवा तिहेरी भिंती आहेत. ह्या भिंती एकाच राजाने, सम्राटाने किंवा एकाच राज्याच्या संरक्षणार्थ बांधल्या नसून अनेक राजांनी व सम्राटांनी त्यांच्या राज्यांच्या संरक्षणार्थ बांधल्या आहेत. एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की ह्या सर्व राजांनी त्यांच्या राज्याच्या संरक्षणा करता भिंत बांधण्याचा निर्णय कसा घेतला असावा. साडे पाच हजार मैल लांब असलेल्या ह्या भिंतीचे काम जवळ जवळ दोन हजार वर्षे चालू होते.

चीनच्या भिंतीचा नकाशा

इ. स. पूर्व आठव्या शतकात चीनमध्ये चीन, च्यू, हान, वी, की, झौ, व यान ह्या नावाची सात राज्ये होती. त्यांची आपापसात सतत युद्धे चालू असत. त्यांना यद्धखोर राज्ये असेच म्हणत. त्या राज्यांनी आपआपल्या साम्राज्याभोवती भिंती बांधल्या. पुढे इ. तिसऱ्या शतकात चीनच्या चीन शी व्हांग (हुआंग) ह्या राजाने बाकीच्या राज्यांचा पाडाव करून चीनचे साम्राज्य स्थापन केले. त्याच्या

नावावरूनच ह्या देशाला चीन हे नांव पडले व तेच पुढे रूढ झाले. त्याने आधी बांधलेल्या सर्व भिंती एकत्र जोडून तीन हजार मैल लांब भिंतीच्या पुनर्बांधणीचा हुकूम दिला. इ. स. १२०६ पर्यंत चीनच्या साम्राज्यामध्ये बरीच उलथा पालथ झाली व बऱ्याच घडामोडी झाल्या. काही सम्राटांनी भिंतीचे काम सोडून दिले तर काहींनी ते चालू ठेवले. काही सम्राटांचे साम्राज्य भिंतीच्या उत्तर व दक्षिणेकडे पसरले तर काही सम्राटांना भिंतीच्या बऱ्याच दक्षिणेपर्यंत माघार घ्यावी लागली. पुनः आणखी काही राज्ये स्थापन झाली. इ. स. १२०६ मध्ये मोगल सम्राट चंगीज खानचा उदय झाला आणि त्याने त्याचे साम्राज्य सर्व चीन, बराचसा आशिया व काही युरोपचा भाग एवढे प्रस्थापित केले व सर्व चीनवर एकछत्री अंमल सुरू झाला. चेंगीज खान हा चीनच्या इतिहासात एक झंझावात होता. त्याने आणि त्याच्या मुलांनी राज्य विस्तार ह्या बरोबरच वंश विस्तार हे ही धोरण अवलंबले होते. नवीन प्रदेश जिंकला की तेथील सुंदर स्त्रियांची त्यांच्या जनानखान्यात भरती होत असे. आधुनिक डि.एन.ए. चांचणी वरून कित्येक लाख लोक ह्या खानांची वंशावळ असल्याचे पुरावे पुढे येत आहेत.

पुढे १३६८ ते १६६४ पर्यंत मींग राजघराण्याने चीनवर राज्य केले. त्यांच्या काळात चीनची सांस्कृतिक प्रगती झाली. सध्या प्रसिद्ध असलेली व प्रवाशांना दाखवण्यात येणारी भिंत ह्याच काळात बांधली गेली आहे. ही भिंत जशी सखल भागातून जाते तशीच डोंगर खोऱ्यातूनही जाते. पूर्वेला उत्तर कोरीयाच्या पीत समुद्रापासून पश्चिमेला जियांग्वान म्हणजे गोबीच्या वाळवंटा पर्यंत ही भिंत पसरलेली आहे. भिंत बांधतांना आधी चाळीस फूट लांबी रुंदीचे व तीस ते चाळीस फूट उंचीचे बुरूज बांधले गेले. मग ते बुरूज जोडून भिंत बांधली गेली. बेइजींगच्या भोवती बरीच भक्कम तटबंदी केलेली आहे. बादालींग नावाच्या भागात भिंत जवळून बघता येते. चीन सरकारने येथपर्यंत उत्तम रस्ता बांधून पर्यटकांना भिंतीजवळ जाण्याची चांगली सोय केलेली आहे.

एव्हाना पाऊस बराच कमी झाला होता. परंतु वातावरण ढगाळ होते. रहदारीमुळे जाण्यास जरा वेळ लागला. वाटेत कँडी आमची चांगली करमणूक करत होती. रस्त्यावरच्या रहदारीतून मार्ग काढत वाहन चालवणे मुष्कील होते. रहदारी भारतासारखी वाटली. कोणतेही वाहन पटकन कोठेही वळत होते त्यामुळे वाहन चालवणे हे मोठे आव्हान होते. तुम्हास जेथे वळायचे आहे किंवा जायचे आहे तेथे घुसण्याखेरीज पर्याय नव्हता. तुमच्यासाठी कोणी थांबत नाही. बऱ्याच चौकात डावीकडे वळण्यास वेगळी लेन होती परंतु वेगळा सिग्नल नव्हता. हिरवा दिवा असतांना वाहने डावीकडे वळू शकत होती परंतु समोरून येणारी रहदारी कमी होत नव्हती, मग घुसणे हा एकच मार्ग शिल्लक होता.

घुसणे म्हणजे वाहत्या प्रवाहात पाचर मारणे. मग रहदारी ठप्प. त्यामुळे जाण्यास आणखी उशीर. थोड्याच वेळात भिंत आली. पाऊस परत सुरू झाला होता. त्यामुळे पांचो घ्यावे लागले. पांचो म्हणजे अत्यंत पातळ प्लॅस्टिक रेनकोट. हा रेनकोट म्हणजे आपली घोंगडीच. किंवा डोक्याला टोपी व हात बाहेर काढायला दोन मोठी भोके असलेली मोठी पिशवी. ती उलटी करून वापरायची. वर्षाचे व माझे जॅकेट वॉटर प्रूफ असल्यामुळे आम्हाला पांचो घ्यावे लागले नाहीत. गोल्फ खेळण्याचा फायदा. (आम्ही गोल्फ खेळतो असे मला सांगायचे आहे). हे पांचो इतके पातळ असतात की एकदा वापरल्यावर टाकून द्यावे लागतात. आमची व्हॅन थांबल्यावर पांचो विक्रेत्यांची एकच झुंबड आमच्या व्हॅनजवळ आली. त्यांच्यात आपापसात भांडणे सुरु होती. आम्ही चार पांचो विकत घेऊन पुढे निघालो. धुके असल्यामुळे लांबचे दिसत नव्हते. भिंतीचे तीन बुरूज दिसत होते. कँडीने आम्हास दोन तास दिले. दोन तासात भिंत बघून परत यायचे होते.

पांचो घालून आम्ही भिंत चढण्यास सिद्ध झालो
चारू, अलका, सुलभा, शशी, वर्षा व मी

आम्ही ज्या भागात भिंत बघायला गेलो तेथे चार बुरूज आहेत. पहिल्या बुरूजापेक्षा दुसरा बुरूज थोड्या उंचीवर आहे व तिसरा आणी चौथा बुरूज डोंगरावर आहेत. ते चढून जाण्यास पायऱ्या आहेत. दुसऱ्या बुरुजापर्यंत भिंत बरीच म्हणजे बारा ते पंधरा फूट रुंद आहे तर पायऱ्यांच्या ठिकाणी फक्त चार ते पांच फूटच रुंद आहे. पहिल्या बुरूजापासून दुसऱ्या बुरुजावर जाण्यास ५० पायऱ्या आहेत. ह्या पायऱ्या बऱ्याच लांब लांब आहेत. मला पुण्याच्या पर्वतीची आठवण झाली. दुसऱ्या बुरुजापासून तिसऱ्या बुरुजापर्यंत जाण्यात बरीच दामछाक होते कारण सबंध चढण आहे. वर चढायला जवळ जवळ ३५० पायऱ्या आहेत. काही काही पायऱ्या बऱ्याच उंच म्हणजे १२ ते १५ इंच उंच असाव्यात. तिसरा बुरुज चढायला आम्हाला अर्धा तास लागला.

पहिला बुरुज पार करून पुढे आल्यावर, मागे पहिला बुरुज दिसत आहे (उजवीकडे)

तिसऱ्या बुरुजावर जायला अशा ३५० पायऱ्या आहेत
पायऱ्यांवर वर्षा उभी आहे

शशी आमच्या बराच पुढे होता. आम्ही तिसऱ्या बुरुजावर जाईपर्यंत तो चौथ्या बुरुजावर जाऊन आला. कदाचित माझ्या अंगात अजून किती दम आहे ह्याचे प्रात्यक्षिक तो दाखवत असावा.

चारू व अलकाचे फोटो सेशन

दुसऱ्या बुरुजापुढे मी व वर्षा, मागे दुसरा बुरुज व डोंगरावर तिसरा बुरुज दिसत आहेत

तिसऱ्या बुरुजाकडे असे डोंगर चढून जावे लागते

तिसऱ्या बुरुजावर चढून येतांना सुलभा दिसत आहे

तिसऱ्या बुरुजापासून चौथा बुरुजावर जायला फक्त पन्नासच पायऱ्या आहेत. तो तसा फार उंच नाही पण येथे जास्त पर्यटक दिसले नाहीत. मी व वर्षा चौथ्या बुरुजावर जाऊन आलो. बुरुजावरून फारच छान दृष्य दिसत होते. धुके असल्यामुळे नजर फार लांब जात नव्हती व फोटो पण चांगले येत नव्हते.

तिसरा बुरुज सर केल्यावर अलका व सुलभा

चौथ्या बुरुजाच्या पायथ्याशी, वर्षा, अलका, सुलभा व शशी

चौथ्या बुरुजाच्या पायथ्याच्या उजवी कडे एक भेट वस्तूंचे दुकान (गिफ्ट शॉप) आहे. ते जरा खालच्या भागात आहे. तेथे पायऱ्या उतरून जावे लागते. मी व वर्षा चौथ्या बुरुजावरून परत येईपर्यंत चारू, अलका, सुलभा व शशी त्या दुकानात गेले. तेथे ३" रुंदीच्या व ४" लांबीच्या आकाराची तांब्याची पदके मिळतात. त्यावर मजकूर कोरलेला असतो " I climbed China Wall" त्याच्या खाली तुमचे नांव कोरून पदके तयार करून मिळतात. चारूने सर्वांच्या नावाची पदके तयार करून घेतली. खाली आल्यावर मी व वर्षा त्या दुकानात गेलो. वर्षाने एक पंखा विकत घेतला व सर्वांनी आइसक्रीम खाल्ले. नंतर आम्ही भिंत उतरून खाली आलो. खाली येतांना सुलभाने व मी सर्व पायऱ्या मोजल्या. येथपासून सुलभाने आणि मी जेथे जाऊ तेथे पायऱ्या मोजण्याचा क्रम चालू केला व तो शेवट पर्यत चालू ठेवला. व्हॅनजवळ कँडी आमची वाट बघत होती. तेथून पुढे आम्ही जेवण करण्यास निघालो. तेथे जातांना वाटेत बेइजींग रेल्वे स्टेशन दिसले. बाहेरून स्टेशन भव्य व सुंदर दिसले.

क्लोइसोनची कारागिरी केलेली डबी

आमची व्हॅन एका कला कुसरीच्या दुकानासमोर थांबली. नंतर आम्हास समजले की तेथेच आत मध्ये एक उपहार गृह असून तेथे आमची जेवणाची सोय केलेली होती. हे दुकान प्रचंड मोठे होते. आम्ही प्रवेश केला तो एक मोठा हॉल होता. तेथे पंचवीस एक कारागीर क्लोइसोन प्रकारची कारागिरी करत होते. क्लोइसोन कारागिरी म्हणजे तांब्याच्या भांड्यांवर वेलबुट्टीसारखे केलेले डिझाइन. त्याकरता वेगवेगळ्या प्रकारची भांडी वापरतात. पुष्पक पात्र, फूलदाणी, व्हेस, चहाची किटली, मोठी बशी इत्यादी भांडी वापरतात. आधी त्यावर चांदीच्या किंवा सोन्याच्या तारेने सॉल्डर करून वेलबुट्टी सारखे डिझाईन तयार करतात. नंतर त्याच्यात एनॅमलचे रंग भरतात. ते रंग नंतर भाजून पक्के करतात.

पुढची खोली हा असाच मोठा हॉल होता. तेथे ह्या वस्तू विकायला ठेवल्या होत्या. पांच इंच उंचीच्या व्हेसची किंमत जवळ जवळ शंभर डॉलरस् होती. सहल कंपनीने जेवणाची व्यवस्था केलेली असल्यामुळे आम्हाला शोधाशोध करावी लागली नव्हती. जेवणाचा प्रकार बफे सारखा होता. जेवण काही खास नव्हते. जेवणात चायनीज पदार्थ अजिबात नव्हते.

हुतोंगः

हवा अजून ढगाळच होती. अशा ढगाळ वातावरणात आमची व्हॅन आम्हाला हुतोंग नावाच्या गावाला घेऊन गेली. आमची व्हॅन जेथे उभी राहिली तेथे बऱ्याच सायकल रिक्षा उभ्या होत्या. सर्व रिक्षांना तांबडा रंग होता व तांबडे छत होते. मला वाटले की आता हे आमच्या भोवती झुंबड करणार. सकाळी पांचो विक्रेत्यांचा अनुभव घेतला होता. परंतु आमच्या सहल कंपनीने काही रिक्षा आधीच राखून ठेवलेल्या असल्या कारणाने त्यांच्या जाचातून आमची सुटका झाली.

हुतोंगमधले सायकल रिक्षावाले

माझ्या आठवणीत मी आठ वर्षांचा असतांना हैद्राबादला गेलो होतो तेंव्हा सायकल रिक्षात बसलो होतो. त्यानंतर बहुतेक आजच सायकल रिक्षात बसत होतो.

अलका आणि चारू रिक्षात स्थानापन्न झाले

शशी आणि सुलभा, अर्चानच शशीला नेहमी काहीतरी सांगायच असत

हुतोंगमधल्या सायकल रिक्षात मी आणि वर्षा
बाजूच्या रिक्षात सुलभा दिसत आहे.

मी रिक्षात सीट बेल्ट बघत होतो पण दिसला नाही. रिक्षा चालकाचा आत्मविश्वास. आम्ही सर्वजण नीट बसलो आहोत ह्याची खात्री करून झाल्यावर आम्ही हुतोंगची सफर करण्यास निघालो.

आमचा रिक्षा चालक

हुतोंग ह्याचा अर्थ लहान व अरुंद रस्ते आणि गल्ल्या. येथे येणारे प्रवासी सायकल रिक्षा किंवा गोल्फ कार्ट मधून फिरण्याचा आनंद घेतांना दिसले. हुतोंग हे गाव शीचा हाय नावाच्या तलावाच्या भोवती पसरलेले आहे. शीचा हाय म्हणजे दहा देवळे. ह्याला टेन टेम्पल लेक असेहि म्हणतात. तेथे एका फलकावर रिक्षाच्या फिरण्याचा मार्ग दाखवलेला आहे.

आम्ही तलावाच्या उत्तरेला दाखवलेल्या मार्गावर गेलो नाही.

हुतोंग

सायकल रिक्षातून फिरतांना आम्हाला बरीच दारूची दुकाने दिसली. ह्या तलावाच्या भोवती शंभर एक दारूची दुकाने आहेत असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

हुतोंग भागातील दारूचे दुकान

आम्हाला देवळांपेक्षा दारूची दुकानेच जास्त दिसली.

तलावाच्या पलिकडे दिसणारे हुतोंग

सायकल रिक्षाचा मार्ग . आम्ही फक्त डावीकडे दाखवलेल्या वर्तुळात फिरलो

वरच्या नकाशात निळ्या रंगाने दाखवलेला मार्ग हा चालत बघण्याचा मार्ग आहे. तेथे आम्हाला रिक्षाने सोडले. ह्या ठिकाणी आम्हाला नॅन्सी नावाची टूर गाईड भेटली, कँडीने हुतोंग पुरता आपला पदभार नॅन्सीवर सोपवला होता. नँन्सी कँडी प्रमाणे हसरी, खेळकर (खोडकर) असावी अशी आम्ही अपेक्षा केली पण ती फोल ठरली.

आम्ही ङ्वातान नावाच्या रस्त्यावर गेलो. हा रस्ता म्हणजे एक छोटी गल्ली होती. हा रस्ता पुण्याची आठवण करून देतो. लहान गल्ली बोळ, दोन्ही बाजूला असणारे वाडे, वाडयात जाण्याकरता मोठे दरवाजे, आंत गेले की छोटे अंगण, अंगणात मध्ये तुळशी वृंदावन आणि आजुबाजूला सायकली लटकलेल्या. पुण्याचे हे चित्र मी माझ्या डोळ्यासमोर उभे केले.

ङ्वातान रस्ता. हा रस्ता पुण्याची आठवण करून देतो

फक्त येथे केर कचरा नव्हता.

नॅन्सी हुतोंग ची माहीती सांगतांना, आम्ही ह्या वाड्यासमोर उभे होतो

पूर्वी चीनमधला बराचसा भाग हा हुतोंग होता. म्हणजे लहान गल्ल्या बोळांचा होता. विसाव्या शतकात चीनमध्ये बऱ्याच ठिकाणी आधुनिकीकरण झाले. त्यात हा भाग उध्वस्त केला गेला. काही भाग अजून शिल्लक आहे जो आता पर्यटक आकर्षण म्हणून आस्तित्वात आहे. येथे घरे फार महाग आहेत. ह्या ठिकाणी बरेच सरकारी अधिकारी व सैन्यातील अधिकारी राहतात. सैन्यातील अधिकाऱ्यांच्या घरावर त्यांच्या हुद्या प्रमाणे चांदण्या लावलेल्या असतात. जेवढा हुद्दा मोठा तेवढ्या चांदण्या जास्त.

हुतोंगमधील एका सैनिकी अधिकाऱ्याचे घर

आमच्या सहलीचा भाग म्हणून आम्हाला श्री. व सौ. झांग ह्यांचे घर आतून दाखवले. मुख्य दरवाजातून आंत गेल्यावर अंगण होते. माझी दृष्टी भिरभिरत होती, कोठे तुळशी वृंदावन दिसते का बघत होतो. पण वृंदावन दिसले नाही व सायकलींचा अड्डा पण दिसला नाही. चीनमध्ये सायकली पुष्कळ आहेत. झांग ह्यांच्या घरात फक्त नवरा बायकोच रहात असल्यामुळे त्यांच्या घरात सायकलचा वापर नसावा.

श्री. व सौ. झांग ह्यांच्या वाड्यातले अंगण

आम्हाला घराची फक्त एकच बाजू दाखवली. ज्या घरासमोर आम्ही फोटो घ्यायला उभे होतो तो भाग दाखवला नाही पण त्याच्या समोरचा भाग दाखवला. आम्ही त्यांच्या दिवाणखान्यात बसलो. तेथेच आतमध्ये स्वयंपाकघर होते.

दिवाणखाना दहा फूट रुंद व अठरा फूट लांब असावा. स्वयंपाकघर दहा फूट लांब व सहा फूट रुंद असावे असे वाटते.

झांग ह्यांचे स्वयंपाकघर

सौ. व श्री. झांग आता निवृत्त झाले आहेत. त्यांचा फोटो घेण्यास त्यांनी नकार दिला. नंतर चालत आम्ही त्याच रस्त्यावरून पुढे जाऊन परत तलावाजवळ आलो. हवामान ढगाळ होते व धुके असल्यामुळे लांबचे दिसत नव्हते. ह्या ठिकाणी तलावाचे दोन भाग दिसत होते उत्तर भाग व दक्षिण भाग. धुके असल्यामुळे तलाव पूर्ण दिसत नव्हता पण जो होता तो

फारच निसर्गरम्य दिसत होता. तलावाचे दोन फोटो काढले व परत रिक्षात बसलो. रिक्षाने आम्हाला आमच्या व्हॅन पर्यंत आणून सोडले.

शिचा हाय तलावाचा उत्तर भाग

शिचा हाय तलावाचा दक्षिण भाग

व्हॅन आम्हाला "Quanjude Roastduck Restaurant" मध्ये जेवण्याकरता घेऊन गेली. अंतर फार नव्हते परंतु रस्त्यावर रहदारी पुष्कळ असल्यामुळे जाण्यास भरपूर वेळ लागला. सगळीकडे प्रचंड गर्दी होती. उपहारगृहात सुद्धा गर्दी होती. दुसऱ्या मजल्यावर आम्ही एका गोल टेबला भोवती बसलो. हे टेबल दहा माणसे बसू शकतील एवढे मोठे होते. त्या टेबलावर मधोमध लेझी सुझन सारखे मोठे फिरते चक्र होते. तीन फूट व्यासाचे हे चक्र एका फिरतीवर बसवलेले असते. आपण हे चक्र त्या फिरतीवर हाताने फिरवू शकतो. ह्या उपहार गृहातील वाढपी एक एक पदार्थ आणून ह्या चक्रावर ठेवत होते. हे चक्र फिरवून आपल्याला हवा असेल तो पदार्थ आपल्यासमोर आणायचा व आपल्या पानात आपण वाढून घ्यायचा. जेवण चांगले होते. जेवणात काही चायनीज पदार्थ होते. आमचे जेवण चालू झाले तरी वाढपी आणखी पदार्थ आणत होते. जेवण संपता संपता सूप आणले गेले. सूप शेवटी आणण्याची येथे (चीनमध्ये) पद्धत असावी कारण हाच अनुभव आणखी काही ठिकाणी आला. दही हा पदार्थ चीनमध्ये फारसा आढळला नाही. त्यामुळे जेवणाच्या शेवटी दहीभात खाण्याची प्रबळ इच्छा दाबून ठेवावी लागली. दहीभात खाल्याखेरीज तृप्त झाले आहे असे वाटत नाही.

जेवण झाल्यावर तेथून आम्ही कंग फू चा शो बघायला गेलो. कँडीने सांगितले की हा शो बघायला नेहमी गर्दी असते त्यामुळे तिकीटे मिळतीलच अशी खात्री नसते तेंव्हा आपण लवकर जाऊन तिकीटे घेऊ म्हणून आम्ही लगेचच निघालो. ड्रायव्हरला व्हॅन उभी करायला जागा शोधायला वेळ लागला असता म्हणून त्याने थिएटरच्या तिकीटघरा समोर व्हॅनचा वेग मंदावला, हे तिकीटघर थिएटरच्या उजव्या कोपऱ्यात असून प्रवेशद्वार थिएटरच्या डाव्या कोपऱ्यात आहे. थिएटर समोर आवार होते पण गाड्या पार्क करण्याची सोय केलेली नव्हती. कँडी चालत्या व्हॅन मधून उतरून धावत तिकीट काढायला गेली. मी मनांत म्हटले की ही बहुतेक मुंबईला जाऊन धावत्या लोकलमध्ये चढा–उतरायची सवय करून आलेली दिसते. ड्रायव्हरने आम्हाला थिएटरच्या द्वारासमोर उतरवून तो व्हॅन पार्क करायला गेला. आम्हाला थिएटरमध्ये प्रवेश मिळायला अजून अर्धा तास अवकाश होता. कँडी आमची तिकीटे आमच्याकडे देऊन पसार झाली होती. थोडा वेळ जवळपास एक चक्कर मारून आलो. थिएटरच्यासमोर बरेच फेरीवाले माल विकायला उभे होते. उभे होते म्हणण्यापेक्षा सर्वत्र फिरत होते असेच म्हणावे लागेल. हे खऱ्या अर्थाने फेरीवाले होते ते जमिनीवर चादर पसरून माल विकत नव्हते ते फिरत फिरत माल विकत होते. त्यांच्या खांद्यावर मोठी पिशवी असते त्यात त्यांचा माल भरलेला

असतो. त्यामुळे त्यांना माल हातात घेऊन सर्वत्र फिरता येते. ते तुमच्या जवळ येऊन हातातला माल तुम्हास दाखवून त्याची किंमत सांगतात. तुम्ही लक्ष दिले नाहीत तर ते भाव करत करत तुमच्या बरोबर चालतात. प्रत्येक पावलागणीक ते भाव कमी करतात. एक फेरीवाला घड्याळ व लेझर पॉइंटर विकत होता. सुरुवातीला त्याने घड्याळाची किंमत १५० युआन सांगितली. नंतर भाव करत करत १०० युआनला चार घड्याळे एवढा घसरला. आम्ही काही खरेदी केली नाही. तेथेच रस्त्यावर आम्हाला एक सायकल स्टँड दिसला. त्याला बऱ्याच सायकली लावून ठेवलेल्या होत्या आणि शेजारी मोठे इलेक्ट्रॉनिकचे मशीन होते. हे एक सायकल भाड्याने देण्याचे मनुष्य विरहित दुकान होते. किंवा सायकल सहभागाचे (bicycle share program) दुकान होते. सायकल सहभाग हा कार्यक्रम सरकार तर्फे चालवला जातो. ह्या योजनेत सामील होणारे सदस्य हे तत्वतः एका सायकलचे मालक असतात. ह्या सदस्यांजवळ एक क्रेडिट कार्डासारखे कार्ड असते. ते खाचेत घातले की कुलूपातून सायकल मोकळी होते. अशी दुकाने मोठ्या शहरातून बरीच असतात. घेतलेली सायकल त्याच दुकानात परत केली पाहीजे अशी आवश्यकता नाही. दुसऱ्या अशाच प्रकारच्या दुकानात परत करू शकतो. ही अतिशय उत्तम सोय येथे बघण्यास मिळाली. त्यामुळे सायकल वापरण्याची सोय होते. सायकल वापरल्यामुळे प्रदूषण होत नाही व सर्वांची सोय होते.

एव्हाना शोचे दरवाजे उघडले होते. थिएटर मध्ये प्रवेश केला, प्रवेशद्वारातून आंत गेल्यावर एक हॉल होता. तेथे एक लहान मुलगा कंग फू चा वेश घालून एका मखरात बसला होता. आमच्या सीट वरच्या मजल्यावर होत्या. तेथे जाऊन आमच्या सीटवर बसलो. बरोबर साडे सातला शो सुरू झाला. हा शो एका लहान मुलाच्या गोष्टीवर आधारलेला आहे. हा शामळू मुलगा लहान असतांना आईचा हात धरून घाबरत घाबरत गुरूकडे कंग फू शिकायला येतो. गुरू कडून विद्या घेऊन तो कंग फू मास्टर होतो. त्याच्या जीवनात घडलेल्या घडामोडी दाखवल्या आहेत. स्टेजवरचे सेट्स, प्रॉपस् व प्रकाशयोजना डोळ्याचे पारणे फेडणारी अप्रतीम होती. टेकडीवर झालेले युद्ध, गुरूकुल, त्याची व त्याच्या प्रेयसीची झालेली भेट हे व इतर सीन फार वाखणण्या जोगे होते. सिनेमात बघतो तसे कंग फू युद्ध. खोटे असले तरी त्यांनी केलेल्या कसरती खऱ्या होत्या. कसरत करत त्यांनी मारलेल्या उंच व लांब उड्या सर्वच विलक्षण. हे खरे असू शकते ह्यावर विश्वास न बसण्याजोगे. शब्दांच्या वर्णनापलीकडचे. स्टेजच्या समोर छतावर एक मोठ्ठा एल. सि. डी. स्क्रीन होता. त्यावर बरीच महिती दाखवत होते. त्यामुळे स्टेजवर काय चालू आहे ते समजत होते. सर्व माहिती कंग फू च्या संदर्भात

होती. त्यांची गुरूकुलाची पद्धत, महत्वाच्या घटना व त्या कोणत्या साली घडल्या इ. बरीच माहिती दाखवत होते. शो संपल्यावर सर्व कलाकार स्टेजवर आले. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवत उभे राहून त्यांचे प्रचंड अभिनंदन केले. वीस युवान देऊन त्यांचे बरोबर फोटो घेण्याची मुभा होती. थिएटरमध्ये फोटो व व्हिडीओ घेण्यास बंदी असल्यामुळे आम्ही आमचे कॅमेरे व्हॅनमध्येच ठेवले होते. फक्त आय फोन बरोबर होता. त्यावर फोटो घेतले. वर्षाने त्यांच्यासारखी पोज घेतल्यामुळे ती फोटोत पटकन ओळखू येत नाही.

कंग फूच्या कलाकारां सोबत वर्षा आणि मी

आजचा दिवस आम्ही बेइजिंगमध्ये घालवला परंतु चीनच्या अंतरंगात आम्ही डोकावू शकलो नाही. आमच्या सहल कंपनीने आखून दिलेल्या मार्गानेच कँडी आम्हाला घेऊन जात होती त्यामुळे खरा चीन आम्हाला बघण्यास मिळाला नाही. कदाचित चीनचे सरकार आम्हाला त्या विश्वापासून लांब ठेवत असावेत. आपण स्वतः सफर करण्यामध्ये व सहल कंपनी बरोबर जाण्यामध्ये हा महत्वाचा फरक असतो. जो भाग आम्ही बघितला तो बराच आधुनिक व स्वच्छ दिसला. हॉटेलमध्ये परत येण्यास रात्रीचे साडे नऊ वाजले. ज्या हॉटेल मध्ये आम्ही रहात होतो ते चांगले प्रशस्त होते. आमच्या खोल्याही प्रशस्त होत्या. हॉटेलमध्ये इंटरनेट असल्यामुळे घरी संपर्क साधता येत होता.

तिआनानमेन चौक (स्क्वेअर) व फॅारबिडन सिटीः

आजच्या आमच्या कार्यक्रमात तिआनान मेन स्क्वेअर व फॅारबिडन सिटी होते. सकाळी उशीरा निघायचे असल्यामुळे थोडा आराम होता. कॅंडी सकाळी साडे आठ वाजता येणार होती. हॅाटेल मध्ये न्याहरी उरकून लॅाबीत येईपर्यंत कॅंडी आलेली होती. तिने सांगितले की आज हवामान गार आहे तेंव्हा तुमची जॅकेट बरोबर घ्या. आम्ही जॅकेट बरोबर घेऊन निघालो. कॅंडीने आज तिच्या बरोबर आणखी एक शिकाउ टूर गाईड आणली होती. तिआनान मेन चौकात पार्कींगला त्रास होतो म्हणून आमच्या ड्रायव्हरने बाजूच्या रस्त्यावर नॅशनल सेंटर फॅार परफॅार्मींग आर्टस्‌च्या समोर व्हॅन उभी केली.

नॅशनल सेंटर फॅार परफॅार्मींग आर्टस्‌च्या समोर

तेथून दहा मिनीटे चालत तिआनान मेन चौकात पोहोचलो. वातावरण गार असले तरी ढगाळ होते व सर्वत्र धुके होते. बेइजींग मध्ये आल्यापासून हे ढगाळ आणि धुक्याचे वातावरण आमची पाठ सोडायला तयार नव्हते.

तिआनान मेन चौक हा अतिभव्य चौक असून तेथे एका वेळेस दहा लाख माणसे उभी राहू शकतात. ९६० यार्ड लांब व ५५० यार्ड रूंदीचा हा चौक एवढा प्रचंड आहे की तो साफ करणारे कामगार स्कूटर वरून फिरत हा चौक साफ करतात. तिआनान मेन चौक हा १९८९ साली चीन सरकारने लोकशाहीचा पुरस्कार करणारे आंदोलन निर्दयपणे दडपून टाकले व लाखो लोकांना यमसदनी पाठवले तेंव्हा एकदम प्रकाशझोतात आला. हे आंदोलन प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी उभे केले

होते. हू याओबांग ह्या कम्युनिस्ट नेत्याच्या मृत्यूनंतर आंदोलनास सुरुवात झाली. कै. याओबांग ह्यांनी बऱ्याच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली होती. त्यांबद्दल सरकारकडे दादही मागितली होती. चीनी सरकारने सर्व चीनी प्रजेचे स्वातंत्र्य हिरावून घेतलेले होते. त्याच्या विरुद्ध व लोकशाहीच्या पुरस्कारार्थ हे आंदोलन उभे राहिले होते. सर्व प्रथम विद्यार्थ्यांनी तिआनान मेन चौकात मोर्चा काढला. मग तेथेच ठिय्या देऊन उपोषण सुरू केले. पुढे ही चळवळ जवळ जवळ चारशे शहरातून पसरली. हे आंदोलक ह्या चौकातच झोपड्या उभारुन राहू लागले. सरकारने सैन्याच्या मदतीने हे आंदोलन निर्दयपणे चिरडून टाकले. चिरडून टाकले हा शब्दच येथे बरोबर ठरावा कारण असे ऐकिवात आहे की सरकारने रणगाडे आणून आंदोलकांना त्याच्या खाली चिरडून मारले. स्वतःच्या प्रजेला इतक्या क्रूरपणे मारणारे दुसरे कोणतेही सरकार अस्तित्वात नसेल. अमानूष क्रूरता ही चीनी राज्यकर्त्यांची मक्तेदारीच आहे. पूर्वींच्या सम्राटांनी तेच केले. माओने तर त्याच्यावर कळस चढवला. चीनी सरकारने ह्या उठावा संबंधी व सरकारने ज्या क्रूरतेने हे आंदोलन चिरडून टाकले त्या संबंधीची माहिती बाकीच्या जगाला कळू नये अशी खबरदारी घेतली होती. तरीपण बरीच माहिती बाहेर पडली व सर्व जगाने चीनला वाळीत टाकले होते. त्या देशांबरोबर संबंध पुर्ववत करण्यास चीनला बरीच धडपड करावी लागली. कँडी ह्या उठावा बद्दल एक अवाक्षरही काढायला तयार झाली नाही. आमच्या प्रश्नांना तिने उत्तरे दिली नाहीत. सर्व टूर गाईडना तशी ताकीदच देऊन ठेवलेली असणार.

तिआनान मेन हे नाव तिआनान मेन गेट ह्या नावावरून पडले आहे. ह्या चौकाच्या उत्तरेला तिआनान मेन गेट आहे. त्याला तिआनान मेन टॉवर असेही म्हणतात. त्याचा अर्थ स्वर्गीय शांतीचा दरवाजा (*Gate of Heavenly Peace*)असा आहे. ह्या शांतीच्या दरवाजा समोरच चीनी सरकारने हे निर्दयी कृत्य केले. एकविसाव्या शतकात सुद्धा आपल्या देशाच्या तरूण पिढीला चिरडून टाकणारे सरकार किंवा जिहादच्या नावाखाली तरूण पिढीचा नाश करणारा धर्म आस्तित्वात आहे ह्याचे नवल वाटते.

तिआनानमेन चौकात, मागे तिआनानमेन गेट दिसत आहे

तिआनानमेन चौक व आजुबाजू चा भाग

गुगल मॅपवरून

एके काळी हा चौक तटबंदीने वेढलेला होता. नंतर ही तटबंदी पाडून हा चौक विस्तीर्ण करण्यात आला. तिआनान मेन चौकात माओ त्से तुंगचे स्मारक आहे. त्याच्यासमोर चीनच्या क्रांतीचे प्रदर्शन करणाऱ्या क्रांतिवीरांच्या समुहाचे दोन पुतळे आहेत. एक समूह नव्या लोकशाहीचे प्रतिनिधित्व करतो तर दुसरा समूह समाजवाद बांधणीच्या काळाचे प्रतिनिधित्व करतो.

चेअरमन माओचे स्मारक

त्यांचे फोटो घेण्याचा प्रयत्न करत होतो परंतु धुके असल्यामुळे फोटो चांगले येत नव्हते. त्यामुळे पुतळ्यांचा फोटो इंटरनेटवरून घेतला आहे.

माओ स्मारकासमोरचे पुतळे

ट्रॅव्हल चायना गाईडच्या सौ जन्याने

ह्या स्मारकात चेअरमन माओचे थडगे आहे. त्यात चकाकणाऱ्या काचेच्या पेटीत माओचे शव ठेवलेले आहे. हे स्मारक १९७७ मध्ये बांधून पूर्ण केले. मेमोरियल हॉल हा स्मारकाचा मुख्य भाग आहे. तेथे माओचा साडे अकरा फूट उंचीचा संगमरवरी पुतळा आहे.

तिआनान मेन चौकाच्या मध्यावर पीपल्सा हीरोज मॉन्यूमेंट आहे. चीनच्या लोकांना त्यांचे हक्क मिळवून देतांना जे शूर वीर धारातिर्थी पडले त्यांचे स्मारक. किती विरोधाभास आहे हा. जे सरकार समाजाचे हक्क हिरावून घेते तेच त्यांचे स्मारक बांधते.

पिपल्स हिरो स्मारका समोर
बाजूला दोन एल. सि. डी. स्क्रीनस् दिसत आहेत

ग्रेट हॉल ऑफ पीपल्स समोर

ह्या स्मारकाच्या पुढे दोन्ही बाजूला प्रचंड मोठे एल् सि डी फलक आहेत. माझ्या मते ते १०० फूट लांब व १० ते १२ फूट उंच असावेत. त्यावर सतत तिबेटची माहिती देत होते. चीनी नागरिकांना तिबेटमध्ये जाण्यासाठी प्रवृत्त करणे हा त्याच्या मागचा उद्देश असावा. ह्या चौकात जे दिपस्तंभ आहेत त्यावर अनेक सिक्यूरिटी कॅमेरे लावलेले आहेत. त्यायोगे येथे चालणाऱ्या घडामोडींचे सतत निरिक्षण केले जाते.

चौकाच्या चारी बाजूनी रस्ते आहेत व त्याच्या पलीकडे मोठमोठ्या प्रसिद्ध इमारती आहेत. पीपल्स हिरो स्मारकाच्या एका बाजूला ग्रेट हॉल ऑफ पीपल्स (जनतेचे भव्य सभास्थान) ची भव्य

इमारत आहे. ही इमारत आम्ही आतून बघितली नाही. ही इमारत बांधण्यास आक्टोबर १९५८ मध्ये सुरुवात करून केवळ दहा महिन्यात पूर्ण केली. सर्व मजल्यांचे मिळून ह्या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १७४000 चौ. मि. आहे. जगातल्या अवाढव्य इमारतीत ह्या इमारतीची गणना होते.

येथे चायना नॅशनल पीपल्स काँग्रेसच्या व इतर राजकीय सभा भरवल्या जातात. ह्या इमारतीचे मुख्यत्वे करून तीन भाग आहेत ते म्हणजे मुख्य कार्यालय, प्रेक्षागृह व मेजवानीगृह. प्रेक्षागृहात संगमरवरी फरशा, संगमरवरी भिंती व चकाकणाऱ्या काचेचे दिवे असून एका वेळेस १०,००० लोकांना बसण्याची व्यवस्था आहे, तर मेजवानीगृहात ५,००० व्यक्ती एकाच वेळेस मेजवानीचा आस्वाद घेऊ शकतात.

ग्रेट हॉल ऑफ पीपल्सा च्या इमारतीच्या विरुद्ध बाजूला नॅशनल म्युझियम ऑफ चायनाची इमारत आहे. ही इमारतसुद्धा १९५९ मध्ये बांधून पूर्ण केली आहे.

नॅशनल म्युझियम ऑफ चायना समोर
बाजूला तिन चाकी स्कूटरवर साफ सफाई करणारा कामगार दिसत आहे

नॅशनल म्युझियम ऑफ चायनाच्या इमारतीत ४८ प्रदर्शनीय खोल्या आहेत. त्यातून पौराणिक वस्तू व राजघराण्यातील वस्तूंच्या संग्रहाचे प्रदर्शन आहे.

चौकाच्या उत्तरेला तिआनान मेन गेट आहे. चौकाच्या त्या भागात केलेली झाडा झुडपांची रचना फारच सुंदर व आकर्षक आहे. खांबांवर वेल सोडून त्याची सुंदर रचना केलेली आहे. झुडूपांना गोलाकार देऊन रंगी बेरंगी फुलांनी हा भाग सुशोभित केला आहे.

रंगी बेरंगी झुडपांची केलेली रचना

वेलींनी केलेले खांबांवरचे नक्षीकाम

तिआनान मेन गेट रस्त्याच्या पलिकडे आहे. तेथे जाण्याकरता चँगान नावाचा रस्ता ओलांडावा लागतो. तिआनान मेन गेटच्या म्हणजे ह्या दरवाजाच्या उत्तरेला फॉरबिडन सिटी किंवा पॅलेस म्यूझियम आहे. चँगान रस्ता फार रहदारीचा असल्यामुळे रस्ता ओलांडण्याकरता रस्त्या खालून बोगदा केलेला आहे. त्याचा वापर करून रस्ता ओलांडणे सोपे जाते.

फॉरबिडन सिटीः

तिआनान मेन दरवाजाच्या समोर खंदक खणलेला आहे. त्यावर ५ पूल बांधलेले आहेत. त्यातील मधला पूल रूंद व प्रशस्त आहे. त्या पुलाचा वापर फक्त सम्राटच करू शकत होते. पुलावरून पलिकडे गेल्यावर आपण दरवाजाजवळ पोहोचतो.

तिआनानमेन गेट

ह्या दरवाजाला बेइजींग दरवाजा असेही म्हणतात. चीनच्या राष्ट्राचे प्रतीक म्हणून ह्या दरवाजाचा वापर होतो. मूळ बांधणी मींग घराण्याने १४२० मध्ये केली. ह्या दरवाजाच्या नावाचा खरा अर्थ स्वर्गातून आलेला हुकूम स्विकारण्याचा दरवाजा असा आहे. सम्राटांचे हुकूम व कायदे येथूनच प्रजेला कळवण्यात येत असत. हा समारंभ मोठा दिमाखदार असे. नवीन कायदा केला की तो सरकारी अधिकाऱ्याकडे देत असत. मग सरकारी अधिकारी तो कायदा समारंभाने मिरवत मिरवत ह्या दरवाजात आणत व वरच्या मजल्यावरून त्याचे सर्व प्रजे करता जाहीर वाचन करत. नंतर सोनेरी दोरीने तो कायदा खाली सोडत, कायदे मंत्री तो स्वीकारून त्याच्या प्रती काढून देशभर प्रसारीत करत. १४२० ते १९५९ पर्यंत हा दरवाजा चार वेळा जळाला व पुन्हा बांधण्यात आला. प्रत्येक वेळी त्याच्या रचनेत बदल होत गेला. सध्या आस्तित्वात असलेला दरवाजा १९७० मध्ये बांधून पूर्ण केला गेला. ह्या दरवाजाची लांबी ७२ फूट असून रूंदी ४० फूट व उंची ३५ फूट आहे. ह्या दरवाजावर तीन मजली इमारत आहे. ह्या इमारतीत तेथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची राहण्याची सोय आहे.

दरवाजाला मातीसारखा लाल रंग आहे जो ध्रुव ताऱ्याचा रंग आहे. दरवाजाच्या दोन्ही बाजूला व दरवाजाकडे जाण्याच्या पुलाच्या दोन्ही बाजूला सिंहाचे पुतळे आहेत. सिंह भूत पिशाच्च्या पासून मनुष्य प्राण्याचे रक्षण करतो असा समज आहे. शिवाय दरवाजाच्या दोन्ही बाजूला एक एक असे दोन दगडी खांब आहेत. त्याच्या पायथ्याशी ड्रॅगनचे पुतळे आहते व खांबांवर हाऊ नावाच्या प्राण्याचा पुतळा आहे. एका प्राण्याचे तोंड आकाशाकडे तर दुसऱ्या प्राण्याचे तोंड राजाच्या अंतःपुराकडे आहे. असे म्हणतात की राजाला इशारा देण्याचे काम हा प्राणी करत असतो.

संगमरवरी स्तंभ पायथ्याशी ड्रगन व माथ्यावर हाऊ नावाचा प्राणी

इंपिरियल सिटीच्या पुढे हे गेट असल्यामुळे ह्या गेटला राजकीय महत्व फार होते. ह्या गेटमधून जाण्यास पांच कमानी आहेत. त्यातल्या मधल्या कमानीवर पूर्वी सन यात सेनचे चित्र लावले होते. नंतर १९४५ मध्ये चॅंग काय शेकचे चित्र लावले गेले व १९४९ पासून आत्तापर्यंत माओ त्से तुंगचे चित्र लावले आहे. त्याचे जगप्रसिद्ध चित्र जे त्याच्या सर्व पुस्तकांवर असते तेच येथे लावलेले आहे. जवळून बघितल्यावर ह्या चित्राचा भव्यपणा जाणवतो. ते चित्र माझ्या मते १८ फूट उंच व १२ फूट रूंद आहे. ह्या चित्राच्या दोन्ही बाजूला माओच्या दोन घोषणा तांबड्या फलकावर पांढऱ्या अक्षरात चिनी भाषेत लिहीलेल्या आहेत. डावी कडे "चीनी प्रजासत्ताक राज्य चिरायू होवो" आणि उजवीकडे "आंतर राष्ट्रीय संघ शक्ती चिरायू होवो" अशा घोषणा आहेत.

अजून माओचे चित्र लावलेले आहे म्हणजे आर्श्चय आहे. खरे म्हणजे चीन माओच्या तत्व प्रणाली पासून बराच लांब गेला आहे. चेअरमन माओचा काळ म्हणजे चीनच्या इतिहासातील रक्तरंजीत क्रांतीचा काळ. हिटलरच्या ज्यू द्वेषा बद्दल आणि त्याने केलेल्या ज्यूंच्या हत्याकांडा बद्दल त्याची सर्वत्र निंदा होते परंतु माओने केलेल्या हत्याकांडा बद्दल कोणी सहसा ब्र सुद्धा काढत नाही. इतिहासतज्ञ फ्रँक डिकॅटूर ह्यांच्या मते चेअरमन माओने चीनी प्रजेच्या सामुदायिक रितीने केलेल्या हत्या ह्या हिटलरने केलेल्या ज्यूंच्या हत्याकांडा पेक्षा कितीतरी पटीने अधिक होत्या. दुसऱ्या महायुद्धात सरसकट साडे पाच कोटी सैनिक मारले गेले तर चीनमध्ये एकट्या माओने साडे चार कोटी लोकांची हत्या केली. ह्या हत्या लोकांचे हाल हाल करून अत्यंत क्रूरपणे केलेल्या आहेत. त्यातली बरीच हत्याकांडे ही चीन मध्ये १९५८ ते १९६२ सालात दुष्काळ पडला तेंव्हा झालेली आहेत. गावेच्या गावे त्याने मारून टाकली. त्याने बहुतेक गावांचे अन्न आणि पाणी पुरवठा बंद करून टाकला. गावात राहणारी सर्व जनता अन्न-पाण्यावाचून तडफडून मेली. फ्रँक डिकॅटूर ह्यांनी लिहिलेल्या "Mao's great famine: China's most devastating catastrophe" पुस्तकात माओ बद्दल जगाला माहीत नसलेली बरीच महिती सांगितली आहे. माओच्या नरसंहारामधून कोणीही सुटले नाही. लहान मुले, स्त्रिया, वृद्ध सर्वांना एकच न्याय. छोट्या छोट्या चुकांनासुद्धा भयंकर शिक्षा देण्यात आल्या. माओच्या कारकिर्दीत चीन एक प्रबळ राष्ट्र म्हणून पुढे आले पण त्याच्यामागे भयंकर काळा इतिहास दडलेला आहे. चीनची भिंत फार प्रसिद्ध आहे. तशीच एक अदृष्य सरंक्षक भिंत चीनच्या सरकारने बांधून घेतली आहे. ती भिंत ओलांडून चीन मधल्या अंतरस्थ बातम्या बाहेरच्या जगात येत नाहीत. त्यामुळे माओने केलेला किंवा तिआनान मेन चौकातील नरसंहार पूर्ण सत्य स्वरूपात बाहेर येत नाही.

एका सधन शेतकऱ्याचा मुलगा चीनचा सर्वेसर्वा बनला आणि त्याने पंचवीस वर्षांपेक्षा जास्त वर्षे चीनवर सत्ता गाजवली. १८९३ मध्ये जन्मलेला हा मुलगा १९११ मध्ये सन यात सेनच्या अधिपत्याखाली राज्यसत्तेविरुद्ध सुरू झालेल्या क्रांतीत सामील झाला. १९१२ मध्ये राज्यसत्ता उलथवून देऊन सन यात सेनने चीनचे नवे प्रजासत्ताक राज्य स्थापन केले. १९२१ मध्ये माओ व त्याच्या सहकाऱ्यांनी सोव्हिएट रशियाच्या कम्युनिझमच्या तत्व प्रणालीवर प्रेरित होऊन त्याच धर्तीवर चीन मध्ये चीनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. हळू - हळू पक्षाने देशात घट्ट पाय रोवायला सुरुवात केली. त्यांचे प्राबल्य वाढू लागल्यावर सन यात सेन ह्यांना त्यांचे धोरण बदलावे लागले व

त्यांच्या कू ओमिनतांग पक्षाने कम्युनिस्ट पक्षा बरोबर सहकार्य करण्याचे धोरण अवलंबले. सन यात सेनच्या मृत्यूनंतर सर्व समीकरणे बदलली गेली. चँग काय शेकने पदाभार आपल्या हातात घेतला. सुरुवातीपासूनच तो हात धुवून कम्युनिस्टांच्या मागे लागला. त्यांना तुरूंगात डांबून त्यांचा छळ करणे, जमल्यास ठार मारणे इत्यादी उद्योग त्याने आरंभले. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी शहाणपणा करून जिआंगक्सी पर्यंत माघार घेतली व तेथेच तळ ठोकला. तेथे त्यांनी परत जमवाजमव करून त्या भागात कम्युनिस्टांचे प्रजासत्ताक राज्य स्थापन केले. माओ ह्या राज्याचा चेअरमन झाला. नवीन राज्यात गनिमी काव्याने लढणारे शूर योध्ये तयार केले. जे त्यांना विरोध करतील त्यांना छळ करून मारून टाका असे आदेश दिले गेले. त्यांचे राज्य हळू – हळू विस्तारू लागले. चँग काय शेकला हा मोठा हादरा होता. त्याने दहा लाख सैन्यानिशी कम्युनिस्ट राज्याला वेढा घातला. माओने माघार घेण्याचा निर्णय घेतला आणि एक लाख कम्युनिस्ट ह्या भागातून बाहेर पडले आणि आठ हजार मैलांचा खडतर प्रवास करून बारा महिन्यांनी यानन गावी जेथे कम्युनिष्टांचा बालेकिल्ला होता तेथे पाहोचले. हा खडतर प्रवास बऱ्याच जणांना झेपला नाही. एक लाखापैकी फक्त तीस हजार लोकच याननला पोहोचले. हा खडतर प्रवास लाँग मार्च म्हणून प्रसिद्ध झाला आहे. माओ आणि त्याचे साथीदार चँग काय शेकच्या कचाट्यातून सुटले व यानन येथे आले आहेत ही बातमी वाऱ्या सारखी सर्वत्र पसरली आणि बरीच तरूण मंडळी तेथे जमा झाली. त्यांच्यावर आपल्या वक्तृत्वाची मोहिनी पाडून माओने त्यांना आपल्या पक्षात सामील करून घेतले.

१९३७ मध्ये चँग काय शेक जपान बरोबरचे युद्ध हरू लागला तेंव्हा त्याने माओ बरोबर तडजोड केली. माओने सैन्याधिपतीचे सर्व अधिकार आपल्या हातात घेतले आणि जपान बरोबरचे युद्ध जिंकले. आता त्याची नजर सर्व चीनची सत्ता गिळंकृत करण्यावर लागली. १ ऑक्टोबर १९४९ ह्या दिवशी माओचे झालेले प्रसिद्ध भाषण तिआनान मेन चौकातूनच केले. सबंध चीन देशातून १० लाख जनसमुदाय त्याचे भाषण ऐकायला आला होता. माओच्या प्रभावी वक्तृत्वाने सर्व भारावले गेले होते. त्यातून १९४९ सालचे तिआनान मेन चौकातले रक्तरंजीत यादवी युद्ध झाले. चँग काय शेक आणि त्याचे साथी तैवानला पळून गेले आणि तेथे चीनचे प्रजासत्ताक राज्य (रिपब्लीक ऑफ चायना) स्थापन केले.

माओच्या हातात सर्व सत्ता आल्यावर त्याने धडाक्याने सुधारणा करण्यास सुरुवात केली. साम, दंड व भेद ही सर्व अस्त्रे वापरून त्याने सुधारणा केल्या. त्यामध्ये जमीन सुधारणा, स्त्रियांना

हक्क, आरोग्य शिक्षण इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. ज्यांनी त्याला विरोध केला ते सर्व विरोध क्रूरपणे मोडून काढले. एवढे करूनही लोकांच्या मनात साशंक भाव होता. म्हणून त्याने शंभर फुले नावाची मोहीम उघडली. (Hundred Flowers campaign) त्याद्वारे समाज त्यांच्या कल्पना सांगू शकत होते. पण लोकांनी कल्पनांपेक्षा माओवर प्रखर टिका केली. आपल्या हातून सत्ता जाणार ह्या भयाने माओला ग्रासले आणि त्याने लाखो लोकांना धर पकड करून तुरूंगात डांबले.

नंतर त्याने महान झेप नावाची मोहीम चालू केली. शेती व उद्योग धंद्यामध्ये भरभराट करण्याचे स्वप्न होते. परंतु दैवाचा खेळ विचित्र होता. महापुराचे संकट आले. शेतीचे आणि पोलादाचे उत्पादन व्हावे तसे झाले नाही. मग महाभयंकर दुष्काळ पडला. दुष्काळात माओने चार कोटी पेक्षा जास्त लोकांचा संहार केला. ह्या सर्व कारणामुळे महान झेप फोल ठरली. माओचे महत्व कमी झाले. पंचवीस वर्षे अमर्याद सत्ता भोगणारा माओ बाजूला पडला. परंतु फक्त चारच वर्षांनी माओने परत तरूण पिढीला हाताशी धरले. त्याचा कयास बरोबर ठरला. तरूण पिढीची स्मृती अल्पकाळ टिकते. त्याप्रमाणे माओचे महान झेपचे अपयश विसरून तरूण पिढी परत त्याच्या नादी लागली. पुढली दहा वर्षे त्याने सत्ता आपल्या हातात ठेवली. त्या दहा वर्षात माओने चीनी लोकांच्या स्वातंत्र्याची संपूर्ण गळचेपी केली. त्यांना कसलेच स्वातंत्र्य नव्हते. सर्वांनी फक्त राखी किंवा निळ्या रंगांचेच कपडे परिधान करायचे, एकाच ठेवणी प्रमाणे केस कापायचे, इत्यादी निर्बंध लोकांवर लादले. शहरातल्या सर्व शाळा बंद करून टाकल्या. सर्व बुद्धिवान विद्यार्थ्यांना खेड्यात पाठवून कष्टकरी जीवन शिकण्यास भाग पाडले. बुद्धिवान समाज आपल्या हातून सत्ता बळकावून घेईल अशी त्याला नेहमीच धास्ती वाटत होती. त्यामुळे बुद्धिवान समाजाचे त्याने आतोनात हाल केले. बरेच शिक्षक, प्राध्यापक ह्यांच्या हत्त्या केल्या. चीनच्या संस्कृतीचा समृद्ध वारसा नष्ट करून टाकला. कुटूंबावस्था पार नष्ट करून टाकली. चीनची अर्थव्यवस्था साफ कोलमडली. सर्वत्र अंदाधुंदी माजली. पण माओला त्याची फिकीर नव्हती. माओच्या मृत्यू पर्यंत त्याचा मनमानी कारभार व हम करेसो कायदा चालू होता. त्याची समाजावरील पकड व दहशत एवढी होती की त्याच्या मृत्यूनंतर दोन वर्षे पर्यंत त्याच्या विरुद्ध बोलायला लोक घाबरत होते.

माओच्या मृत्यूनंतर चीन सरकारने माओच्या तत्वप्रणाली पासून संपूर्ण घुमजाव केले असून लोकांवरचे निर्बंध बरेच सैल केले आहेत. डेंग ह्यांच्या नेतृत्वाखाली चीनने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केला आहे. गेल्या पंचवीस वर्षात चीनने नेत्रदिपक प्रगती केली आहे. २००८ मध्ये झालेल्या

ऑलिंपिक्सच्या वेळेस सर्व जगाने त्यांची प्रगती अनुभवली. आम्ही ज्या ज्या शहरातून फिरलो त्या त्या शहरातून त्यांच्या प्रगतीचे दर्शन होत होते. रूंद रस्ते, टोलेजंग इमारती, अद्ययावत दुकाने सर्वत्र दिसत होती. कोठेही कसलिही कमतरता भासत नव्हती. सर्व ठिकाणी कमालीची स्वच्छता होती. कामगार संघटना नाहीत त्यामुळे सरकार कामगारांकडून कामे करवून घेऊ शकत होते. चीनची लोकसंख्या अफाट. त्याचा त्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. सर्व कामे हाताने केली जात होती. रस्त्यावरची साफ सफाई कामगारांकडून हाती केली जात होती. त्यायोगे बऱ्याच कामगारांना रोजगार उपलब्ध झाला. आज चीन एक आर्थिक प्रबळ राष्ट्र असून आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत चीनला महत्वाचे स्थान आहे.

फॉरबिडन सिटीः पॅलेस म्युझीयमः

निआनानमेन गेट

तिआनान मेन दरवाजावरील इमारत

आम्ही तिआनान मेन गेट मधून पुढे गेलो तेथून फॉरबिडन सिटी सुरु होते. त्याला पॅलेस म्युझियम असेही म्हणतात. ह्या नगरीच्या भोवती चारी बाजूंनी २० फूट लांबीची व तेवढ्याच उंचीची तटबंदी आहे व तटबंदीच्या बाहेर २० फूट खोल व १७५ फूट रूंद खंदक आहे. खंदकावरचा पूल ओलांडून पलिकडे जावे लागते. त्या खंदकाला टाँग्झी नदी असेही म्हणतात. हा पूल ओलांडून आम्ही पलीकडे गेलो. आजुबाजूचा परिसर नीट दिसत नव्हता. वातावरण अजून ढगाळच होते. सूर्यराज आकाशात विराजमान झालेले असूनही आमच्यावर अजून प्रसन्न मात्र होत नव्हते. सर्वत्र धुके पसरलेले होते. लांबचे नीट दिसत नव्हते आणि फोटो पण व्यवस्थित येत नव्हते.

फॉरबिडन सिटीत जाण्याकरता मेरिडीयन गेटमधून प्रवेश घ्यावा लागतो. मेरिडीयन गेटसमोर आम्ही रांगेत उभे राहीलो. हा दरवाजा 'C' च्या आकाराचा आहे. त्याचेवर तीन मजली इमारत आहे. बाहेर तिकीटाची खिडकी आहे. कँडीने आम्हाला आमची तिकीटे व चीनी भाषेतील एक नकाशा आणून दिला आणि ती गायब झाली. आत जाण्यास मोठी रांग होती. आम्ही आंत जाण्याच्या वाटेवर उभे होतो. त्याच्या दोन्ही बाजूला दगडी फरशा बसवलेल्या होत्या. दोन फरशांच्या भेगेतून गवत उगवलेले होते. काही कामगार लहान कोयती सारखे हत्यार वापरून ते गवत उकरून काढत होते. अमेरिकेत असे वाढलेले गवत रसायने वापरून मारून टाकतात. पण चीनने तसे न करता दोन माणसांना काम दिले व रोजगार वाढवला.

'C' च्याआकाराच्या मेरिडीयन दरवाजाची डावी कडची बाजू

सामान्य जनतेला आंत जाण्यास बंदी असल्यामुळे ह्या नगरीला फॉरबिडन सिटी म्हणतात. फॉरबिडन सिटी म्हणजे मिंग राजघराण्या पासून चींग राजघराण्या पर्यंत सम्राटांचे राहण्याचे ठिकाण. त्यांचे बरोबर त्यांचे नातेवाईक, काही सरदार, नोकर चाकर व इतर गोतावळा येथे रहात असे. ह्या नगरीचे बांधकाम इ. स. १४०६ मध्ये सुरू होऊन ते इ. स. १४२० पर्यंत चालू होते. ह्या नगरीचा परिसर १८० एकर असून त्यात एकंदर ९८० इमारती बांधल्या आहेत. म्हणून ह्याला राजवाडा न म्हणता राजनगरी म्हणतात. ह्या इमारती म्हणजे त्या काळातील स्थापत्य शास्त्राचा उत्तम नमुना आहेत. लाकडी बांधकाम व त्यावर केलेले सुंदर कोरीव काम फारच सुरेख आहे. मुख्य इमारती मध्यभागी एका मागे एक उभ्या आहेत. दोन इमारतींमध्ये मोठी फरसबंद प्रांगणे आहेत. प्रांगणांच्या सभोवती अनेक इमारती आहेत ज्यातून इतर सरदार, त्यांची कार्यालये, पहारेकरी ह्यांची व्यवस्था केलेली आहे. ही सर्व नगरी आखीव, रेखीव आहे. त्याची भव्यता, प्रमाणबद्धता विस्मयजनक आहे. ह्या नगरीची मांडणी चौकोनाच्या किंवा आयताच्या आकारात केलेली आहे. आयताच्या आकाराचे दरवाजे, प्रांगणे, इमारती, सर्व नगरी आयताच्या आकारात बसवलेली आहे. फॉरबिडन सिटीला चीनी भाषेत झिजीन चेंग असे म्हणतात. झि म्हणजे लाल मातीचा रंग. जो ध्रुव ताऱ्याचा रंग. ध्रुव ताऱ्याला चीनमध्ये झीवी तारा असे म्हणतात. चीनी लोकांचा असा समज आहे की ध्रुव ताऱ्यावर स्वर्ग असून स्वर्गीय लोक व सम्राट तेथे राहतात. त्याचप्रमाणे पृथ्वीवरचे सम्राट ह्या नगरीत (फॉरबिडन सिटी)

राहतात. म्हणून लाल निषिद्ध नगरी असेही म्हणतात. झि म्हणजे लाल, जीन म्हणजे निषिद्ध व चेंग म्हणजे नगरी.

मींग घराण्यातला झु दी हा जेंव्हा सम्राट झाला तेंव्हा त्याने त्याची राजधानी नानजींगहून बेइजींग येथे हलवली व ही नगरी बांधण्यास घेतली. झु दीने सम्राट झाल्यावर योंगल – 'चिरंतन सुख' हे नांव धारण केले. १४ वर्षे ह्या नगरीचे बांधकाम चालू होते. मींग घराण्याच्या १४ व चींग घराण्याच्या १० सम्राटांनी ह्या वास्तूत वास्तव्य केले. सम्राट पुयी हा चीनचा शेवटचा सम्राट व ह्या वास्तूत वास्तव्य करणारा शेवटचा सम्राट. राजमाता झुशी हिने सम्राट पुयी ह्याला १९०८ मध्ये सिंहासनावर बसवले. झुशी ही महा भयंकर कारस्थानी स्त्री होती. नाना उपद्व्याप करून ती स्यानफेंग ह्या सम्राटाची मुख्य रखेली झाली. सम्राटापासून तिला मुलगा झाला. सम्राट निधन पावल्यावर तिने स्वतःच्या मुलाला सिंहासनावर बसवून ती सर्व कारभार पहात असे. झुशीला प्रजेशी काही देणे घेणे नव्हते. कराच्या रुपाने ती प्रजेकडून बराच पैसा उकळत असे व तो सर्व पैसा स्वतःच्या चैनीवर खर्च करत असे. प्रजेचे कल्याण किंवा सुधारणा, राज्यकारभार ह्या सर्व बाबतीत तिने दुर्लक्ष्य केले. तिच्या मुलास हे पसंत नव्हते. त्याने राज्यकारभारात लक्ष घालून सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. आपला मुलगा आपल्या हाताबाहेर गेल्याचे लक्षात आल्यावर ह्या बाईने त्याला कैद करून समर पॅलेसमध्ये डांबून ठेवले आणि पुयी ह्या ३ वर्षाच्या लहान बालकाला सिंहासनावर बसबिले. पण त्यानंतर लगेचच ती मृत्यू पावली. १९१२ मध्ये चीन मध्ये प्रजासत्ताक राज्य स्थापन झाले. सम्राट पुयीला पदत्याग करणे भाग पडले. पुयी हा चीनचा शेवटचा सम्राट. १९२४ पर्यंत सम्राट पुयीचे ह्या नगरीत वास्तव्य होते. त्याला आतील एका इमारतीवजा राजवाड्यात राहण्यास अनुमती होती. बाहेरील सर्व भागात सरकारी कर्मचाऱ्यांची कार्यालये व राहण्याची व्यवस्था केली होती. १९२५ मध्ये फॉरबिडन सिटीचे नॅशनल पॅलेस म्युझीयममध्ये रुपांतर झाले. त्यामुळे पुर्वी जेथे सर्व सामान्य जनतेला प्रवेश बंदी होती ती नगरी आता सर्वांना खुली झाली. असंख्य नागरीक आणि पर्यटक येथे भेट देतात.

आम्ही मेरिडीयन दरवाजातून आत गेलो. मेरिडीयन दरवाजाला वू–मेन म्हणतात. येथून सम्राटांच्या हुकूमांच्या घोषणा केल्या जात असत. राजाच्या नगरीत प्रवेश करण्याकरता ह्या दरवाजाला ५ कमानी असून मधली कमान फक्त सम्राटां करता राखून ठेवलेली असे. दरवाजावर तीन मजली इमारत असून तीचे सभागृह ९ खण लांब व ५ खण रूंद आहे आणि वर दुहेरी छप्पर आहे.

येथून सम्राट आपल्या सैन्याचे निरिक्षण करत असत. ह्या दरवाजाला 'पाच फिनिक्स पक्षांचा मनोरा' असे म्हणतात. आत गेल्यावर प्रथम बरेच मोठे प्रांगण आहे. दरवाज्यातून आतल्या बाजूस आल्यावर १० पायऱ्या उतरून प्रांगणात जावे लागते. बाहेर जसा खंदक आहे तसाच आत पाण्याचा छोटा नाला सर्वत्र फिरवलेला आहे. त्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे अग्नीपासून संरक्षण आणि दुसरे कारण म्हणजे सजावट. ह्या नाल्याला गोल्डन रिव्हर – सोनेरी नदी – म्हणतात. त्यावर ५ संगमरवरी पूल बांधले आहेत. हे ५ पूल कंफ्यूसियसने शिकवलेल्या ५ सद्गुणांचे प्रतिनिधीत्व करतात. हे पांच सद्गुण म्हणजे १ उपकारबुद्धी, २ प्रामाणिकपणा ३ संस्कार ४ बुद्धिमत्ता आणि ५ भक्ती. कंफ्यूसियस हा इ. स. पूर्व ५०० सालात चीनमध्ये मोठा तत्वज्ञानी होऊन गेला. त्याने शिकवलेली नैतिक मुल्ये फार प्रसिद्ध झाली आहेत. येथेही मधला पूल फक्त सम्राटांकरताच होता. बाकीचे चार पूल इतर सरदार व सम्राटांचे कुटूंब वापरत. प्रांगणाच्या दोन्ही बाजूला इमारती आहेत. तेथे पहारेकरी व इतर सरदार असत.

मेरिडीयन दरवाजातून दिसणारे प्रांगण, समोर सर्वोच्च सुसंवादाचा दरवाजा दिसत आहे

प्रांगण ओलांडून पुढे गेले की सर्वोच्च सुसंवादाचा दरवाजा आहे. ह्या नगरी मधील हा सर्वात मोठा दरवाजा. त्याची रूंदी तीन खण आणि लांबी सात खण आहे. ह्यांना दरवाजे म्हणतात पण खऱ्या त्या इमारतीच. आधीच्या दोन दरवाजांप्रमाणे ही पण इमारतच आहे. तीन दरवाजे ओलंडल्यानंतर राजनगरीत प्रवेश मिळतो. ही सरंक्षक योजना होती.

गोल्डन रिव्हर वर बांधलेले संगमरवरी पूल, दोन पूल दिसत आहेत

कोणीही एकदम आंत शिरू शकत नाही. तसेच सर्व इमारतींचे पाये खणतांना एकात एक असे तीन किंवा चार तर कधी सात पाये खणतात. जमिनी खालून बोगदा खणून आत येण्याला प्रतिबंध म्हणून ही खबरदारी. सर्वोच्च सुसंवादाच्या दरवाजाला ताइहेमेन म्हणतात. मींग राजघराण्याच्या काळात हा दरवाजा बांधला गेला. तेंव्हाचे सम्राट सकाळचा दरबार येथे भरवत असत. चींग घराण्याकडे सत्ता आल्यानंतर त्यांनी आतल्या सभागृहात दरबार भरवण्यास सुरुवात केली.

नाइहे दियान - सर्वोच्च सुसंवादाचे सभागृह

नाइहेदियान इमारतीसमोर आम्ही सर्व

नाइहेदियानच्या इमारतीवरील नक्षिकाम

ताइहेमेन किंवा सर्वोच्च सुसंवादाचा दरवाजा ओलांडून पुढे गेले की समोर भव्य सर्वोच्च सुसंवादाचे सभागृह आहे. मध्ये मोठे प्रांगण आहे. चीनी भाषेत ह्या सभागृहाला ताइहेदियान म्हणतात. संगमरवरी चौथऱ्याच्या तीन स्तरांवर ही इमारत उभी आहे. प्रत्येक स्तरावर संगमरवरी नक्षीकाम केलेली भिंत आहे. ही इमारत ९ खण लांब व ५ खण रूंद आहे. ९ व ५ हे आकडे सम्राटांचे प्रतीक म्हणून वापरले जातात. लाकडी कोरीव कामाचा उत्कृष्ट नमूना येथे बघण्यास मिळतो. ही इमारत चीन मधील सर्वात मोठी लाकडी इमारत म्हणून प्रसिद्ध आहे. राजघराण्यांच्या राज्यरोहणाचे, लग्नसमारंभाचे व इतर धार्मिक कार्यक्रम येथे व्हायचे.

ह्या इमारतीच्या चहुबाजूला प्रचंड धूपपात्रे आहेत. त्यामध्ये कासव, हत्ती, करकोचा इत्यादी आकाराची धूपपात्रे आहेत व सूर्य प्रकाशाच्या सावलीने वेळ दाखवणारे घड्याळ आहे. त्या काळातही सम्राटांनी वेळेचे भान ठेवले होते.

ताइहेदियान इमारतीच्या चहूबाजूला असलेली प्रचंड धुपपात्रे

कासवाकृती धुपपात्र

सौरघड्याळ

करकोचाच्या आकाराचे धुपपात्र

इमारतीच्या आतल्या सभागृहात ७२ खांब आहेत व त्यामध्ये सिंहासन आहे. हे सिंहासन ६ फूट उंचीच्या चौथऱ्यावर बसलेले आहे. सिंहासनाच्या भोवतालचे सहा खांब सोन्याने मढवलेले आहेत. शेवटच्या दोन खांबांवर सोनेरी ड्रॅगन कोरलेले आहेत. त्यांच्यामध्ये सिंहासन बसलेले आहे. सिंहासनाच्या आजुबाजूचा भाग सोन्याने मढवलेल्या ड्रॅगनच्या कलाकृतींनी सजवलेला आहे. मागे लाकडी पडद्यावर व छतावर छान नक्षिकाम केलेले आहे. बाकी कसेही असले तरी ह्या सम्राटांची सौंदर्य दृष्टी वाखाणण्यासारखी आहे.



ताइहेदियानमधले सिंहासन

ताइहेदियान किंवा सर्वोत्तम सुसंवादाचे सभागृह ओलांडून पुढे गेल्यावर एक छोटे सभागृह आहे. ह्याचा आकार चौकोनी असून ५ खण लांब व ५ खण रूंद आहे. ह्याला हॉल ऑफ द सेंट्रल हारमनी किंवा चीनी भाषेत झोंगे दियान म्हणतात. हे सभागृह म्हणजे सम्राटांचे खाजगी गृह. येथे सम्राट विश्रांती घेत असत. मुख्य सभागृहात होणाऱ्या समारंभांची तालीमही ते येथे करत असत. मंत्र्यांच्याबरोबर गुप्त खलबते येथे होत. पूर्वी दरवर्षी बळी देण्याची प्रथा होती. तो विधी करण्या आधीचे शोकपूर्ण भाषण सम्राट येथून करत असत. येथेही एक सिंहासन आहे.

हॉल ऑफ द सेंट्रल हारमनी

नंतर आहे हॉल ऑफ द प्रिझर्वड हारमनी किंवा चीनी भाषेत बौहे दियान.

हॉल ऑफ द प्रिझर्वड हारमनी

ही वास्तू सर्वोत्तम सुसंवादाचे सभागृहाचे लहान स्वरूप आहे. सम्राज्ञी किंवा युवराज ह्यांचे नाव घोषीत करण्या आधी सम्राट कपडे बदलण्यास येथे येत असत. ह्या वास्तूत शाही मेजवान्या दिल्या जात असत. सम्राटांच्या व राज्यातले अधिकारी निवडण्याच्या परिक्षा येथे दर तीन वर्षांनी घेतल्या जात असत. पुर्वी त्या सर्वोत्तम सुसंवादाच्या सभागृहात होत असत. चिंगलॉंग नावाच्या

सम्राटाने त्या परिक्षा येथे घेण्यास सुरुवात केली. उत्तीर्ण झालेल्यांपैकी पहील्या दहा उमेदवारांना सम्राट बक्षिस देत असे व त्यांच्या उत्तर पत्रिका सर्वांना वाचून दाखवत असे.

हॉल ऑफ द प्रिझर्वड हारमनी मधील सिंहासन

मागच्या बाजूला जो जिना आहे त्याच्या मध्यावर उतार करून त्यावर संगमरवरी दगडापासून केलेले कोरीव काम आहे. हे कोरीव काम एका दगडातून केले आहे. ह्या दगडाची लांबी ५० फूट, रूंदी १० फूट व जाडी ५ फूट असून त्याचे वजन जवळ जवळ २५० टन आहे. मींग घराण्याच्या काळात केलेले कोरीव काम पुसट झाल्यामुळे इ. स. १७६१ मध्ये परत कोरीव काम करण्यात आले. त्याच्या मध्यावर ९ ड्रॅगन, पायथ्याशी पाण्याच्या उसळणाऱ्या लाटा व सभोवती कमळाची वेलबुट्टी असे डिझाईन कोरलेले आहे. ह्या नगरीतील सर्वात मोठे कोरीव काम असा किताब ह्या दगडाने मिळवला आहे.

हा दगड बेइजींग पासून ५० मैलावर असणाऱ्या फँगशान नावाच्या गावातून आणला. एवढा जड दगड उचलून आणणे शक्यच नव्हते. त्यावर उपाय म्हणून हा दगड हिवाळ्यात आणला गेला. वाटेत पाणी शिंपडून त्याचा बर्फ झाला की त्यावरून ओढण्यास सोपे जाई. असे करत करत हा दगड बेइजींगला आणण्यात आला व मग त्यावर कोरीव काम करून येथे बसवण्यात आला.

पायऱ्यांच्यामध्ये असलेल्या उतरंडीवर असलेला हा प्रचंड दगड
व त्यावरचे कोरीव काम

त्यानंतर लागला स्वर्गीय पवित्रतेचा दरवाजा चीनी भाषेत चिआंगीन मेन. येथून सम्राटांचे अंतःपूर सुरू होते.

स्वर्गीय पवित्रतेचा दरवाजा

दरवाजा समोर दोन सिंहांचे ब्राँझपासून बनवलेले पुतळे आहेत. हे सिंह ह्या वास्तूचे संरक्षण करतात. ह्या सिंहांचे कान खाली पडलेले आहेत. हे कान येथे लक्ष्मण रेषा असल्याचे दर्शवतात. त्याचा अर्थ, बाहेरच्या लोकांनी राजाच्या अंतःपुरात व अंतःपुरातील लोकांनी राजाच्या राजकारणात ढवळाढवळ करू नये. तसेच ह्या दरवाजाच्या बाजूला ४ मोठे रांजण ठेवले आहेत. त्यात नेहमी पाणी भरून ठेवलेले असते. सजावटी बरोबरच हे रांजण आगीपासून संरक्षण करण्याकरता पाणी राखून ठेवतात. थंडीत पाणी गोठले तर खाली विस्तव लावण्याची सोय पण केलेली आहे. संपूर्ण नगरीत अशी ३०० च्यावर रांजणे आहेत. फक्त सम्राटांच्या अंतःपुराबाहेरची रांजणे सोन्याने मढवलेली आहेत. बाकीची रांजणे ब्राँझची आहेत. १९०० साली युरोपियन देशांनी चीनवर हल्ला केला होता, तेंव्हा त्यांनी ह्या सिंहावरचे आणि रांजणावरचे सोने ओरबाडून नेण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्या खुणा अजून ह्या वस्तूंवर दिसतात.

स्वर्गीय पवित्रतेच्या दरवाजा समोरचे सिंह, ह्यांचे कान खाली पडलेले आहेत

दरवाजाच्या बाजूला असणाऱ्या भिंतींवर छान वेलबूट्टीचे नक्षिकाम केलेले आहे. ह्या दरवाजातून पुढे गेल्यावर स्वर्गीय पवित्रतेचा राजवाडा किंवा चीनी भाषेत चिआंगीन गाँग. हे सम्राटांचे राहण्याचे ठिकाण. ही वास्तू सर्वोत्तम सुसंवादाच्या सभागृहाची लहान आवृत्ती आहे.

स्वर्गीय पवित्रतेचा राजवाडा

फॉरबिडन सिटी - पाण्याचे रांजण

सम्राटांच्या अंतःपुरातील सिंहासन

मींग घराण्यातले सम्राट येथे बरेच व्यवहार करत असत.

त्याच्या पुढील आणखी दोन दालने सम्राटांच्या दिमतीला होती. एकाचे नांव आहे संघशक्तीचा राजवाडा व दुसऱ्या दालनाचे नांव आहे ऐहिक शांततेचा राजवाडा. पुढे राजाचे उद्यान आहे. राजनगरीच्यामानाने उद्यान फारच लहान वाटले.

फॉरबिडन सिटी उद्यान

ह्या उद्यानात इतरत्र न मिळणारी काही झाडे आहेत, खडकांच्या विशिष्ट रचना, काही प्राण्यांचे पुतळे इत्यादी गोष्टी आहेत.



फॉरबिडन सिटी उद्यान

ही राजनगरी बघून आम्ही गेट ऑफ द डिव्हाइन प्रॉवेस मधून बाहेर पडलो. तेथे आम्हाला कॅंडी परत भेटली. बाहेर छान तळे होते. कॅंडी आमच्या करता चायनीज टोप्या घेऊन आली होती. त्या घालून काही फोटो घेतले.

चायनीज टोप्या घालून शशी व सुलभा

राजनगरीतून बाहेर आलो पण अजून आम्ही त्याच विश्वात वावरत होतो. ते सम्राट, त्यांचे सरदार, त्यांच्यापुढे नतमस्तक होऊन वावरणारे त्यांचे सेवक, महाराण्या, "तुम्हाला उद्या मसाज करून हवा आहे का?" कँडीने विचारले आणि भानावर आलो. कँडीच्या ओळखीची एक स्त्री मसाज करते.

ती आमच्या हॉटेलच्या खोलीत येऊन प्रत्येकी २०० युआन घेऊन आम्हाला मसाज करणार होती. तिला दुसरे दिवशी सकाळी ९ वाजता बोलावले. आम्हाला परत टॉंग्झी नदीचा खंदक ओलांडून पलिकडे यावे लागले. तेथे आम्हाला आमच्या ड्रायव्हरने पिक अप केले. आमचा पुढचा स्टॉप होता मोती बझार. बझारमध्ये आत गेल्यावर कँडीने आम्हाला तिथे काम करणाऱ्या एका स्त्रीच्या ताब्यात दिले आणि ती परत गायब झाली. त्या स्त्रीने आम्हाला मोती कोठे व कसे तयार होतात व ते कसे काढतात इत्यादी माहिती दिली. नंतर खरा मोती व खोटा मोती कसा ओळखाल त्याचीही माहिती दिली. तेथे एका मोठ्या टाकीत बरेच शिंपले ठेवलेले होते. तिने सुलभाला एक शिंपला काढून द्यायला सांगितला. सुलभाने तो काढून दिल्यावर तिने तो उघडला आणि "यु आल व्हेली लकी" म्हणून एक आरोळी ठोकली. आम्ही जरा चमकूनच तिच्याकडे बघितले. तिने लवकरच खुलासा केला. तिने उघडलेल्या शिंपल्यात तीन मोती होते. बरेच वेळा अजिबात मोती मिळत नाहीत पण तुमच्या शिंपल्यात तीन मोती आले. यु आल लकी. म्हणजे आम्हाला पुढे कापायची पूर्वतयारी. कारण तिने आम्हाला नंतर त्यांच्या मोत्यांच्या दुकानात नेले. अर्थात तिथल्या किमती बघून आम्ही काहीच खरेदी केली नाही. आम्ही परत आमच्या व्हॅन मध्ये येऊन बसलो.

कँडीने आमच्या कानात कुजबूज करून आपण आता इल-लीगल मार्केट मध्ये जात आहोत असे सांगितले आणि आम्हाला घेऊन एका शॉपिंग मॉलच्या तळघरात असलेल्या पार्कींग लॉट मध्ये ती घेऊन गेली. तेथे एक छोटे दुकान होते. कँडीने परवलीचा शब्द उच्चारल्यावर 'तिळा तिळा दार उघड' म्हटल्यावर उघडतो तसा त्या दुकानाचा दरवाजा उघडला गेला आणि आम्हाला आंत घेऊन लगेचच बंद झाला. इल-लीगल मार्केट म्हणजे स्मगल केलेल्या वस्तूंचे दुकान. तेथे बऱ्याच वस्तू होत्या. तेथे दोन गॉल्फच्या बॅगस् होत्या. त्यात दोन तीन वेग वेगळ्या कंपन्यांचे सेटस् एकत्र झाले होते. शशीने ते सर्व नीट वेगळे केले. त्याबद्दल दुकानदाराने शशीला एक क्लब (५ वूड) भेट म्हणून दिला. उरलेल्या प्रवासात शशीने त्याची नीट काळजी घेतली. त्याच्या करता वेगळे पॅकींग तयार केले. आम्ही त्या क्लबला शशीचे पिल्लू म्हणत असू. सुलभा नेहमी तक्रार करायची कि 'माझी पण त्याने एवढी काळजी कधी घेतली नसेल'. तेथे थोडी खरेदी करून बाहेर पडलो. परत तोच अनुभव आला. आम्हाला सर्वांना ५ सेकंदात बाहेर काढून दरवाजा परत बंद.

टेंम्पल ऑफ हेवनः

इल–लीगल मार्केट पासून चालत टेंम्पल ऑफ हेवनला गेलो. ह्या देवळाचे आवार प्रचंड मोठे आहे. ३,५२९,४१२ चौ. यार्ड एवढा त्याचा विस्तार आहे. फॉरबिडन सिटी पेक्षाही हा परिसर मोठा आहे.

टेंम्पल ऑफ हेवनच्या आवाराचा नकाशा

तिकीटे काढून आंत बरेच लांब चालत जावे लागते. चालत जातांना लांबून देऊळ दिसते. त्याच्या भव्यतेची जाणीव सुरुवातीपासूनच होते.

चालत जातांना लांबून दिसणारे देऊळ, दोन झाडांमधून देऊळ दिसत आहे

सम्राट योंगल, ज्याने फॉरबिडन सिटी बांधली, त्यानेच हे देऊळ बांधण्यास सुरुवात केली. नंतर मींग सम्राट जियाजींग व चींग सम्राट चिंगलॉग ह्यांनी ते विस्तीर्ण केले. येथे तीन देवळांचा समूह आहे. हॉल ऑफ प्रेयर फॅार गुड हार्वेस्ट (चांगले पीक येण्याकरता प्रार्थना करण्याचे सभागृह), इंपिरियल व्होल्ट ऑफ हेवन (स्वर्गाचा सर्वश्रेष्ठ घुमट), आणि सर्क्युलर माउंड अलटार (वर्तुळाकार वेदी).

देवळांच्या भोवती दोन तट आहेत. तटाचा उत्तर भाग अर्धवर्तुळाकृती आहे जो स्वर्गाचे प्रतिनिधीत्व करतो. तटाचा दक्षिण भाग चौकोनी आहे जो पृथ्वीचे प्रतिनिधीत्व करतो. रामायणात जशी स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांची सांगड घालण्यात आली आहे तसाच प्रकार. स्वर्गाचा तट पृथ्वीच्या तटापेक्षा उंच आहे. त्यातून असे सुचवायचे आहे की स्वर्ग हा पृथ्वीपेक्षा उच्च आहे. ह्या दोन तटांना जोडणाऱ्या बांधावर रस्ता बांधला आहे त्याला पवित्र मार्ग म्हणतात. तसेच उत्तम पीक येण्याकरता सम्राट येथे येऊन प्रार्थना करत असत. त्याला हॉल ऑफ प्रेयर फॅार गुड हार्वेस्ट असे म्हणतात. १९१८ पर्यंत सामान्य नागरिकांना येथे प्रवेश नव्हता.

संगमरवरी दगडाच्या तीन स्तरी चबुतऱ्यावर हे देऊळ बसलेले आहे. १९०० साली झालेल्या अफू युद्धात ह्या देवळाची युरोपियन देशांकडून बरीच नासधूस केली गेली.

टेम्पल ऑफ हेवन – हॉल ऑफ प्रेयर फॅार गुड हार्वेस्ट च्या समोर

वर्तुळाकृती ११० फूट व्यास असलेले हे मंदीर १२५ फूट उंच आहे. ह्या मंदीराची बांधणी लाकडाची असून एकही खिळा न वापरता केलेली आहे. पूर्वीच्या काळी सम्राट म्हणजे पृथ्वीवर उतरलेले स्वर्गीय पुत्र समजले जात. हे सम्राट वर्षातून दोन वेळा खास पोषाख घालून मिरवणूकीने येथे येत व पुजा करत. ही मिरवणूक व पूजा बघण्यास सामान्य नागरिकांना मज्जाव होता. त्या काळात असा समज होता की ही पुजा संपूर्ण उपचारासहीत कोणतीही उणीव न राहता व्हावी लागते नाहीतर त्या वर्षी पीक चांगले येत नाही. मंदीराच्या गाभाऱ्यात २८ खांब आहेत. आतल्या भागात ४ खांब आहेत जे ४ ऋतूंचे, मधल्या भागात १२ खांब आहेत जे १२ महिन्यांचे व बाहेरच्या भागात आणखी १२ खांब जे १२ शुभ वेळेंचे प्रतिनिधीत्व करतात. असे एकूण २८ खांब आहेत.

हॉल ऑफ प्रेयर फॉर हार्वेस्ट मंदिराचा गाभारा

ह्या मंदीराच्या दक्षिणेला इंपिरियल व्होल्ट ऑफ हेवन नावाचे छोटे मंदीर आहे. येथे सम्राट चांगल्या हवामानाकरता पुजा करत असे. हे मंदीर संगमरवरी चौथऱ्यावर असून गोल घुमटासारखा त्याचा आकार आहे.

सर्क्युलर माउंड अलटार (वर्तूळाकार वेदी): ही खरी यज्ञ वेदीच, कारण मींग घराण्या पासून येथे वर्षातून दोन वेळा बळी देण्याची प्रथा होती. बळी दिल्यानंतर त्या प्राण्यांना जाळत असत. त्याचा धूर स्वर्गात पोहोचून देव संतूष्ट होतात असा समज होता.

इंपिरियल व्होल्ट ऑफ हेवन

सर्क्युलर माउंड अल्टार (वर्तुळाकार वेदी):
हा फोटो गुगल वरून घेतला आहे

९ हा एक आकडी सर्वात मोठा आकडा असल्यामुळे तो सम्राटांचा अधिकार दाखवणारा आकडा समजला जाई. ह्या वेदीचा पाया तीन स्तरांवर रचलेला आहे. त्यावर ९ पायऱ्यांचे तीन जिने आहेत. प्रत्येक जिन्याच्या वरच्या पायरीवर ह्या वेदीच्या भोवती संगमरवरी गोल कठडे आहे. त्याला १२० खांब असे तीन जिन्यांचे ३६० खांब आहेत. वेदीच्या जमिनीवर फरशा बसवलेल्या आहेत. मध्यभागी गोल फरशी आहे, त्याला स्वर्गाची मुख्य फरशी किंवा सूर्य फरशी म्हणतात. त्याच्याभोवती असलेल्या पहिल्या वर्तुळात ९ फरशा बसवलेल्या आहेत. त्याच्यानंतरच्या वर्तुळात १८ फरशा प्रत्येक वर्तुळात ९ च्या पाढ्यात फरशा वाढत जाऊन शेवटच्या ९ व्या वर्तुळात ८१ फरशा आहेत. मधल्या सूर्य फरशीवर उभे राहून काही आवाज केला तर त्याचा प्रतिध्वनी त्याच जागेवर ऐकू येतो.

सध्या ह्या मंदीराच्या आवारात नागरिकांकरता बरेच प्रकल्प चालवण्यात येत आहेत. वयस्क व्यक्तींना येथे येण्याकरता अत्यंत माफक दरात वर्षाचा परवाना मिळतो. त्याचा फायदा घेऊन बरीच वयस्क मंडळी येथे येऊन वेळ घालवत होती. परतण्याच्या वाटेवर आम्ही ज्या रस्त्यावरून आलो त्या रस्त्यावर दोन्ही कडेला खांब उभारून मधले कठडे बरेच रूंद केले असून वर छप्परही बांधले होते. छपरावर सुंदर नक्षिकाम केलेले होते. ह्या कठड्यावर बसून बरीच वयस्क मंडळी वेळ घालवत होती. पत्ते, सोंगट्यांचे खेळ, गप्पा मारणे इत्यादी नानाविध प्रकार चालू होते.

परतण्याच्या वाटेवरचा रस्ता

कालच्याप्रमाणे आज आम्ही कसरतीचा खेळ बघण्यास जाणार होतो. जातांना बरीच रहदारी लागली. आमची व्हॅन त्या रहदारीने गच्च धरून ठेवली होती. आजचा खेळ सुरू होण्याआधी आम्ही पोहचू शकू की नाही अशी शंका वाटू लागली. पण आमच्या ड्रायव्हरने मुसंडी मारून आम्हाला बरेच वेळेत आणले. तरी पांच मिनीटे उशीरच झाला होता. कँडीने कालच्या प्रमाणे चालत्या व्हॅनमधून उतरून धावत जावून तिकीटे काढून आणली. आम्ही आत जाईतो खेळ सुरू झाला होता. हा खेळ म्हणजे स्टेजवर करण्यात येणारी छोटी सर्कस होती. खुर्चीवरचे बॅलंसिंग, टोप्या उडवून केलेले जगलिंग, रींग मधून उड्या मारणे असे अनेक प्रकारची कौशल्ये स्टेजवर करून दाखवली. नंतर स्टेजवर मृत्यू गोलाचा संच उभा केला. त्यामध्ये मोटारसायकल फिरवून दाखवणार ह्याची आम्हास कल्पना आली. आम्ही बघत असता दोन मोटारसायकली आत गेल्या. त्यांचे कौशल्य खरच वाखाणण्यासारखे होते. त्यांनी आडवी, उभी, उलट, सुलट रिंगणे धरून मोटार सायकली फिरवल्या. थोड्या वेळेत आणखी एक मोटार सायकल आली आणि त्यांच्याबरोबर रिगण धरून आंत फिरू लागली. तो गोल सर्व भरून गेला होता. आम्ही बघत असता आणखी एक मोटारसायकल आली. आम्ही विचार करत होतो की हिला आंत जायला जागा कोठे आहे. पण तेवढ्यात ती आत शिरली आणि आधीच्या मोटारसायकली समवेत तिने रिंगण धरले. त्या गोलात पांच मोटारसायकली फिरत

आहेत ह्यावर विश्वास बसत नव्हता. तीन मोटारसायकलींनी आडवे रिंगण धरले तर दोन मोटारसायकलींनी उभे रिंगण धरले आणि एकात एक गुंफून ते चालवत होते. ते दृष्य खरेच विस्मयजनक होते. एवढ्याश्या गोलात पांच मोटारसायकली फिरत होत्या. आम्ही अवाक् होऊन बघत असता आणखी तीन मोटारसायकली आल्या आणि प्रेक्षकांनी 'ओ माय गॉड' असेच उद्गार काढले. आता ह्यांना आत जायला जागा कोठे मिळणार. पण त्या आंत गेल्या आणि नंतर ८ मोटारसायकली आत फिरत होत्या. त्यांनी आडवी उभी ४५ अंश कोनात अशा रिंगणांची गुंफण केली. थोड्या वेळाने सर्व मोटारसायकलींचे दिवे लावले शिवाय त्यांच्यावर आणखी काही शोभेचे दिवे लावले होते ते लावून प्रेक्षकांमधले दिवे बंद केले. फक्त दिवेच आतमध्ये गर गर फिरताहेत असे वाटत होते. अ‍ॅटोमिक रचनेमध्ये न्युक्लीयस भोवती जसे इलेक्ट्रॉनस् फिरत असतात तसा प्रकार दिसत होता. हा खेळ संपल्यावर प्रेक्षकांनी खुर्च्यातून उभे राहून त्यांना टाळ्या वाजवून दाद दिली.

रात्री हॉटेलच्या खोलीवर परत आलो. आज दिवसभर आमच्यावर कृपाकरून न पडलेला पाऊस सुरू झाला. रात्री हॉटलवर थोडे खाऊन निद्रेच्या आधीन झालो.

बर्ड नेस्ट – चीनचे ऑलिंपिक स्टेडियमः नॅशनल स्टेडियमः

आजचा दिवस आम्ही स्वतंत्र होतो. आज टूर कंपनीबरोबर कोठे जायचे नव्हते, म्हणून मी आणि वर्षाने बर्ड नेस्ट बघायला जाण्याचे ठरवले. सकाळी मिसिसिपित स्काइप केला. घरी सर्व ठीक होते. न्याहारी करून परत खालीत आलो. ठरल्या प्रमाणे मसाज करणारी बाई आली. मसाज ठीक होता. त्या बाईशी बोलतांना काही गोष्टी समजल्या. अर्थात खरे खोटे माहीत नाही. मसाज करण्याचा व्यवसाय हा एक स्वेटशॉप आहे. मसाज करणाऱ्या बायका वर्षभर सुट्टी न घेता तुटपुंज्या पगारावर काम करत असतात. व्यवसायाचा मालक सर्व पैसे कमावतो. ही बाई महिना साधारण २००० युवान कमावते. तिचा नवरा लांब राहतो. तो पण अशाच स्वेटशॉपच्या कपडे शिवायच्या कंपनीत काम करतो. त्यांना ४ महिन्यांची मुलगी आहे. तिची आई मुलीचा संभाळ करते. तिला वर्षातून फक्त एकदाच मुलीला भेटायला जायला मिळते. हे सर्व खरे की खोटे माहित नाही. कदाचीत आमच्याकडून जास्त टिप उकळण्याच्या इराद्याने ही खोटी कथा सांगितली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मसाज झाल्यावर आवरून ऑलिंपिक स्टेडियम बघण्यास निघालो. आधी टॅक्सी करून जाण्याचा विचार केला. पण बेत बदलून रेल्वेने जाण्याचे ठरले. एक वेगळा अनुभव. हॉटेलच्या लॉबीतून नकाशा व सर्व माहिती आणली. हॉटेलच्या माणसाने बरीच माहिती दिली. लागणारी सर्व माहिती इंग्लीशमध्ये व चायनीज भाषेत होती. आम्हाला तीन गाड्या बदलून जावे लागणार होते. १ली गाडी ५ नंबर, २ री गाडी १० नंबर व ३री गाडी ८ नंबर. रेल्वे स्टेशन हॉटेल पासून पाव मैलावर होते. तेथे चालत गेलो. रेल्वेचे तिकीट फक्त २ युवान. २ युवानमध्ये तुम्ही कोठेही जाऊ शकता. तिकीट पातळ क्रेडिट कार्डासारखे होते. स्टेशन मध्ये जाताना छोटा स्कॅनर असतो त्यावर तिकीट स्कॅन करायचे. तिकीट बरोबर असेल तर आत जाण्याचा दरवाजा उघडतो व तुम्ही आत जाऊ शकता. आम्ही आत गेलो आणि योग्य दिशेने जाणाऱ्या प्लॅटफॉर्मवर उभे राहीलो. गाडी आल्यावर गाडीत चढलो. डब्यात दोन्ही बाजूला लांबच्या लांब बाके होती व मध्ये उभे राहण्याकरता बरीच मोकळी जागा. त्यामुळे बरेच प्रवासी उभे राहून प्रवास करू शकतात. गाडीच्या दारावर एक फलक असतो. त्यावर गाडीच्या मार्गाची व वाटेत लागणाऱ्या सर्व स्टेशनसूची नावे असतात व त्याचे समोर एक दिवा असतो. गाडीने जी स्टेशने पार केली आहेत ते दिवे लाल असतात पुढे येणाऱ्या स्टेशनचा दिवा

बागबुग करत असतो व पुढील सर्व दिवे हिरव्या रंगाचे असतात. त्यावरून गाडी सध्या कोठे आहे व पुढचे स्टेशन कोणते येणार ह्याची माहिती कोणालाही न विचारता कळते.



रेल्वे गाडीच्या दारावर अशी पाटी असते त्यावरून गाडी सध्या कोठे आहे ते समजते

स्टेशनवर एक प्रचंड काचेची भिंत उभी केलेली असते. त्यामुळे कोणीही गाडी येण्याआधी पुढे जाऊन डोकवू शकत नाही. काचेची भिंत असल्यामुळे गाडी आलेली दिसते. ह्या भिंतीला दरवाजे असतात. गाडी उभी राहिली की गाडीचे दरवाजे ह्या भिंतीतल्या दरवाजांसमोर येतील अशीच गाडी उभी राहते. गाडीचे दरवाजे व भिंतीचे दरवाजे एकदम उघडतात. गाडी सुटण्या आधी दोन्ही दरवाजे बंद होतात व नंतरच गाडी स्टेशनमधून निघते. प्रचंड गर्दी असूनसुद्धा गडबड नाही, गोंधळ नाही. सर्व सुरळीत. स्टेशनवरचे फलक चीनी व इंग्लीश भाषेतून असल्यामुळे काही अडचण न येता आम्ही तिन्ही गाड्यांचा प्रवास पूर्ण करून नियोजित ठिकाणी आलो. स्टेशनमधून बाहेर पडलो. समोरच वरच्या पातळीवर म्हणजे स्टेशनच्या साधारण ३० फूट उंचीवर रस्ता होता व वर चढून जाण्याकरता जिना होता. जिना चढून वर आलो. समोरच स्टेडियमचा मोठा फलक दिसला. रस्ता ओलांडून पलिकडे गेले की स्टेडियम. स्टेडियमच्या भोवती कुंपण होते व आंत जायला एक दरवाजा होता. पाऊस येण्यास सुरुवात झालेली होती. आम्ही पावसाची तयारी करूनच निघालो होतो. रस्ता ओलांडून पलिकडे गेलो व गेटमध्ये सेक्युरिटी चेक करून आम्हास आंत जाण्याची परवानगी मिळाली. त्यांच्याकडे त्या भागाचा व ऑलिंपिक नगरीचा नकाशा आहे का ह्याची चौकशी केली. त्यांना इंग्लीश अजिबात येत नव्हते. ते कोणत्याही प्रकारची मदत करायला तयार नव्हते. तेथे स्टेडियमची माहिती देणारे कोणतेही

पत्रक किंवा पुस्तिका नव्हती. आत्तापर्यंत आमचा प्रवास इतका छान झाला की आम्ही जरा हवेतच वावरत होतो. पण सेक्युरिटी गार्डनी आम्हाला दाणदिशी जमिनीवर आदळले. लांबवर साधारण अर्ध्या मैलावर आम्हाला बर्ड नेस्ट दिसत होते. तेथे जाण्यास मोठा रस्ता होता. पण पुढे काय? तिकीटे कोठे काढायची? प्रवेश कोठून करायचा? बाकीच्या इमारती कसल्या आहेत काही कळत नव्हते. पुढे जाऊन काही माहिती मिळते का पाहू म्हणून रस्त्यावरून पुढे निघालो. पावसाची रिपरिप चालूच होती. फार जोरात पडत नव्हता पण त्रास व्हावा इतपत होता. वाटेत एक मोठा तंबू उभारलेला दिसला. चौकशी करून काही माहिती मिळते का बघू म्हणून आंत गेलो. येथे पण तोच प्रकार. कोणालाच आमचे बोलणे समजत नव्हते. पण एकंदर वातावरणावरून ते खाद्य पदार्थाचे प्रदर्शन असावे किंवा फूड स्टॉलस् असावे असे वाटले. तेथून बाहेर पडलो. बर्ड नेस्टच्या जवळ आलो. रस्त्याच्या एका बाजूला बर्ड नेस्ट होते त्याच्या विरुद्ध बाजूला बरेच छोटे तंबू उभारले होते. तो स्टेडियमला येण्याचा अधिकृत प्रवेश होता. त्या तंबूंजवळ गेलो तेथे एका तंबूवर इंग्लीशमधून 'information' पाटी होती. तेथे काही शाळकरी मुले बसली होती. ती मुले मोडके तोडके इंग्लीश बोलू शकत होती. वाळवंटात भटकणाऱ्यांना पाणी दिसल्यावर कसे वाटते ह्याची कल्पना आली. त्यांना प्रश्न विचारून आम्ही भंडावून सोडले. ते बिचारे भांबावून गेले. पण आम्हाला बर्ड नेस्टकडे जायचे आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्याने बर्ड नेस्टकडे बोट दाखवून काही लोक जात आहेत त्यादिशेने जाण्यास सांगितले. तिकीटे तेथेच मिळतील असे पण सांगितले. आम्ही पुलावरून पलिकडे गेलो व तेथे प्रवेश द्वार दिसले पण तिकीटघर दिसेना. सगळीकडे शोधले पण तिकीटघर दिसेना. एका खांबावर तिकीट अशी पाटी व बाणाची खूण दिसली पण तिकीटघर दिसेना. बाणाच्या दिशेने बघितले काही दिसले नाही. हे एक मोठे कोडेच होते. सर्वजण तिकीटे घेऊन गेली आणि आम्हाला तिकीटघर दिसत नव्हते. परत त्या मुलांकडे आलो. त्याने परत तिकडेच बोट दाखवून जाण्यास सांगितले. पुनः एकदा प्रयत्न करावा म्हणून तिकीटघराच्या शोधार्थ निघालो. परत तिकीटाची खूण असलेल्या खांबाजवळ आलो. बाणाच्या दिशेने बघितले काही दिसेना. मग त्या दिशेने चालण्यास सुरुवात केली. जरा पुढे गेल्यावर अचानक अलिबाबाच्या गुहेसारख्या खाली जाणाऱ्या पायऱ्या दिसल्या व तेथे बरीच तिकीट घरे होती पण फक्त दोनच सुरु होती.

बर्ड नेस्ट समोर वर्षा व मी

तिकीटे घेऊन परत सेक्युरिटीच्या सोपस्कारातून पुढे जाऊन त्या महाकाय स्टेडियममध्ये प्रवेश केला. ह्या स्टेडियमला पक्षाचे घरटे असे म्हणतात पण मला तर ती शिंदे शाही पगडी वाटली. चीन मधील लोकांनी आमची पगडी बघितली नाही म्हणून त्यांनी ह्या स्टेडियमला पक्षाचे घरटे अशी उपमा दिली असावी. हे स्टेडियम ४६३ मिलियन डॉ खर्च करून बांधले आहे. २४ डिसेंबर २००३ मध्ये बांधकामास सुरुवात करून २००७ च्या सप्टेंबरमध्ये पूर्ण केले. ९१,००० प्रेक्षक बसू शकतील एवढी त्याची क्षमता आहे. स्वित्झर्लंड मधील 'हरझोग आणि दे मरून' नावाच्या स्थापथ्य कंपनीने केलेली रचना पसंत पडून त्यांनाच त्याचे कंत्राट दिले गेले होते. आम्ही स्टेडियमच्या पायथ्या पाशी गेलो. तेथे स्त्रि माहिती देण्यास बसली होती. ती अस्खलीत इंग्लीशमध्ये बोलत होती. आम्ही मनात म्हटले तू होतीस कोठे इतका वेळ? तिने आम्हाला एलेव्हेटर घेऊन ५ व्या मजल्यावर जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही वर गेलो. प्रेक्षागृहाच्या खुर्च्या असलेला तो स्टेडियमचा सर्वात वरचा भाग. आम्हाला खरे तर तेथून खाली बघण्यास भिती वाटत होती. तेथे जास्त वेळ न थांबता खाली जाण्यास वळलो तेथे काही बहिरी माणसे हातवारे करण्याच्या भाषेत बोलत होती. वर्षाला जवळचे मित्र भेटल्यासारखा आनंद झाला. वर्षा बहिऱ्या मुक्यांच्या शाळेत शिकवत असल्यामुळे तिला हातवारे करण्याच्या भाषेत संवाद करता येत होता. ह्या भाषेत प्रत्येक अक्षराला व शब्दाला हातांच्या, बोटांच्या किंवा पंजांच्या साहाय्याने करण्याचे चिन्ह असते. ती चिन्हे वापरून ही भाषा बोलायची असते. म्हणून ह्या भाषेला चिन्हांची भाषा (sign language) म्हणतात. वर्षाने त्यांच्याबरोबर मनसोक्त गप्पा मारून घेतल्या.

आम्हाला भेटलेली बहिरी माणसे, वर्षा त्यांचे बरोबर संवाद साधू शकत होती

मग आम्ही खालच्या भागात आलो. तेथून आतले मैदान जवळून बघता आले. ऑलिंपिक स्टेडियम इतक्या जवळून प्रथमच बघत होतो. १९८४ साली लॉस एंजलस् मध्ये ऑलिंपिक झाले होते. काही कारणाने जाण्याचा योग आला नव्हता. २००८ साली बेइजींग येथे झालेले ऑलिंपिक टेलीव्हीजनवर बघितले होते त्याची आठवण झाली. चीनने प्रदर्शित केलेल्या उद्‌घाटनाच्या आणि समारोपाच्या कार्यक्रमाने सर्वांना मंत्रमुग्ध केले होते. ज्या स्टेडियमवर बरेच मेडलस् मिळवले गेले, कित्येक खेळाडूंनी जेथे आपल्या खेळाचे नैपुण्य दाखवले, त्या स्टेडियमवर आम्ही उभे होतो. थोडे भारावल्यासारखे झाले होते. गर्दी फार तुरळक होती. काही प्रवासी बाहेरच्या देशातून आलेले दिसले. त्यांच्यामध्ये दोन मुली होत्या. त्यांच्यापैकी एका मुलीला आमचा फोटो घेण्यास सांगितले. आमचा फोटो काढल्यावर आमच्यासह तिने तिच्या कॅमेऱ्यावर काढून घेतला तसेच तिच्यासोबत आम्ही पण फोटो काढला.

नॅशनल स्टेडियमच्या खालच्या भागात - आम्हाला भेटलेली एक पर्यटक

हे स्टेडियम बघून झाल्यावर आम्ही बाहेर पडलो. आता आम्हाला पोहोण्याचा तलाव बघायचा होता. त्याला वॉटर क्यूब किंवा ब्लू बबल बिल्डिंग म्हणतात. ती कोठे आहे व तेथे कसे जायचे ही माहिती हवी होती. मगाशी इंग्लीश बोलणारी बाई भेटली तिच्या शोधार्थ निघालो. तिने आम्हाला चांगले समजावून सांगितले असते. ती ज्या जागी बसली होती तेथे गेलो तर तेथे दुसरीच बाई बसलेली होती. ह्या नवीन बाईला इंग्लीश अजिबात येत नव्हते. आधीची बाई कुठे गेली? कधी येणार? बबल बिल्डींग कोठे आहे? आमचे प्रश्न तिला समजत नव्हते आणि त्यामुळे आम्हाला उत्तरे मिळत नव्हती. आत्तापर्यंत आमच्या बरोबर कँडी असल्यामुळे भाषेची अडचण आली नाही पण आता पावलो पावली अडचण येत होती. शेवटी तेथे एक गृहस्थ आले त्यांना थोडे इंग्लीश येत होते. त्यांनी आम्हाला बबल बिल्डिंग कडे जाण्याचा रस्ता दाखवला आणि आम्ही मार्गस्थ झालो.

वॉटर क्यूब किंवा ब्लू बबल बिल्डींग

हा फोटो गुगलवरून घेतला आहे

त्याने दाखवलेल्या वाटेने गेल्यावर बबल बिल्डिंग दिसली. आत जाण्याकरता वेगळे तिकीट होते. ह्या बिल्डिंगची बाहेरची भिंत वीरी फेलनच्या रचनेवर आधारित आहे. ही रचना साबणाला फेस आल्यानंतर जे बुडबडे तयार होतात त्यासारखी दिसणारी आहे. ३०६५ बुडबुडे वापरून भिंती तयार केल्या आहेत म्हणून ह्या बिल्डिंगला बबल बिल्डिंग असेही म्हणतात.

खरे किंवा अधिकृत नांव 'नॅशनल ॲक्वेटिक सेंटर' असे आहे. बुडबुड्यांच्या रचनेत हवा असल्यामुळे इमारतीचा आतील भाग व बाहेरील भाग ह्यात हवेचा थर निर्माण होतो. त्यामुळे आतील भागातील तपमान सांभाळण्यास नैसर्गिक रित्या मदत होते.

डायव्हींगच्या स्पर्धा व पोहण्याच्या शर्यती घेण्याकरता बांधलेले तलाव
हा फोटो गुगलवरून घेतला आहे

१९४ यार्ड लांबी रुंदीच्या चौकोनी आकाराची ही इमारत ९८ फूट उंच आहे. १७००० प्रेक्षक बसू शकतील एवढी त्याची क्षमता आहे.

येथे आम्ही तीन तलाव बघितले. एक साधारण २५ चौ. मि. चा डायव्हींगच्या स्पर्धा घेण्याकरता, दुसरा पोहण्याच्या शर्यती घेण्याकरता व तिसरा स्पर्धकांना सराव करण्यासाठी होता. तिसरा तलाव आतल्या बाजूस असल्याकारणाने बाहेरून दिसत नव्हता.

ज्या ठिकाणी २५ ऑलिंपिक रेकॉर्डस् मोडले गेले त्या वास्तूत उभे राहतांना मन भरून आले होते. मी वयाच्या ६ व्या वर्षापासून पोहतो आहे. लहान पणापासून पोहण्याच्या शर्यतीत भाग घेत आहे. बरीच बक्षिसे मिळवलेली आहेत. त्यामुळे पोहणे हा माझा जिव्हाळ्याचा विषय आहे.

बबल बिल्डींग समोर

ज्या ठिकाणी २५ ऑलिंपीक रेकॉर्डस् मोडले तो हा स्विमींग पूल

२००८चे ऑलिंपिक संपल्यानंतर २००९ मध्ये हा तलाव सर्वांना वापरण्यास खुला केला गेला. पण चार महिन्यात परत बंद करून तेथील अर्ध्या भागात वॉटर पार्क बांधले. तेथे बरेच छोटे मोठे तलाव बांधले, अत्यंत कमी खोली असलेले लहान मुलांकरता व दुसरा मोठ्या व्यक्तींकरता जेथे वेग वेगळ्या उंचीच्या घसरगुंड्या बांधलेल्या होत्या. येथे बरीच गर्दी होती. बरेच आबाल वृद्ध पाण्यात खेळण्याची मजा लुटत होते व यथेच्छ पोहत होते. माओच्या काळात असले थेर करण्यास परवानगी नव्हती. ते दुःख ज्यांनी भोगले त्यांनाच माहीत.

बबल बिल्डिंगमधून बाहेर आलो. वॉटर क्युबच्या शेजारी इनडोअर स्टेडियम आहे जेथे व्हॉली बॉल, बास्केट बॉल, जिमनॅस्टीक सारख्या खेळांच्या स्पर्धा झाल्या. हे स्टेडियम बंद असल्यामुळे आंत जाता आले नाही.

नॅशनल इनडोअर स्टेडियम
हा फोटो गुगल वरून घेतला आहे

तेथून हॉटेलवर परत येण्यास निघालो. आंत येताना ज्या सेक्युरिटी दरवाजातून आंत आलो त्याच्याच शेजारी बाहेर जाण्याची वाट होती. त्याच्याशेजारी एक फलक

होता. जवळ गेल्यावर लक्षात आले की ज्या माहितीचा आम्ही सुरुवाती पासून शोध घेत होतो ती महिती त्या फलकावर होती. तो होता त्या ऑलिंपिक नगरीचा नकाशा. चीन सरकारने कोणत्या उद्देशाने परत जाण्याच्या मार्गावर फलक लावला हे कळायला मार्ग नाही.

बाहेर जाऊन शेजारी मॅकडॉनल्ड होते तेथे जाऊन कॉफी घेतली. बाकीची मंडळी म्हणजे खोपकर व दांडेकर सिल्कच्या बाजारात जाणार होते. त्यांना ३ वाजता तेथे भेटायचे ठरले होते. ३ वाजता भेट झाली नाही तर हॉटेलमध्ये ५ वाजता भेटायचे असे ठरले होते. पण आम्हाला येथेच ४ वाजले म्हणून रेल्वेने परस्पर हॉटेलवर गेलो. जाई पर्यंत ५॥ वाजले.

रात्री तिआनानमेन चौकात दिव्यांची रोषणाइ करतात ती बघण्यास गेलो. आम्ही चौकात पोहोचलो तेंव्हा काळोख होत आला होता. पण ताइनानमेन दरवाजावरचे दिवे मात्र लागलेले होते. आम्ही पोहोचल्यावर चौकातले मोठे दिवे लागले व नंतर चौकाच्या बाजूला असणाऱ्या इमारतींवर एक एक करून दिवे लागले. सर्व भाग प्रकाशमय झाला होता. ही शोभा बघण्यास बराच जनसमुदाय गोळा झाला होता. हळू हळू जनसमुदाय वाढू लागला. कॅमेरा नेला नसल्यामुळे फोटो घेऊ शकलो नाही. थोड्या वेळाने पोलिसांनी तिआनानमेन दरवाजा व चौक ह्या मधिल रस्त्यावरची रहदारी दोन्ही कडून थांबवली. तिआनानमेन दरवाजावर लावलेल्या माओच्या चित्राखालील कमानीतून एक सैनिकांची तुकडी बाहेर पडली. पुढे त्यांचा प्रमुख व मागे बँडच्या तालात मार्चिंग करत त्या तुकडीने रस्ता ओलांडला आणि चौकातील झेंड्याजवळ गेले. तेथे त्या तुकडीचे दोन भाग झाले व झेंड्यापलिकडे गेल्यावर परत एकत्र झाले व झेंड्याकडे तोंड करून सॅल्यूट करून उभे राहिले. थोड्याच वेळात चीनचे राष्ट्रगीत

बाहेर जाण्याच्या मार्गा वर लावलेला ऑलिंपीक नगरीचा नकाशा

सुरू झाले व त्या संगीताबरोबर झेंडा खाली आला. पायथ्याशी आल्यावर त्याची घडी करून बरोबर घेऊन ही सैनिकांची तुकडी परत कमानीतून आंत गेली आणि अदृष्य झाली. जमाव लगेच पांगला गेला. चारूने बरोबर आणलेल्या कॅमेरावर आमचे फोटो काढले.

तेथून रेल्वेने मार्केटमध्ये गेलो. शशी, सुलभा, चारू व अलका दुपारी तेथे जाऊन आले होते व आम्हाला आवडतील अशा काही वस्तू बघून ठेवल्या होत्या. त्या वस्तूंची खरेदी करायची होती. नंतर समजले आमच्याकरता काही वस्तू बघितल्या नव्हत्या. त्यांना परत मार्केटमध्ये जायचे होते म्हणून तो एक बहाणा होता. पण अर्थातच आम्ही तेथे प्रचंड घासाघीस करून काही खरेदी केली. जवळच पिझ्याचे उपहारगृह होते तेथे पिझ्झा खाल्ला. हॉटेलवर परत यायला १०॥ वाजले. आजची आमची बेइजींगमधली शेवटची रात्र होती. उद्या आम्ही क्षिॲन ला जाणार होतो. कँडी सकाळी ७ वाजता आम्हाला विमानतळावर सोडायला येणार होती. सर्व सामानाची बांधाबांध करून झोपलो.

क्षिअॅनः

सकाळी लवकर उठून न्याहारी करून तयार झालो. कँडी ठरल्याप्रमाणे ६।। वाजता आली. तिने आम्हाला विमानतळावर सोडले आणि आम्ही सेक्युरिटीच्या भागात जाईपर्यंत आम्हाला मदत करायला ती थांबली होती. आम्हाला चीनी भाषा येत नसल्यामूळे तिची खूपच मदत झाली. शशीचे पिल्लू (गॉल्फ क्लब) लांबी जास्त असल्यामुळे ओव्हरसाइज भागात नेऊन द्यावे लागले. त्याला वाटले की ते पॅकींग हलके असल्यामुळे त्याला विमानाच्या आत त्याचे बरोबर नेता येईल. बिचारा (?) बराच खट्टू झाला. कॅंडीच्या मदतीने शशी ते पॅकींग ओव्हरसाइज भागात देऊन आला. कँडीला बाय बाय करून आम्ही सेक्युरिटी भागात गेलो. नेहमी प्रमाणे त्यांच्या बेल्टने माझी बॅग अडवली. खरे म्हणजे मला आता त्याची सवय झाली आहे. माझ्या बॅगेतले कॅमेरे त्यांना आवडले नाहीत. माझी बॅग परत माझ्या कडे आली. त्यातले कॅमेरे बाहेर काढून वेगळ्या ट्रे मध्ये ठेवले. तेवढयावर त्यांचे व त्यांच्या मशीनचे समाधान झालेले दिसले. बेल्ट वरून बॅग पलिकडे गेल्यावर मी बॅग व ट्रे माझ्या ताब्यात घेऊन कॅमेरे परत बॅगेत भरण्यास सुरुवात केली आणि सेक्युरिटी मधील एक स्त्री कर्मचारी मला मदत करण्यास पुढे आली. मला आश्चर्याचा धक्काच बसला. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या आणि लोकशाहीचे आदर्श म्हणवणाऱ्या राष्ट्रात सुद्धा अशी मदत मला कधीच मिळाली नाही. पण चीनमध्ये मिळाली. त्या स्त्रीचे आभार मानून आमच्या गेटवर आलो. विमान गेटवरून वेळेत निघाले पण उड्डाण करण्यास परवानगी मिळेना. बरीच विमाने उड्डाण करण्याकरता वाट बघत होती. आमच्या विमानाला तासाभराने परवानगी मिळाली.

१।। तासात आम्ही क्षिअॅनला पोहोचलो. बॅगा लगेचच मिळाल्या. बाहेर पडतांना मी व वर्षा पुढे होतो. दरवाजातून बाहेर आल्यावर बाहेर पडण्यास दोन रस्ते होते. एक उजवीकडे व दुसरा डावीकडे. त्या रस्त्यांच्या भोवती कठडा बांधलेला होता. उजवीकडील कठड्यावर एक स्त्री आमच्या नावाचा फलक घेऊन उभी होती. तिला आम्ही हात करून ओळख दिली. तिने आम्हाला उजवीकडून बाहेर पडण्यास सांगितले. मी व वर्षा बाहेर पडलो पण बाकीच्या मंडळींना उजवीकडून येण्यास सांगण्याकरता मागे वळलो तर लगेचच एक हात आडवा आला. तेथे एक सेक्युरिटीचा रक्षक उभा होता. त्याने माझा रस्ता अडवला. पण तेवड्यात बाकीची मंडळी दिसली. ती हाकेच्या अंतरावरच असल्यामुळे त्यांना उजवीकडून बाहेर येण्यास सांगितले. आमच्या क्षिअॅन मधील टूर गाइडचे नांवही

कँडीच होते. परंतु ही कँडी उंच व प्रौढ होती. आज आमची अर्ध्या दिवसाची टूर होती. आधी हॉटेलवर जाऊन खोली ताब्यात घेतली, सामान ठेवले व लगेचच निघालो.

चीनच्या चार जुन्या राजधानीच्या शहरांपैकी क्षिअॅन हे एक राजधानीचे शहर. इ. स. पूर्व आठव्या शतकात चीनमध्ये चीन, च्यू, हान, वी, की, झौ, व यान ह्या नावाची सात राज्ये होती. त्यांची आपापसात सतत युद्धे सुरु असत. त्यांना यद्धखोर राज्ये असेच म्हणत. पुढे इ. स. तिसऱ्या शतकात चीनच्या चीन शी व्हांग (हुआंग) ह्या राजाने बाकीच्या राज्यांचा पाडाव करून चीनचे साम्राज्य स्थापन केले. त्या साम्राज्याची ही राजधानी. हे शहर चीनच्या रेशीम रस्त्याचे उगम स्थान व तसेच टेराकोटा आर्मीचे घर म्हणून फार प्रसिद्ध आहे. क्षिअॅन म्हणजे पश्चिमेची शांतता. फेंग नदीच्या तीरावर बसलेले हे शहर पूर्वी फेंगाहो म्हणून ओळखले जात असे. इ. स. पूर्व २२० मध्ये फेंगाहोचे चांग्यान झाले. चांग्यान म्हणजे शाश्वत शांती. बरेच वेळा ह्या शहराचा उल्लेखक्षिजींग असाही होत असे. क्षि म्हणजे पश्चिम व जींग म्हणजे राजधानी. सध्याचे नांव क्षिअॅन हे इ. स. १३६९ मध्ये मिंग राजघराण्याची सत्ता असतांना रूढ झाले.

१९५३ मध्ये क्षिअॅनच्या पूर्वेला उत्खननात सापडलेले बांपो निओलिथीक नावाचे ६५०० वर्षांपुर्वीचे शहर क्षिअॅनच्या प्राचिनत्वाची साक्ष देते. इ. स. पू. २०२ मध्ये हान घराण्याचा मूळ सम्राट लिउ बांग ह्याने चिआंग येथे राजधानी स्थापन केली. ही सध्या आस्थित्वात असलेल्या क्षिअॅन शहराची सुरुवात समजली जाते. सम्राट लिउ बांग ह्याने येथे राजवाडा बांधला. त्या राजवाड्याला वैयांग असे नाव दिले. वैयांग म्हणजे शाश्वत सुख. सम्राटाला कितपत सुख येथे लाभले ही कल्पना नाही परंतु त्याने बांधलेला वैयांग राजवाडा मात्र जगातला सर्वात मोठा राजवाडा म्हणून प्रसिद्ध आहे. क्षिअॅन शहराला समृद्ध संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे.

वाईल्ड गूस पॅगोडाः दायन ताः

अशा सांस्कृतिक वारसा लाभलेल्या नगरीमध्ये आमचा फक्त दीड दिवस मुक्काम होता. पहिल्या प्रथम वाईल्ड गूस पॅगोडा बघायला गेलो. दा सिअॅन ह्या बौद्ध मंदीराच्या आवारात हा पॅगोडा बांधला आहे. हुएन स्तंग ह्या प्रवाशाने भारताला भेट दिली असता त्याने भारतातून बरेच बौद्ध विचारांचे साहीत्य बरोबर आणले होते. ते सर्व साहीत्य ह्या देवळात ठेवलेले आहे. भारतातून परत आल्यावर सम्राटांच्या परवानगीने हुएन स्तंग ह्या मंदीराचा अधिपती झाला. त्याने हा पॅगोडा बांधून घेतला. हुएन स्तंगने बरोबर आणलेल्या १३०० वर संस्कृत पुस्तकांचे भाषांतर येथे करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणात भाषांतर करण्याचा पायंडा येथे पडला गेला. पहिला बांधलेला पॅगोडा २०० फूट उंच होता. नंतर त्याच्यावर आणखी दोन मजले बांधले गेले व त्याची उंची २१२ फूट झाली.

पूर्वी बौद्ध धर्मामध्ये २ पंथ होते. पैकी एक पंथ शाकाहारी होता परंतू दुसरा पंथ मांसाहारी होता. एके दिवशी मांसाहारी पंथाच्या बौद्ध भिक्षुकांना मांस मिळाले नाही. तेंव्हा त्यांनी बोधित्सवाजवळ प्रार्थना केली. त्याच वेळी आकाशातून काही गूस (रानटी हंस) उडत जात होते. त्यातील सर्वात पुढे असणाऱ्या गूसचे पंख तुटले आणि तो प्रार्थना करणाऱ्या भिक्षुकांच्या पायाशी येऊन पडला. ही सूचना समजून त्या दिवसापासून त्या पंथाने मांसाहार वर्ज्य केला. जेथे तो गूस पडला तेथे पॅगोडा बांधून त्याला वाईल्ड गूस पॅगोडा असे नांव दिले.

दा सियान मंदीराच्या आवारात हा पॅगोडा असल्याने दा सियान मंदीरातून पुढे जावे लागते. मंदीरात प्रवेश करण्यासाठी प्रवेशद्वार आहे.

दासियान मंदिराचे प्रवेशद्वार

मंदीरात प्रवेश केल्यावर समोरच पुरातन दिवा आहे.

मंदिराच्या आवारातील दिवा

एक छोटे आवार पार केल्यावर मंदीर आहे. तेथे काही पायऱ्या चढून जावे लागते. त्या पायऱ्यांच्या मधे उतार असून त्यावर एकसंघ दगडी फरशी असून त्यावर सुंदर कोरीव काम केलेले आहे.

मंदिराच्या पायरीवर केलेले दगडी कोरीव काम, मागे मंदिर व त्याच्याही मागे पॅगोडा दिसत आहे

सर्व मंदीरांसमोर असणारे उदबत्ती लावण्याचे घंगाळे होते. उदबत्तीचा सबंध पुडा एकदम लावण्याची पद्धत असल्यामुळे लहान उदबत्तीघर पुरत नाही. मोठ्या घंगाळाचीच जरूरी असते.

उदबत्ती लावण्याचे घंगाळे

मुख्य गाभाऱ्यात बूद्धाची मूर्ती आहे.

मुख्य गाभाऱ्यातील बूद्धाची मूर्ती

मुख्य गाभाऱ्यातील बूद्धाची मूर्ती

दा सियान मंदिरातील एक इमारत

मंदीराच्या आवारात आणखी काही मूर्ती आहेत. आवाराला वळसा घालून मागच्या बाजूस पॅगोडा आहे.

मंदीरा समोर हुएन स्तंगचा पुतळा आहे. तो आम्ही बाहेर येताना बघितला.

वाईल्ड गूस पॅगोडाच्या पायथ्याशी, बरोबर कॅंडी आमची टूर गाईड

दगडातून कोरलेली बुद्धाची मूर्ती

ह्या शहराच्या भोवतीसुद्धा तटबंदी बांधलेली आहे. कँडी आम्हाला तेथे घेऊन गेली. ही तटबंदी ४० फूट उंच व ४५ फूट रूंद असून ८॥ मैल लांब आहे. आम्ही बघितलेला भाग एकाच उंचीचा व सारख्या रुंदीचा होता. ही भिंत चीनच्या भिंती सारखी उंच सखल किंवा काही ठिकाणी रूंद तर काही ठिकाणी अरुंद नाही. ताँग राजघराण्याच्या काळात बांधण्यास सुरुवात केलेली ही भिंत मींग राजघराण्यातल्या झू युवानझांग नावाच्या सम्राटाने बांधून पूर्ण केली. झू युवानझांग हा मींग राजघराण्याचा मूळ सम्राट. झू शेंग नावाच्या साधूने त्याला उपदेश दिला की राज्या भोवती भक्कम तटबंदी बांध, राज्य बळकट कर आणि बाकी राज्यावर एकछत्री अंमल कर.

पॅगोडासमोर हुएन स्तंगचा पुतळा

क्षिआन शहराभोवतीची ४५ फूट रूंदिची तटबंदी

साधूच्या सांगण्यानुसार सम्राटाने तटबंदीचे काम पूर्ण केले. भोवती खंदक बांधला. दर ४०० फूटावर मोठे बुरूज बांधले. त्यात सैन्य ठेवले. ही तटबंदी एवढी मजबूत होती की ती भेदून शत्रूला आंत येणे केवळ अशक्यच होते. त्यामानाने दरवाजा कमकुवत असल्याकारणाने शत्रू दरवाज्यातूनच आंत येण्याची शक्यता जास्त होती. म्हणून दरवाजांची रचना शत्रूस भेदण्यास कठीण अशी अत्यंत क्लिष्ट केलेली होती. ह्या तटबंदीला चार दिशांना चार दरवाजे आहेत.

आम्ही पश्चिम दरवाजातून आत येऊन जिना चढून भिंतीवर आलो. भींत बरीच रूंद होती. बरेच पर्यटक ह्या भिंतीवर आलेले होते. तेथे गॉल्फच्या गाड्या व सायकली भाडयाने मिळतात. भिंतीवर सायकली व गॉल्फच्या गाड्या फिरवण्याचा आनंद पर्यटक लुटत होते. आम्हीसुद्धा सायकल भाड्याने घेतली व सर्वांनी आळीपाळीने चालवली.

क्षिआनच्या भिंतीवर सायकल चालवतांना

आजच्या दिवसाच्या सहलीचे हे शेवटचे ठिकाण होते. तेथून परत हॉटेलवर गेलो. रात्री जेवण करून आराम केला.

व्हाशिंग गरम पाण्याचे झरेः

आज आम्ही टेराकोटा वॉरियर्स बघायला जाणार होतो. त्याच्या आधी वाटेवर असणारे हॉकींग गरम झरे बघण्यास जाणार होतो. क्षिअॅनच्या उत्तरेला २० मैलावर माउंट ली च्या पायथ्याशी हे झरे आहेत.

सकाळी इंटरनेट वरून गोपाळराव गोखले स्वर्गवासी झाल्याचे कळले. गोपाळराव गोखले हे वर्षाच्या मोठ्या बहिणीचे यजमान. आम्ही प्रवासास निघालो तेंव्हा त्यांची प्रकृती खालावलेली होती. आम्ही निघण्याच्या आधी फोन केला होता. तेंव्हा त्यांना हॉस्पिटल मध्ये हलवल्याचे कळले होते. त्यांना बरेच वर्षे हृदय विकाराचा त्रास होत होता.

सकाळी नेहमी प्रमाणे न्याहरी करून कँडीबरोबर निघालो. व्हॅन मध्ये बसल्यावर तिने सांगितले की आपण आधी आर्ट फॅक्टरी बघायला जाणार आहोत तेथे "टेराकोटा वॉरियर्स" कसे बनवले ते दाखवतात. आर्ट फॅक्टरी मध्ये प्रवेश करण्या आधी बाहेरच्या आवारात काही आतून पोकळ असलेले पुतळे ठेवलेले आहेत. त्या पोकळीत उभे राहून आपण टेराकोटा वॉरियर सारखा फोटो काढून घेऊ शकतो.

आर्ट फॅक्टरीच्या बाहेर असलेले पुतळे. वर्षा व सु लभा पुतळ्यात उभ्या आहेत

बाहेरच्या पुतळ्यात फोटो काढले. तेथेच एक पुतळे भाजण्याच्या भट्टीचा नमुना होता. ते पुतळे व भट्टीचा नमुना बघून दुकानात गेलो.

पुतळे भाजण्याची भट्टी

तेथे एका स्त्रीने पुतळे करण्याची पद्धत समजावून सांगितली. पुढे काही कलाकार लॅकरच्या फर्निचरवर चित्रे काढत होते. मग आम्हाला त्यांच्या दुकानात नेले. तेथे बऱ्याच कलाकुसरीच्या वस्तू विकायला ठेवलेल्या होत्या. टेराकोटा वॉरियरसारखे लहानापासून ते मनुष्याच्या आकारा एवढे मोठे पुतळे विकायला होते.

तेथे दोन लहान पुतळे विकत घेऊन आम्ही बाहेर पडलो. पुढला टप्पा होता व्हाशिंग गरम झरे.

आर्ट फॅक्टरीमध्ये

व्हाशिंगचे गरम झरे मुख्यत्वे दोन कारणाकरता प्रसिद्ध आहेत. येथे असणारे निसर्ग सौंदर्य आणि हुआन त्सुंगचे प्रेम प्रकरण. इ. स. पु. ११व्या शतकात सम्राट 'यू'ने ह्या गरम झऱ्यांवर राजमहाल बांधला. चीनचा पहिला सम्राट व्हा शिंगचे येथे वास्तव्य असे.

हॉर्कीग गरम झरेप्रवेश द्वार

हुआन त्सुंगचे त्याच्या सुनेवरच प्रेम जडले. तिचे नांव होते यांग कुफी. यांग कुफी ही चीनमधली चार सर्वात सुंदर तरुणींपैकी एक मानली जाते. आपल्या सुनेबरोबरचे प्रेम प्रकरण जड गेले असते म्हणून सम्राटाने यांग कुफीला 'ताओ' धर्माची दिक्षा दिली. तेंव्हा ती ताओ साध्वी झाली. मग सम्राटाने तिचा स्वीकार केला. सदासर्व काळ तो तिच्याच सहवासात राहू लागला. त्याचे राज्य कारभाराकडे दुर्लक्ष झाले. सम्राटाच्या सैन्याने यांग विरुद्ध बंड केले. शेवटी यांगने आत्महत्या करून हा तिढा सोडवला.

यांग कुफी

प्रवेशद्वारातून आत गेल्यावर समोरच छोटे तळे आहे आणि त्यात यांगचा पुतळा उभा केलेला आहे. आम्ही गेलो तेंव्हा तळ्यात पाणी नव्हते. त्यामुळे आम्ही थेट पुतळ्यापर्यंत जाऊन फोटो काढले.

ह्याच्या आजुबाजूला बऱ्याच इमारती आहेत. त्यातून लहान मोठ्या आकाराचे तलाव आंघोळी करण्याकरता बांधलेले आहेत. सम्राट व सम्राज्ञी करता खास तलाव, त्यांच्या नातेवाइकांकरता वेगळा तलाव इतर सरदारांकरता वेगळा तलाव असे बरेच तलाव आहेत.

सम्राज्ञीचे केस वाळवण्याकरता वेगळी जागा आहे.

सम्राट व सम्राज्ञी करता बांधलेला तलाव

ह्या मनोऱ्यात सम्राज्ञी केस वाळवण्यास बसत असत

सर्व इमारती व तलाव बघून बाहेर पडलो. बाहेर जाण्याच्या वाटेवर गरम पाण्याची पाणपोई बांधली आहे. गरम पाण्याच्या झऱ्याचे पाणी येथे आणले आहे.

गरम पाण्याची पाणपोई

प्रवेशद्वारा समोर बाहेरच्या बाजूला एक मोठा तलाव होता व तेथेही यांगचा पुतळा आहे.

यांग कुफीचा आणखी एक पुतळा

टेराकोटा वॉरियर्सः

चीनला येण्याचे आमचे ठरले तेंव्हा चीनमध्ये दोन गोष्टी निश्चित बघायच्या ह्याची खुणगाठ बांधून निघालो होतो. पहिली गोष्ट म्हणजे चीनची भिंत आणि दुसरी म्हणजे टेराकोटा वॉरियर्स. पैकी चीनची भिंत बघून झाली होती. आणि आता वॉरियर्स बघायला जात होतो. सकाळी आर्ट फॅक्टरी बघितली तेंव्हा त्याची झलक दिसली होती. तरीपण जबरदस्त कुतूहल होते.

१९७४ साली एका शेतकऱ्याला विहीर खणताना काही सैनिकांच्या पुतळ्यांचे अवशेष सापडले. त्याने पुरातन खात्याला त्याची वर्दी दिली. पुरातन खात्याने तेथे उत्खनन करण्याचे ठरविले. उत्खनन करतांना त्यांना आणखी बरेच पुतळे भग्नावस्थेत सापडले. सर्व पुतळे मानवाच्या मापाचे होते. पुरातन खात्याला येथे सबंध फलटण गाडलेली सापडली.

पहिला सम्राट चीन शी व्हांग ह्याने जिवंत असतांनाच स्वतःची समाधी बांधली होती. त्या समाधीच्या रक्षणार्थ हे सैनिकांचे पुतळे उभारले होते. आत्तापर्यंत तीन प्रचंड खड्डे उत्खनन करून काढले असून त्यातून ८००० सैनिक, १३० रथ, ५२० घोडे, १५० तोफा वर काढल्या आहेत. अजून उत्खनन करण्याचे काम चालू आहे. चीन शी व्हांग ह्याने संपूर्ण नगरीच बांधून ठेवली होती व त्यात सैन्य उभे करून ठेवले होते. परंतू ते सर्व सैनिक पुतळ्यांच्या स्वरूपात होते. पहिल्या सम्राटाने राज्य ग्रहण केल्यानंतर लगेचच समाधी बांधण्यास सुरुवात झाली. समाधी येथून जरा लांब होती. तेथे जाता येत नाही. ७ लाख मजूर येथे खपले होते. सतत वाहणाऱ्या पाऱ्याच्या नद्यांचे आकाश. सुवर्णाच्छादित छत, कास्याची जमीन आणि हे कोणी चोरून नेऊ नये म्हणून लावलेले असंख्य सापळे असे त्याचे वर्णन समकालीन इतिहासकार सिमा चिआन ह्याने केले आहे. सम्राट चीन शी व्हांगला जेंव्हा पुरण्यात आले तेंव्हा त्याचे बरोबर अपरंपार संपत्ती पुरण्यात आली. नंतरच्या सम्राटांनी त्याची थोडी लुटालूट केली. हे तीन खड्डे आम्ही बघायला निघालो होतो.

कँडीने तिकीटे काढून आणली. तिकीट घरापासून हे खड्डे बरेच लांब होते. पहिल्या प्रथम गिफ्ट शॉप होते. ज्या शेतकऱ्याला पुतळे सापडले तो तेथे उपस्थित असतो. एका ठराविक टेराकोटाची माहिती देणाऱ्या पुस्तकावर तो सही देत होता. ते पुस्तक विकत घेतले तरच त्याची सही मिळणार होती. आम्ही ते पुस्तक विकत घेतले. त्या शेतकऱ्याचा फोटो घेण्याची परवानगी मागितली पण मिळाली नाही. आम्हाला असे सांगण्यात आले की हजारो पर्यटक तेथे येतात व ते फ्लॅश वापरून

फोटो घेतात. त्याचा शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हानीकारक परिणाम झाला. म्हणून फोटो घेण्यास सरसकट मनाई आहे. जवळच एक लहान चित्रपटगृह होते तेथे एक माहितीपट बघितला. चित्रपटाची सुरुवात चीन शी व्हान सम्राट झाल्यापासून होते. सम्राट झाल्या झाल्या त्याने स्वतःची समाधी बांधायला घेतली. भिंतीबरोबर समाधीचेही काम सुरू झाले. तिजोरीतील पैसा संपला. मग त्याने सर्व शेतकऱ्यांना व मजूरांना चाबकाच्या धाकाखाली रोजगार न देता कामाला लावले व त्यांच्या कडून हजारो सैनिकांचे, घोड्यांचे इत्यादी पुतळे करवून घेतले. सर्वसामान्य जनतेला ह्या अत्याचाराची भयंकर चीड आली. सम्राट निधन पावल्यावर त्याचा मुलगा सम्राट झाला. तो बापा एवढा शूर नव्हता. त्याच्या विरुद्ध प्रजा बंड करून उठली. नुसते बंड करून प्रजा थांबली नाही तर त्यांनी स्वतःच्या हातांनी स्वतः केलेले पुतळे मोडून तोडून टाकले व सर्वत्र जाळपोळ केली.

चित्रपट संपल्यावर आम्ही पिट नं १ मध्ये गेलो. ह्या ठिकाणीच शेतकऱ्याला प्रथम पुतळे सापडले. त्याच जागेवर प्रचंड मोठा मंडप घालून पर्यटकांसाठी हे ठिकाण उपलब्ध केले आहे. मध्ये एकाही खांबाचा आधार न देता हा मंडप उभा केला आहे.

टेराकोटा वॉरियरस् पिट १

७५० फूट लांब व २०० फूट रूंद असलेल्या मंडपात ६००० च्या वर सैनीक आहेत. त्यात १० फूट रूंदिचे ११ खंदक असून त्यात हे सैनीक उभे आहेत. येथे अजून उत्खनन चालू आहे. अजुनही नवीन पुतळे सापडत आहेत त्यांची जुळवा जुळव करण्याचे काम चालू आहे.

टेराकोटा वॉरियरस् पिट १

प्रत्येक सैनिकाच्या हुद्याप्रमाणे त्याचा पोषाख, केश रचना वेगवेगळी होती. त्यांच्याकडे वेगवेगळी शस्त्रे होती. साधारण चीनी मनुष्य असतो त्याच्यापेक्षा हे योद्धे शरीर यष्टीने मोठे व बलदंड दिसत होते. प्रत्येक योद्ध्याचा चेहरा मोहरा थोडासा वेगळा. हे काम किती प्रचंड स्वरुपाचे असेल ह्याची फक्त कल्पनाच केलेली बरी. एवढे पुतळे मातीतून तयार करायचे, प्रत्येकाचा पोषाख, चेहरा वेगळा, नंतर ते भट्टीत भाजून कडक करायचे, केवढे काम. फक्त सम्राटच ते करू जाणे. मातीच्या वस्तू तयार करून त्या भट्टीत भाजून कडक करण्याचे तंत्रज्ञान ज्याला सिरॅमिकचे तंत्रज्ञान म्हणतात, ते चीनी लोकांना तेंव्हा पासून अवगत होते. सध्या इलेक्ट्रॉनिकच्या विश्वात वापरण्यात येणाऱ्या सिरॅमिकच्या तंत्रज्ञानात चीन अग्रेसर आहे.

टेराकोटा वॉरियरस् पिट १

टेराकोटा वारियरस् पिट १

टेराकोटा वारियरस् पिट १

टेराकोटा वारियरस् पिट १

पिट नं ३ हा पिट नं १ च्या जवळ असल्याने आधी नं ३ मध्ये गेलो. पिट नं ३ हे सम्राटाच्या समाधी बाहेर असलेल्या तटबंदीच्याही बाहेर आहे. तेथेही सैनिकांचे पुतळे होते. येथील सैनीकांचे स्थान थोडे वेगळे वाटले. खोल खंदकात उभे राहून रक्षण करत आहेत असे वाटत होते.

टेराकोटा वॉरियरस् पिट नं ३

टेराकोटा वॉरियरस् पिट नं ३

पिट नं ३ नंतर आम्ही तेथेच असलेल्या एका उपहार गृहात जेवण्यास गेलो. उपहार गृह स्वच्छ होते. तेथे जेवणा करता नुडल्स करत होते. नुडल्स म्हणजे शेवया. त्याचे प्रात्यक्षिक बघण्यास मिळाले. जेवण झाल्यावर पिट नं २ मध्ये गेलो. येथे वॉरियर्संची शस्त्रास्त्रे ठेवलेली आहेत. काचेच्या बंद पेटीत काही सैनीक ठेवलेले आहेत. ते अगदी जवळून बघता येतात.

टेराकोटा सैनिकांची हत्यारे

तसेच येथे काचेच्या बंद पेटीत रथ टेवलेले आहेत. पेटी म्हणण्यापेक्षा त्याला खोलीच म्हणावे लागेल. माझ्या मते ती खोली २० फूट लांब १५ फूट रूंद व १५ फूट उंच असावी.

काचेच्या बंद पेटीत ठेवलेला सैनिक

बाहेर जाण्याचा रस्ता जरा लांबून होता. त्या रस्त्यावर एक घोडयांचे शिल्प होते.

काचेच्या बंद पेटीत ठेवलेला रथ

हातात सत्ता असल्यावर कोणतीही गोष्ट अशक्य नाही ह्याचे टेराकोटा वॉरियर्स हे उत्तम उदाहरण आहे. सम्राटांनी एखादे वेड डोक्यात घेतले की त्याचा पाठपुरावा करून ते पूर्ण करण्याची जिद्द येथे दिसते. ७ लाखांचे मनुष्य बळ येथे कामाला लागल्यावर बाकीची कामे कोणी करायची? सम्राट चार भिंतींच्या आत असल्यामुळे त्यांना उपासमारीची झळ लागली नाही. पण जनता किती सहन करणार? चीन शी व्हांग च्या मुलाला मात्र सम्राट असून सुद्धा जनतेच्या उद्रेकाचे फळ मिळाले आणि त्याचे राज्य कोसळले.

ह्याचा विचार करतच परत व्हॅनमध्ये येऊन बसलो. नंतर कँडी आम्हाला बांपो व्हिलेजला घेऊन गेली. १९५३ साली यलो रिव्हर व्हॅलीमध्ये पुरातत्व संशोधकांना ६७०० वर्षापूर्वीचे शहर सापडले. त्याच जागेचे संग्रहालयात रुपांतर केले आहे. हे एक छोटे शहर असून त्याच्या भोवती छोटा खंदक खणलेला आहे. त्यांची घरे अस्तित्वात नाहीत पण जमिनीवर वर्तुळाकृती आकार आहेत.

बांपो शहर

घोड्यांचे शिल्प

मातीची व लाकडाची वर्तुळाकृती घरे, त्याच्या भोवती
छोटा खंदक व शेजारीच मृत व्यक्तींना पुरण्याची जागा असे हे शहर आहे.

बांपो शहरात सापडलेली भांडी

पुनः व्हॅनमध्ये येऊन बसलो. आता क्षिअॅनची ग्रेट मशिद बघायला निघालो. व्हॅन शेवटपर्यंत जात नाही म्हणून लांब उभी करावी लागली. तेथून चालत मशिदीजवळ गेलो. वाटेत सर्वत्र बाजार भरलेला होता. आधी मोठ्या रस्त्यावरून जात होतो पण नंतर उजवी कडे एका छोट्या गल्लीत वळलो. रस्ता लहान होता व बाजूच्या दुकानदारांनी आक्रमण केल्यामुळे रस्ता आणखी लहान झाला होता. दादरचे भाजी मार्केट बरे असे

क्षिअॅन ग्रेट मशिदीचे प्रवेशद्वार

म्हणायची वेळ आली. खाद्य पदार्थांची व इतर भेट वस्तूंची भरपूर दुकाने होती. आम्ही दुकानांपुढे जास्त थांबलो नाही. थोड्याच वेळात मशिदीचा दरवाजा आला.

मशिदीच्या प्रवेशद्वाराच्या आतील भाग

इ. स. ७४२ साली बांधलेली ही मशिद चीनमधील सर्वात जुनी मशिद आहे. मिंग घराण्याच्या काळात ह्या मशिदीचा जिर्णोद्धार झाला. अजून चीनमधील मुस्लीम समाज येथे नमाज पढण्यास जातो.

क्षिअॅन ग्रेट मॉस्क

मशिदीतून बाहेर पडल्यावर मार्केटमधील रस्ता तुडवत परत व्हॅनमध्ये आलो. दुसरे दिवशी सकाळी लवकर निघायचे होते. हॉटेलवर जाऊन सामानाची बांधाबांध करून झोपलो.

चेंगडूः

आम्ही सकाळी लवकर निघाल्यामुळे न्याहरी झाली नव्हती. अजून हॉटेलचे उपहार गृह उघडले नव्हते. सर्व सामान व्यवस्थित बांधून तयार झालो. आम्हाला फक्त २० किलो सामान नेण्यास परवानगी होती. २० किलो मध्ये सर्व सामान बसवणे जरा कठीण गेले. त्यामध्ये थोडा वेळ गेला. आम्ही लवकर निघालो तेंव्हा न्याहरीचे उपहारगृह उघडले नव्हते म्हणून कँडी आमच्या करता बॉक्समध्ये न्याहरीचे पदार्थ घेऊन आली होती. नंतर कँडीसह आम्ही विमानतळावर आलो. कँडीच्या मदतीने विमानतळावरचे सर्व सोपस्कार पूर्ण केले. शशीचे पिल्लू विमानकंपनीच्या ताब्यात दिले व कँडीला बाय करून सिक्युरिटी भागात गेलो. आत गेल्यावर माझ्या मागच्या अनुभवाप्रमाणे सिक्युरिटीच्या बेल्टवर मी माझ्या बॅगेतले कॅमेरे काढण्यास सुरुवात केली पण तेवढ्यात तेथील एक कर्मचारी स्त्री माझ्याजवळ आली आणि मला सांगू लागली की कॅमेरे बाहेर काढण्याची गरज नाही. मला आधी वाटले की ती काय म्हणते आहे ते मला नीट कळले नाही म्हणून मी तिला परत विचारले तेंव्हा तिने परत तेच सांगितले. माझा विश्वास बसला नाही. परंतु तिने सांगितल्या प्रमाणे मी बॅग तशीच बेल्टवर ठेवली. सर्व सुरळीत होऊन सिक्युरिटीतून बाहेर पडलो. गेटजवळ पोहोचल्यावर कँडीने आणलेली न्याहरी खाल्ली.

विमान वेळेवर निघून तासाभरातच आम्ही चेंगडूला येऊन पोहोचलो. सामान लगेचच मिळाले. विमानतळाच्या बाहेर आलो पण आमच्या नावाचा फलक घेतलेली एकही व्यक्ती दिसेना. काहीतरी घोटाळा झाला होता. तेवढयात एक पुरूष आमच्याजवळ येऊन चौकशी करू लागला. तोच आमचा सि. टी. एस. चा मार्गदर्शक होता. त्याला आमच्या विमानाची नक्की वेळ कळली नव्हती. ही आश्चर्याची गोष्ट होती. क्षिॲनला असतांना कँडी त्यांच्या कार्यालयाबरोबर संपर्क साधून होती. आमच्या विमानाची वेळही तिने चेंगडूच्या कार्यालयाला सांगितली होती. तरी चेंगडूच्या कार्यालयाला आमच्या विमानाची वेळ कळू नये ह्याचे आश्चर्य वाटले.

तरी पण आम्हाला जास्त थांबावे लागले नाही. त्या मार्गदर्शकाचे नाव होते मायकेल. सहज संधी घ्यावी म्हणून आमच्या विमानाच्या वेळेस तो विमानतळावर आला होता आणि केवळ कर्मधर्म संयोगाने त्याची व आमची गाठ पडली होती. त्याच्या बरोबर ली नावाचा ड्रायव्हर आला

होता. त्यांनी आम्हाला सनशाईन नावाच्या हॉटेलवर नेऊन सोडले. त्या दिवशी आम्हाला कोणत्याही सहलीवर जायचे नव्हते. सर्व संध्याकाळ आम्हाला मोकळी होती.

पुढचे दोन दिवस आम्ही तिबेटला ट्रेनने जाणार होतो. गाडीत जेवण कसे मिळेल ह्या बद्दल जरा साशंकच होतो. म्हणून जरूर पडल्यास जवळ काहीतरी असावे म्हणून शेजारच्या गल्लीत जाऊन थोडी फळे व चायनीज मसालेदार कप-अ-नुडल्स आणली. जरा काळोख झाल्यावर जेवण्यास बाहेर पडलो. हॉटेलच्या समोरच जो रस्ता होता तेथून चालत गेलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला इलेक्ट्रॉनिकस्‌ची दुकाने होती. पुढे जाऊन पुलावरून झॉंगफू रस्ता ओलांडला. पुलावर जो रस्ता दिसला तो अतीशय आधुनीक होता त्यावरून आपण चीनमध्येच आहोत ना अशी शंका आली.

पुलावरून दिसणारा झॉंगफू रस्ता

पूल ओलांडून आम्ही पिपल्स्‌ मॉल मध्ये गेलो. येथे मोटार गाड्यांना परवानगी नव्हती. पादचाऱ्यांना सर्व रस्ता मोकळा असल्यामुळे ते मुक्तपणे सर्वत्र फिरत होते.

पीपल्स्‌ मॉल, चेंगडू

तेथे बरीच उपहारगृहे होती. तेथे भोजन करून परत निघालो. येतांना थोडा रस्ता चुकलो. सुलभा बरोबर असतांना आम्ही रस्ता कसा काय चुकलो हे अजून माझ्या लक्षात येत नाही.

थोडया गप्पा मारून निद्रेच्या आधीन झालो.

पांडा रिसर्च सेंटरः

सकाळी न्याहरी आटपून तयार होऊन बसलो. ८ वाजता मायकेल आला. आज आम्ही पांडा रिसर्च सेंटर बघण्यास जाणार होतो. वाटेत दुतर्फा चेंगडू शहराने केलेली प्रगती बघत होतो. रूंद व स्वच्छ रस्ते, टोलेजंग इमारती, एकंदर सर्वत्र आधुनिकतेची झलक दिसत होती.

चेंगडू एक प्रगत शहर

वाटेत मायकेल आमची करमणूक करत होता. हा बेइजींगमधल्या कँडीसारखाच पण ह्याची तऱ्हा वेगळी होती. त्याची बोलण्याची एक वेगळीच लकब होती. कपाळावर एक बोट ठेवून गहन विचार करत असल्याच्या थाटात तो बोलत असे. हिंदी चित्रपट बघण्याचा त्याला छंद होता. हिंदी चित्रपट बघून बघून त्याचे डोके थोडे फिरले होते. त्याला हिंदी चित्रपटात दिसणाऱ्या नट्यांसारखी बायको हवी होती. खरे म्हणजे हिंदी चित्रपट बघणाऱ्या सर्व तरुणांचे ते स्वप्नच असते. पण चीन मध्ये राहणाऱ्या व्यक्तीने अशी आकांक्षा ठेवणे हे जरा विचित्रच वाटले. पण मायकेल ह्या बाबतीत फारच गंभीर दिसला आणि आम्हाला त्याच्यासाठी नवरी शोधायची विनंती करत होता. "पैशाची काही फिकीर करू नका" असे तो आम्हाला सारखे सांगत असे.

पांडा रिसर्च सेंटरचे प्रवेशद्वार

काही वेळातच आम्ही पांडा रिसर्च सेंटरला पोहोचलो. ड्रायव्हरने पार्कींग लॉट मध्ये गाडी लावली आणि आम्ही चालत प्रवेशद्वारा जवळ आलो.

मायकेलने आमची तिकीटे काढून आणली, त्याबरोबर एक महिती पत्रकही होते. पांडा ह्या प्राण्याचे आस्तित्व धोक्यात आले आहे. सबंध जगात त्यांची संख्या २००० पेक्षा कमी आहे. त्या करता चीन सरकार सर्व प्रकारचे उपाय करून त्यांची प्रजा वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. त्या उद्दिष्टानेच हे रिसर्च सेंटर बांधण्यात आले आहे. पांडा हा आबालवृद्धांचा आवडता प्राणी आहे. चीनमध्ये सहा पर्वतराजीं मध्ये पांडाचे वास्तव्य असते. त्याना खाण्यास एक विशिष्ठ प्रकारचा बांबू लागतो. तो बांबू ह्या पर्वत राजींमध्ये सापडतो.

१७ जानेवरी १९५३ साली एक मोठा पांडा युटांग ह्या गावी दिसला. त्याला येथे आणून त्याचे उत्तम रितीने संगोपन करण्यास सुरुवात केली गेली. तेंव्हा पासून येथे पांडांचे संगोपन करण्यास सुरुवात झाली व मार्च १९८७ साली येथे रिसर्च व प्रजोत्पादन सेंटर सुरू झाले. ९२ एकर परिसरावर हे सेंटर वसलेले आहे.

पांडा रिसर्च सेंटरचा नकाशा

आम्हाला न घाबरता हा मोर आमच्या समोरून गेला

रोज सकाळी १० वाजता येथील पांडांना खायला देतात त्यावेळेत गेले तर सर्व पांडा जवळून च्छान बघायला मिळतात. प्रवेशद्वारापासून हे ठिकाण जरा लांब आहे. त्यांच्या खाण्याची वेळ होत आली होती म्हणून झप झप पावले टाकत निघालो आणि सर्वजण एकदम थबकले.

आमच्या समोरून एक मोर रस्ता ओलांडून डौलत डौलत पलिकडे जाताना दिसला.

आम्ही पोहोचे पर्यंत पांडांचे खाणे सुरू झाले होते. त्यांना ठराविक प्रकारचा बांबू खाण्यास लागतो. त्याची लागवड सर्वत्र होत नाही. ज्या ठिकाणी त्याची लागवड होते तेथून तो बांबू येथे आणतात.

पांडा

पांडा

पांडा

पांडांच्यामागे हा मोर पिसारा फुलवून सांगत होता की माझ्याकडे पण बघा

मग आमची फोटो घेण्यासाठी गर्दी उसळली

मग आमची फोटो घेण्याची गर्दी उसळली

पुढे आम्ही रेड पांडांच्या भागात आलो. ही पांडाची आणखी एक जात. हे पांडा दिवसभर झाडावर राहतात. मला तर ते रानमांजरा सारखे वाटले. आम्ही गेलो तेंव्हा त्यांची पण खाण्याची वेळ झाली होती. तेथील एक कर्मचारी त्यांचे खाणे घेऊन आंत कंपाऊंड मध्ये गेला तसे ते पांडा एक एक करून पूढे आले. येताना त्यांच्यात दुसऱ्याला पुढे न येऊ देण्याची वृत्ती दिसली. ह्या पांडांच्या शरिरात एक इलेक्ट्रॉनिकची पट्टी बसवलेली होती. पांडाने कर्मचाऱ्याने दिलेले खाणे खाल्ले की कर्मचारी त्यांच्या हातातल्या जाड पट्टी सारख्या दिसणाऱ्या इलेक्ट्रॉनिक यंत्रावर नोंद करत होता. हे यंत्र पांडाच्या शरिरात बसवलेल्या पट्टी जवळ आणले की ही नोंद होत होती.

आम्हाला भेटलेल्या चायनीज मुली

पांडाने खाल्ल्याची यंत्रावर नोंद करतांना

खाण्याकरता पुढे आलेले रेड पांडा

रेड पांडा बघून झाल्यावर परत निघालो. वाटेत एका छोट्या धबधब्या जवळ काही फोटो घेतले. पुढे एका लहान चित्रपट गृहात पांडावर महितीपट दाखवत होते. तो बघून परत व्हॅनमध्ये आलो. तेथून सिल्क फॅक्टरी बघण्यास निघालो. वाटेत दिसणारे चेंगडू शहर फारच आखीव वाटले. मायकेलने सांगितलेल्या माहिती प्रमाणे येथे साधारण ५० ते ८० चौ. मि. ची अपार्टमेंटस् असतात. भाव साधारण १०,००० युवान प्रती चौ. मि. असतो. अर्थातच ते कोणत्या भागात आहे त्यावर अवलंबून असते.

व्हॅनमध्ये बसले की मायकेलचा पाढा सुरू होत असे की त्याला भारतीय मुलीशी लग्न करायचे आहे. "मनी नो ऑबजेक्ट". शशी त्याची छान नक्कल करत असे. आधिच शशी नाटक्या आणि त्यात त्याला विषय पण छान मिळाला.

सिल्क हे चीनने जगाला दिलेल्या १० गोष्टीं पैकी एक आहे. बाकीच्या ९ गोष्टी म्हणजे अल्कोहोल, यांत्रिक घड्याळ, चहा, लोखंड वितळवून केलेल्या वस्तू, कंपास, कागद बनवण्याचे तंत्र, छपाइ, पोर्सेलिन व गन पावडर. ह्यातील बरीच तंत्रविद्या चीन मधील लोकांना लाच देऊन बाकीच्या जगाने शिकून घेतली. त्याच प्रमाणे सिल्क तयार करण्याची व त्यापासून कपडे शिवण्याची विद्या काही लोकांना लाच देऊन चीनच्या बाहेर आलेली आहे. चीनने बरीच वर्षे ही विद्या इतर जगापासून लांब ठेवली होती. पण शेवटी फितूरीने त्यांचा घात केला. चीनने ही विद्या जरी कोणाला दिली नसली तरी सिल्कचा व्यापार मोठ्या प्रमाणावर होत असे. ज्या मार्गे हा व्यापार चाले त्या मार्गाला सिल्क रोड असे म्हणतात.

सिल्क फॅक्टरी मधील कर्मचारी स्त्रीने आम्हाला सिल्क कसे निर्माण होते ते सर्व समजावून सांगितले. तुतीच्या झाडांची पाने, रेशमाचे किडे व त्यांनी तयार केलेल्या कोशांचे नमुने तेथे ठेवलेले होते. मग अर्थातच आम्हाला त्यांच्या दुकानात नेले. आम्हाला वजनाचे बंधन असल्यामुळे आम्ही काही घेऊ शकलो नाही.

त्या सिल्क फॅक्टरीमध्येच उपहार गृह होते. तेथे जेवण उरकून मायकेल आम्हाला यलो ड्रॅगन भागात घेऊन गेला.

यलो ड्रॅगनः

यलो ड्रॅगन हा एका निसर्गरम्य दरीतला छोटा भाग आहे. ह्या दरीतून मींग नावाची नदी वाहते. त्या नदीचे पाणी पंपाने येथे आणून त्याचे कारंजे केलेले आहे. हे पाणी छोट्या पाट्यासारखे वहात नेऊन परत मींग नदीत नेऊन सोडले आहे. ह्या पाटा भोवती बाजार वसवला आहे. काही मुली येथे शाही पोषाख घालून फोटो काढण्यास येतात.

यलो ड्रॅगन

यलो ड्रॅगन

यलो ड्रॅगन

काही मुली अमेरिकेतील हवाई राज्यातील मुलींसारख्या डोक्याभोवती फुलांची गोल वेणी घालून फिरत होत्या. येथे खाद्यपदार्थांची, खेळण्यांची बरीच दुकाने होती. एका दुकानात एक माणूस मोठ्या लाकडाच्या ठोकळ्यावर (हा झाडाचा मोठा बुंधा होता) लाकडाच्या मोठ्या हातोड्याने चिक्कीसारखा दिसणारा पदार्थ सपाट करत होता. त्याच्या वड्या करून ते विकत होते.आम्ही दोन प्रकारच्या वड्या घेतल्या. त्यांची चव बरीच वेगळी होती. नंतर आम्ही खाली मिंग नदीपर्यंत जाऊन परत व्हॅनमध्ये आलो.

मायकेल आम्हाला जिनली नावाच्या रस्त्यावर घेऊन गेला. हा चेंगडूमधील जुना रस्ता आहे पण आता येथे बाजार भरतो. खाद्य पदार्थांच्या व शोभेच्या वस्तूंच्या दुकानांनी हा भाग गजबजलेला असतो. वाहनांस परवानगी नसल्यामुळे पादचाऱ्यांचेच राज्य असते.

तेथून जेवण्यास गेलो व हॉटेलवर परतलो. दुसऱ्या दिवशी सकाळीच हॉटेल सोडायचे होते. दिवसभर फिरून रात्री तिबेटच्या रल्वेने तिबेटला जायचे होते. तिबेटला रेल्वेने जाण्याच्या दृष्टीने काही तयारी करायची होती. सर्व सामान आवरून झोपलो.

डु फू कॉटेजः

सुलभाच्या मते रेल्वेत नेण्याकरता आणखी फळे हवी होती. सकाळी उठल्यावर सुलभा, मी व अलका आणखी काही फळे घेऊन आलो. सर्व सामान घेऊन खाली मायकेलची वाट बघत थांबलो. मायकेल १० वाजता आला. सामान व्हॅनमध्ये भरून निघालो. पहिल्या प्रथम डु फू कॉटेज बघायला गेलो.

डु फू हा तांग राज घराण्याच्या काळात एक जगप्रसिद्ध कवी होऊन गेला. तो इ. स. ७५९ साली डु फू येथे राहण्यास आला. त्याने झोपडी बांधली व येथे तो चार वर्षे होता. ह्या चार वर्षात त्याने २४० कविता लिहिल्या. चीन सरकारने त्याच्या झोपडीचे वस्तु संग्रहालयात रुपांतर केले आहे. आजुबाजूला रमणीय उद्यानही आहे.

जगप्रसिद्ध कवी डु फू

डु फू कॉटेजच्या परिसरात

डु फू ची राहण्याची खोली, झोपण्याची खोली, स्वयंपाकघर बघितले.

डु फु कॉटेज

डु फु कॉटेज

बागेत मोठे तळे आहे. त्याच्या भोवती हा सर्व परिसर वसलेला आहे. तळ्यात कोइ प्रकारचे मासे आहेत. त्यांना खाणे दिले.

डु फु कॉटेज

वर्षाने माया (आमची नात) करता डु फू च्या कवितांचे एक पुस्तक विकत घेतले. डु फू कॉटेजच्या परिसरात एक चहाचे उपहारगृह आहे तेथे मायकेल आम्हाला घेऊन गेला.

आम्ही जास्मीन टी घेतला. त्याचा स्वाद व त्याची चवही छान होती.

डुज्यानयांग धरण,चीन्यान टॉवरः

नंतर आम्ही डुज्यानयांग धरण बघायला गेलो. मिनजान नदीवर हे धरण बांधलेले आहे. धरणाच्या पूर्वेला मोठा डोंगर आहे. त्या डोंगराच्या शिखराला चीन्यान टॉवर म्हणतात. तेथून डोंगर उतरून धरणाकडे जायला पायवाट आहे. आम्हाला चीन्यान टॉवर जवळ व्हॅनच्या ड्रायव्हरने सोडले. तेथून आम्ही चालत धरणाजवळ जाणार होतो.

चीन्यान टॉवर व डुज्यानयांग धरणाचा नकाशा

रस्ता सर्व उतरंडीचा आहे, बऱ्याच ठिकाणी पायऱ्या आहेत. टॉवर वरून धरणाचा व आजुबाजूचा विस्तीर्ण देखावा दिसतो. टॉवरवर सुरेख इमारत बांधली आहे.

चीन्यान टॉवरवरची इमारत

टॉवरवरून खालचे विहंगम दृष्य दिसत होते.

टॉवरवरून दिसणारे विहंगम दृष्य

टॉवरवरून दिसणारे विहंग

टॉवरवरून खाली येण्यास सुरुवात केली. रस्ता झाडीतून जात होता. पायऱ्या असल्यामुळे उतरायला कठीण वाटत नव्हते.



टॉवरवरून दिसणारे विहंगम दृष्य

चीन्यान टॉवर पासून धरणाकडे जाणारा रस्ता

चीन्यान टॉवर पासून धरणाकडे जाणारा रस्ता

बरेच खाली गेल्यावर एरवांग मंदीर लागले. डुज्यानयांग धरणाचा मुख्य अभियंता ली बींगच्या स्मरणार्थ हे मंदीर बांधले आहे. मंदीरातूनच खाली जाणारा रस्ता आहे. मंदीरातून बाहेर पडल्यावर एकदम खोल पायऱ्या आहेत.

एरवांग मंदिरातून बाहेर आल्यावर खोल पायऱ्या आहेत



पायऱ्याच्या पायथ्यावरून दिसणारे एरवांग मंदिर

डोंगर उतरून जेथे उतरण्याची वाट संपते तेथे बाहेर पडण्याकरता दरवाजा केलेला आहे.

ते 'हे क्षिआंडे' ह्यांचे स्मारक आहे.

'हे क्षिआंडे' ह्यांचे स्मारक

दरवाजातून बाहेर आल्यावर दिसणारे 'हे क्षिआंडे' ह्याचे स्मारक

स्मारकातून बाहेर पडल्यावर आम्ही धरणाजवळ आलो. इ. स. पूर्व २५६ मध्ये 'चीन' ह्या राज्याने हे धरण बांधले. मीन नदीला सतत पूर येत असे म्हणून नदीवर धरण बांधण्याचा विचार सुरू झाला. परंतु त्या काळात सैन्याला रसद पुरवण्याचे काम ही नदी करत असे. धरण बांधून सर्व पाणी अडवणे सोयीचे नव्हते. म्हणून नदीला बांध घालून पाणी वळवायचे व दुसरा कालवा काढून पुराच्या पाण्याने सिंचन करायचे अशी योजना ली बांग ह्याने तयार केली. त्याप्रमाणे नदीचे बाहेरची नदी व

बांबूच्या सालांनी केलेल्या टोपल्यान दगड भरून धरणाची भिंत तयार केली

आतली नदी असे दोन प्रवाह निर्माण झाले. ली बांग ह्यालाच मुख्य अभियंता म्हणून नेमले होते. त्या काळात कॉंक्रीटचा शोध लागलेला नव्हता. ली बांगने लांब बांबूच्या केळ्याच्या आकाराच्या टोपल्या केल्या व त्यात दगड भरून ते रचून त्याचा बांध तयार केला. त्या टोपल्यांना झुलॉंग म्हणतात. ४ वर्षात हे धरण बांधून तयार झाले. आजही हे धरण वापरात आहे. ह्या धरणामुळे तेथील जमीन सुपीक झाली व तेथे भरपूर पीक येऊ लागले.

पण त्यानंतर दर वर्षी धरण दुरूस्त करावे लागत असे. पुढे १८८४ साली सम्राटाच्या सिच्युएन नावाच्या राज्याचे राज्यपाल डींग बौझेन ह्याने नवी कल्पना काढली की सपाट दगड वापरून ते लोखंडाच्या तारेने गुंफून त्याची भिंत तयार करायची म्हणजे दर वर्षी धरण दुरुस्त करण्याची गरज नाही. तेंव्हा पासून धरण दुरुस्त करतांना ही पद्धत वापरली गेली.

आम्ही चालत पुलाजवळ आलो. नदीवर पलीकडे जाण्यास लाकडी पूल बांधलेला आहे. हा पूल लक्ष्मण झुलाची आठवण करून देतो. दोरीचे बांधकाम असल्यामुळे पूल झुलत असतो. हा पूल ओलांडून पलिकडे जायला निघालो. पूल सारखा झुलत असल्यामुळे चालतांना आम्ही पण झुलत होतो. लक्ष्मण झुल्यावर लहानपणी गेल्याचे आठवते. तेंव्हा तोल संभाळायला त्रास झाला नव्हता. पण आता ह्या वयात जरा जड जात होते.

मीन नदीवरचा लक्ष्मण झुला

मीन नदीवरचा लक्ष्मण झुला

पूल ओलांडून आल्यावर आम्ही विजयोत्सव साजरा केला

पूल ओलांडून पलिकडे आल्यावर आम्ही निश्वास टाकला. जेथे नदी दुभागली जाते तेथे आम्ही आलो होतो. तेथेच नदीवर बांधलेले धरण आहे. हे धरण बघून पुढे गेलो.

मीन नदीवर बांधलेले धरण

चालत आम्ही जेथे नदी दुभागली जाते त्या टोकाशी आलो. भारतात येथे केवढे तीर्थक्षेत्र झाले असते पण चीन मध्ये त्याला एक पर्यटक ठिकाण ह्या पेक्षा जास्त मान्यता मिळाली नाही.

येथे मीन नदी दुभागली जाते

धरणापासून हमरस्त्यापर्यंत बरेच चालावे लागते. वाटेत एक उद्यान आहे. तेथे कारंजे व फुलझाडे लावून ती बाग सुशोभित केली आहे. काही लाकडांवर कोरीवकाम केलेले पुतळे आहेत.



इुज्यानयांग धरणाच्या वाटेवरचे उद्यान

इुज्यानयांग धरणाच्या वाटेवरचे उद्यान

इुज्यानयांग धरणाच्या वाटेवरचे उद्यान

तीन देवियां

उद्यानात भेटलेला पांडा

तेथे काही पांडाचा पोषाख घातलेली मुले होती. पैसे घेऊन त्यांच्याबरोबर फोटो काढुन देत होते.

उद्यानात भेटलेला पांडा

हा चेंगडूमधील आमचा शेवटचा थांबा होता. आज रात्री आम्ही तिबेटला जाण्याऱ्या ट्रेनचा प्रवास सुरू करणार होतो. आता संध्याकाळचे ५ वाजले होते. ट्रेन ८ वाजून १५ मिनीटांनी सुटणार होती. बराच वेळ होता. तेथून आम्ही जेवण्यास जायला निघालो, मायकेलच्या म्हणण्याप्रमाणे जेवणाच्या ठिकाणी जाण्यास एक तास लागणार होता. पण रहदारीत अडकल्यामुळे जाण्यास दीड तास लागला. मायकेलने आम्हास ७ वाजून ४० मिनीटांनी जेवण करून तेथून निघू असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही वेळेत निघालो. पुढे विशेष रहदारी लागली नाही म्हणून स्टेशनवर वेळेत पोहोचलो.

हा चेंगडू मधील आमचा शेवटचा थांबा होता. आज रात्री आम्ही तिबेटला जाणाऱ्या ट्रेनचा प्रवास सुरु करणार होतो. आमच्या प्रवास योजने प्रमाणे आम्ही तिबेटला पांच दिवस राहून विमानाने परत चीनला म्हणजे शांघायला जाणार होतो आणि शांघायला आठवाडाभर राहून अमेरिकेला परत जाणार होतो.

शँघायः

आमचे विमान रात्री ९:२४ ला शँघायच्या विमानतळावर उतरले. सामान घेऊन बाहेर आलो. तेथे जॅक नावाचा गाईड आमची वाट बघत उभा होता. हॉटेलवर येण्यास रात्रीचे ११ वाजले. खोली ताब्यात घेऊन झोपायला १२ वाजले.

सुभाष दामले, ज्याच्यामुळे आमच्या सहलीस सुरुवात झाली तो येथे रहात असे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शँघायला येऊन गेले आणि त्यांनी "आम्ही मुंबईचे शँघाय करू" अशी घोषणा केली तेच हे शँघाय. आम्ही बरेच वर्षे येथे येण्याची संधी शोधत होतो शेवटी आज येथे येऊन पोहोचलो.

सुभाषच्या ओळखीचा एक ड्रायव्हर आम्हाला त्याच्या व्हॅन मधून शँघाय दाखवण्यास घेऊन जाणार होता. दुसरे दिवशी सकाळी १० वाजता तो येणार होता. म्हणून सकाळी थोडा आराम होता. ह्या हॉटेलमध्ये फक्त खालच्या लॉबीतच इंटरनेट उपलब्ध होते. खोलीत इंटरनेट उपलब्ध नव्हते.

दुसरे दिवशी सकाळी लवकर उठलो. सर्वात वरच्या मजल्यावर न्याहरीची व्यवस्था होती. आम्ही न्याहरी आटपून १० वाजता लॉबीत आलो. ठरल्या प्रमाणे १० वाजता ड्रायव्हर त्याची मिनी व्हॅन घेऊन आला. आधी अर्धा तास काय काय बघायचे त्याचा विचार झाला व साडे दहा वाजता आम्ही शँघाय बघण्यास निघालो. प्रथम आम्ही ओल्ड टाऊन बघण्यास जाणार होतो. ड्रायव्हर बरोबर व्हॅनमधून निघालो. शँघायच्या रस्त्यावरून व्हॅन जात होती. काल रात्री काळोखात शहर नीट दिसले नव्हते. आता उजेडात शहर दिसत होते. रूंद रस्ते, रस्त्याच्या दोन्ही बाजूला गगनचुंबी इमारती, उड्डाणपूल ह्यांनी शहर गजबजले होते. लोकसंख्या जास्त असून सुद्धा रस्त्यावर पादचारी जास्त दिसत नव्हते. व्हॅनमधून जमतील तसे फोटो घेत होतो.

रस्त्यावर केलेली एक रचना

शँघाय सिटी

शँघाय सिटी

तासाभरात आम्ही जुन्या टाऊनला पोहोचलो. येथे फिरण्यास ड्रायव्हरने आम्हाला २ तास दिले. आम्ही जेथे व्हॅनमधून उतरलो तो भाग बघून आम्हाला २ तास पण लागणार नाहीत अशी आमची भावना झाली.

शँघाय ओल्ड टाऊन

शँघाय ओल्ड टाऊन

पण पुढे चालत गेल्यावर एक नदी लागली. त्यावरचा पूल ओलांडून पलीकडे गेलो.

शँघाय ओल्ड टाऊन, नदीवरचा पूल

पूल उतरत असतांना चीनी खाद्य पदार्थांचे वास येत होते. पूल उतरल्यावर नदीच्या पलीकडे नदीला समांतर रस्ता आहे. त्या रस्त्यावर चीनी खाद्यपदार्थांची दुकाने होती. आम्ही त्या रस्त्यावर डावीकडे वळलो. सुरुवातीची खाद्यपदार्थांची दुकाने सोडून पुढे गेल्यावर हस्तउद्योगाची दुकाने लागली. विविध प्रकरच्या वस्तू तेथे विकायला होत्या. आता लक्षात आले की आम्हाला दोन तास का दिले.

तेथे आम्ही काही लाकडाच्या परड्या विकत घेतल्या. जवळच सिल्कचे दुकान होते. तेथे सुलभा व शशीने सिल्कची रजई घेतली. आम्ही पण ताईकरता एक रजई घेतली. पुढे गेल्यावर नदीला एक फाटा फुटतो त्यावर एक छोटा पूल होता. तो पूल ओलांडून पलीकडे गेलो. तेथे छोट्या गल्ल्यांची वस्ती होती. त्या वस्तीतून फेरफटका मारला.

खांडाच्या सुपारी पासून केलेले कंकण

छोट्या गल्ल्यांची वस्ती

छोटा नाला

ही घरे टुमदार होती. दारांवर व खिडक्यावर सुरेख नक्षिकाम केलेले होते. फिरता फिरता २ तास कसे गेले कळले नाही. परत व्हॅनमध्ये आलो.

ड्रायव्हरने पुढे आम्हाला फ्रेंच कनेक्शनमध्ये नेले. तेथे एक जुने शुज्याहुइ कॅथेड्रल नावाचे चर्च आहे. हे चर्च १९०६ मध्ये बांधलेले आहे. हया चर्चच्या आजुबाजूचा भाग उंच इमारतीनी भरलेला आहे.

शुज्याहुइ चर्च

शुज्याहुइ पार्क

चीनमधील पोस्टाची पेटी

शुज्याहुइ पार्क

येथून चालतच शेजारी असलेल्या शुज्याहुइ पार्क मध्ये गेलो. पार्क चांगले प्रशस्त होते. मध्ये एक तळे होते व त्यात दोन काळे राजहंस होते. बागेत एक पाण्याचा नाला सर्वत्र वाहात होता. त्यावरून वेगवेगळ्या लांबीचे पादचरी पूल होते.

शुज्याहुइ पार्क

शुज्याहुइ पार्क

शुज्याहुइ पार्क

शुज्याहुइ पार्क

पार्क फारच रम्य होते. तेथेच वेळ घालवावा असे वाटत होते. पण हॉटेलवर परत जाण्याआधी आणखी काही ठिकाणे बघायची होती. येथून आम्ही क्षिनटियांडी येथे गेलो. ड्रायव्हर म्हणाला की तुम्ही शँघायला आलात आणि येथे आला नाहीत असे सांगितलेत तर लोक तुम्हाला हसतील.

क्षिनटियांडी हा भाग म्हणजे संध्याकाळी मित्रांबरोबर, पत्नी बरोबर किंवा प्रेयसी बरोबर वेळ घालवण्याचे ठिकाण. येथे बरीच उच्च वस्तूंची दुकाने आहेत, बियरचे बार्स आहेत. तासाने येतो असे सांगून ड्रायव्हर आम्हाला येथे सोडून गेला. सर्व मंडळी उपहारगृहात बीअर प्यायला गेली. मी व वर्षा आजुबाजूला चक्कर टाकण्यास निघालो.

ह्या फोटोवरून त्या भागाची थोडी कल्पना यावी

तेथे समोरच्या रस्त्यावर एक दगडाचे शिल्प आहे.

क्षिनटियांडी भागातील दगडाचे शिल्प

क्षिनटियांडी भागातील आणखी एक दगडाचे शिल्प व कारंजे

बीयरची सलामी

पॅरिसला गेलो असता तेथेही असाच भाग होता त्याची वर्षाला आठवण झाली. काही दुकानात शिरून तेथल्या वस्तू पाहून आलो. तेथे असलेल्या एका फोटोच्या दुकानात गेलो. तेथे फार सुंदर फोटो विकायला होते.

येह दोस्ती हम नही तोडेंगे

बीयर थोडी जास्त झालेली दिसते

युयूआन गार्डन, ओल्ड टाऊनः

तासाभरात ड्रायव्हर परत आला व आम्हाला युयूआन गार्डनला घेऊन गेला. हा भागसुद्धा ओल्ड टाऊन म्हणून ओळखला जातो. येथे जुन्या चीनी पद्धतीच्या इमारती आहेत. आम्ही गेलो तेंव्हा युयूआन गार्डन बंद झाले होते. "युयूआन गार्डन" म्हणजे मींग राजसत्तेच्या काळात "पान युनडुआन" नावाच्या सरकारी अधिकाऱ्याने आपल्या आई वडिलांकरता बांधलेले घर व आजुबाजूचा बगिचा आहे. ह्या गार्डनच्या समोर एक चौक आहे व त्याच्या भोवती असणाऱ्या इमारती जुन्या चीनी पद्धतीच्या आहेत. हा सर्व भाग मिळून एक मोठा चौरस आहे.

युयूआन गार्डन च्या बाहेरील इमारती

युयूआन गार्डन च्या बाहेरील इमारती

युयूआन समोरील चौकातील इमारत

युयूआन समोरील चौकातील इमारत

युयूआन समोरील चौकातील इमारत

युयूआन गार्डन

ह्या सर्व भागात चिक्कार फेरीवाले होते. नाना प्रकारची दुकाने होती. शोभेच्या वस्तू, खाण्याच्या वस्तू, खेळणी इत्यादिची दुकाने होती. काही फेरीवाले पोर्टेबल स्केटस् विकत होते. ही छोटी चाके बुटाच्या टाचेला अडकवायची व ह्या चाकावरून स्केटींग सारखे फिरायचे. ही चाके एका छोट्या पिशवीत किंवा बॅकपॅकमध्ये राहू शकतात. बरीच घासाघीस करून आम्ही मिहीर व समीर करता दोन स्केटस् विकत घेतले.

सुलभाने तेवढयात घोटाळा करून ठेवला. तिला बाथरूमला जायचे म्हणून ती शेजारच्या मोठ्या दुकानात गेली. तेथे तिला वरच्या मजल्यावर जावे लागले. परत येतांना तेथे एक विक्रेता छोटे बॅटरीवर चालणारे प्लॅस्टिकच्या पिशव्या बंद (सील) करण्याचे मशीन विकत होता. सुलभाला ते मशीन अत्यंत आवडले व आम्हाला सर्वांना ते दाखवण्याकरता घेऊन गेली. तो विक्रेता आम्हाला प्रात्यक्षिक करून दाखवत होता. एका प्लॅस्टिकच्या पिशवीत पाणी भरून नंतर तो पिशवी मशीनने बंद करे. पिशवी उलटी केली तरी पाणी बाहेर पडत नव्हते. सर्वजण त्या मशीनवर भाळले व त्यांनी एक एक मशीनस् घेऊन टाकली. माझ्या कडे तसले मशीन असल्यामुळे मी त्यात सहभागी नव्हतो. त्याच्या शेजारी बॅग विकण्याचा भाग होता. मी तेथे बॅग बघत असता ही सर्व मंडळी प्लॅस्टिकच्या मशीनची खरेदी करून बॅगेच्या भागात आले. मग शशीराव पुढे झाले. त्यांनी केलेल्या प्रचंड घासाघीसीमुळे आम्ही ८ बॅगा खरेदी केल्या. म्हणजे सुलभा बाथरूमला जाण्याकरता आत गेली आणि आम्ही ४ प्लॅस्टिकच्या पिशव्या सील करण्याची मशीनस् व ८ बॅगा घेऊन बाहेर आलो. ड्रायव्हरच्या व्हॅनमध्ये बॅगा कशाबशा बसवून हॉटेलवर परत आलो.

दुसरे दिवशी सि. टी. एस. कंपनीच्या तर्फे हँगझाउला जायचे होते. गाईड सकाळी ६:५० ला आम्हाला ट्रेन स्टेशनवर सोडायला येणार होता. सकाळी लवकर उठून न्याहरी उरकून तयार व्हायचे होते.

रात्री बंडवर जायचे ठरले. बंड हा भाग हॉटेल पासून चालत १० मिनीटांच्या अंतरावर होते. बंड हे हांगपू नदीच्या काठावर आहे. नदीला लागून नदीला समांतर जाणारा झाँगशान नावाचा रस्ता आहे. नदीपासून रस्त्यापर्यंतच्या भागावर उंच काँक्रीटचा बंधारा घातला आहे. बंड हा भारतीय शब्द आहे. बंड म्हणजे बंद म्हणजेच बंधारा. हा बंधारा माझ्यामते ४० फूट रूंद व मैलभर तरी लांब असावा. येथे लोक फिरायला येतात. नदीच्या पलिकडे पुडाँग भाग आहे. ह्या सर्व भागाला मिळुन बंड म्हणतात. म्हणजे रस्ता व आजुबाजूच्या इमारती धरून हा बंड भाग आहे.

आम्ही चालत निघालो. वाटेत एक नाटकाचे थिएटर होते. तेथील सर्व कर्मचारी काळे कोट घालून काम करत होते. थिएटरमध्ये जाणाऱ्या लोकांची बरीच गर्दी होती. रस्त्यावरही वाहनांची रहदारी ठप्प होती. आम्ही थोडे पुढे गेल्यावर समोरून एक उंची पोषाख घातलेली स्त्री डौलात चालत येतांना दिसली. तिच्या चालण्यावरून ती कोणीतरी खास व्यक्ती असावी असा मला संशय आलाच होता आणि चारूने तिला ओळखले. जे थिएटर आम्ही ओलांडून आलो होतो तेथे "द लिटल ब्लॅक जॅकेट" नावाचा शो चालू होता. त्या शो मध्ये प्रमुख भुमिका करणारी ही नटी होती. रस्त्यावरची रहदारी हलत नव्हती व तिची गाडी रहदारीत अडकली होती. शेवटी जास्त उशीर होऊ नये म्हणून ती चालतच थिएटरकडे निघाली होती.

भिंतीवर असलेली नाटकाची जाहिरात

त्या नटीने भिंतीजवळ जाऊन अशी पोज दिली

सर्वांचे लक्ष तिने वेधून घेतले होते. तिलाही त्याची कल्पना होती. थिएटरच्या भिंती जवळ गेल्यावर तिने सर्वाना एक पोज दिली. माझा नेहमीचा कॅमेरा माझ्या जवळ नव्हता म्हणून आयफोनवर जसा आला तसा फोटो घेतला. ही नटी फारच निगर्वी वाटली. रस्त्यातून सर्वांना अभिवादन करत होती. फोटो काढण्याकरता पोज दिल्या, तिच्या बरोबर तिची कोणीही चमचे मंडळी नव्हती.

पुढे काही मिनिटातच आम्ही बंडला पोहोचलो. तो सर्व भाग दिव्यांच्या रोषणाइने उजळून निघाला होता.

बंडच्या भागातील इमारतींची दिव्यांची रोषणाई

बंड भागात फिरलो, नदीचे सौंदर्य बघितले, काळोखात दिसणाऱ्या दिव्यांची रोषणाई बघून पुनः झाँगशान रस्त्यावर आलो. बंडचा काँक्रीटचा फलाट रस्त्यापासून १० फूट उंचीवर आहे. त्या फलाटाखाली रस्त्याला लागून बरीच दुकाने आहेत. त्यातील बरीच उपहार गृहे आहेत. तेथेच सबवे सँडवीचचे उपहारगृह दिसले तेथे खाण्याचा विचार करून आम्ही आत गेलो. आम्ही गेलो तेंव्हा त्यांचे दुकान बंद होण्याची वेळ झाली होती. आम्ही त्यांचे शेवटचे गिऱ्हाईक होतो. आम्ही तेथे असतांना एक विचित्र घटना घडली. दुकान बंद होण्याची वेळ झाल्याने काही कर्मचारी आवराआवर करण्यास लागले. त्यातील एका कर्मचाऱ्याच्या हातून काप केलेल्या काकडीचे स्टीलचे भांडे पडले व ते काप बाजूला बसलेल्या गिऱ्हाइकांच्या टेबलावर व जमिनीवर सर्वत्र पसरले. गिऱ्हाइकांच्या अंगावर पडली की नाही ती कल्पना नाही. पण हा कर्मचारी इतका उद्धट की त्या गिऱ्हाइकांची माफी मागण्या

ऐवजी संतापून त्याने ते भांडे परत उचलून जोरात जमिनीवर परत आपटले. बिचारे ते गिऱ्हाइक घाबरून खाणे अर्धवट टाकून पळून गेले. तो कर्मचारी त्या सबवेचा मॅनेजर किंवा मालक असावा कारण बाकीच्या कर्मचाऱ्यांनी मुकाटपणे सर्व भाग काही तक्रार न करता स्वच्छ केला. आम्ही आमचे खाणे होइपर्यंत तेथेच बसून होतो. (अमेरिकेत परत आल्यावर सबवेच्या मुख्य कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांच्या कानावर ही गोष्ट घातली. त्याची दखल घेऊन शँघायच्या सबवेच्या कार्यालयातून दिलगिरी व्यक्त करणारे पत्र आले). नंतर आम्ही शेजारीच असलेल्या हेगन डाझ आइसक्रीमच्या दुकानात जाऊन आइसक्रीम खाऊन हॉटेलवर परत गेलो.

बंडच्या भागातील इमारतींची दिव्यांची रोषणाई

हँगझाऊः

ठरल्याप्रमाणे सकाळी लवकर उठून न्याहरी करून खाली लॉबीत आलो. आमचा गाईड आमची वाट बघत बसलेला होता. त्याने आम्हाला ट्रेन स्टेशनवर सोडले. जायला ४० मिनीटे लागली. आजचा आमचा दिवस सि. टी. एस. च्या सहलीच्या कार्यक्रमात अंतर्भूत होता त्यामुळे आज आम्हाला त्यांच्या तर्फे सर्व सेवा मिळणार होती. आमच्या गाईडने आम्हाला ट्रेनची दोन्ही वेळची तिकीटे दिली व तो निघून गेला. स्टेशनच्या सेक्युरिटी कक्षातून सर्व सोपस्कार करून आत गेलो व प्रतिक्षा गृहात जाऊन ट्रेन येण्याची वाट पहात बसलो. शँघायहून बाहेर जाण्याऱ्या ट्रेनचे हे स्टेशन होते. स्टेशन प्रचंड मोठे होते. आम्ही बसलो होतो त्या प्रतिक्षागृहाचे फलाटावर जाण्याचे दरवाजे बंद होते. त्यामुळे फलाटावर कोणी जाऊ शकले नाही. ट्रेन आल्यावर दरवाजे उघडले. आमच्या जागा ५ नं. च्या डब्यात राखीव होत्या. डबा छान आरामशीर होता. एका बाजूला दोन व दुसऱ्या बाजूला तीन आसने होती. मध्ये बरीच रूंद जागा होती. तीन आसनांच्या जागेत मी व वर्षा बसलो होतो. तिसऱ्या आसनावर शेवटपर्यंत कोणी आले नाही त्यामुळे आम्हाला आराम मिळाला. प्रवास सुखद आणि आल्हाददायक झाला. खिडकीतून बाहेरचे सौंदर्य बघता बघता प्रवास केंव्हा संपला ते कळले नाही. ट्रेन वेळेवर हँगझाऊला पोहोचली.

हँगझाऊ ट्रेन

आसने प्रशस्त होती व रेलून बसण्याची सोय होती. मुख्य म्हणजे राखीव डबा असल्यामुळे मध्ये उभे राहून प्रवास करणारी मंडळी नव्हती.

हँगझाऊ ट्रेन

आम्ही मैत्रिणी गप्पांच्या

हँगझाऊ ट्रेन मधून दिसणारे बाहेरचे दृष्य

हँगझाऊ स्टेशनच्या बाहेर पडलो तेथे लींगलींग नावाची गाइड आमच्या नावाची पाटी घेऊन उभी होती. तिने स्टेशनवरून वाट काढत आम्हाला बाहेर काढले. बाहेर त्यांची व्हॅन उभी होती. आमचा पहिला स्टॉप हुगांग पार्क होता. जातांना वाटेत लींगलींग हँगझाऊ हे नाव कसे पडले ते सांगत होती. हँग म्हणजे पाणी आणि झाऊ म्हणजे पाण्याच्या काठावर असणारे म्हणून शहराचे नाव हँगझाऊ झाले. झाऊने शेवट होणारी बरीच गावे चीनमध्ये आहेत.

लींगलींग ही एक चुणचुणीत विनोदी मुलगी होती. ती आणखी माहिती देत होती. १२ व्या शतकात मंगोलियाने चीनवर स्वारी केली व चीनच्या सम्राटाला कैद केले. तेव्हा सम्राटाच्या मुलाने चीन साम्राज्याचा अर्धा भाग मंगोलियाला देऊ केला. तेंव्हा चीनचे दोन तुकडे झाले. त्यावेळी हँगझाऊ चीनची राजधानी झाली. पण नंतर काही वर्षांनी मंगोलिया व चीन एकत्र झाले.

हँगझाऊच्या शेजारी फूझाऊ नावाचे गाव आहे. तेथील मुली सुंदर म्हणून प्रसिद्ध आहेत. बरेच श्रीमंत पुरूष हँगझाऊ येथे येतात व फूझाऊला मुली शोधायला जातात. आमचे बोलणे चालू होते तेवढ्यात हुगांग पार्क आले.

हुगांग पार्क ही एक रमणीय बाग आहे. येथे बऱ्याच प्रकारची निरनिराळी झाडे व त्यांच्या आकर्षक रचना आहेत.

हुगांग पार्क

हुगांग पार्क

हुगांग पार्क मध्ये भेटलेल्या मुली

तेथे काही मुली ट्रीपकरता आल्या होत्या. त्यांनी मी व वर्षाबरोबर त्यांचा फोटो काढून घेतला. आम्ही पण आमच्या कॅमेऱ्यावर त्यांचा फोटो काढला.

बागेत बरीच लहान मोठी तळे होती. ह्या बागेला लागूनच वेस्ट लेक नावाचे मोठे सरोवर आहे. त्या सरोवरात बोटीमधून फेरी मारली. ह्या सरोवरात एक बेट आहे त्याचा आकार दोन्हीकडे सारखा आहे. चीनच्या चलनी नोटेवर ह्या बेटाचे चित्र आहे.

चीनच्या नोटेवर ह्या बेटाचे चित्र आहे

बोटीची सफर झाल्यावर प्रथम भोजन झाले. भोजन झाल्यावर सहा सुसंवादाचा पॅगोडा बघायला गेलो. ह्या पॅगोड्याला चीनमध्ये लिउहे पॅगोडा म्हणतात. इ. स. ९७० साली हा पॅगोडा बांधला. चिंटांग नदीच्या काठावर बांधलेला हा पॅगोडा बुद्धाच्या शिकवणीच्या सहा तत्वांवर आधारून बांधलेला आहे म्हणून ह्याला सहा सुसंवादाचा पॅगोडा असे म्हणतात. पुर्वी पॅगोडा दिपस्तंभ म्हणून वापरत. येथे कोनाड्यात दिवे लावण्याची सोय आहे. पॅगोडाच्यासमोरून नदीचे फार मनोहर दृष्य दिसते.

पॅगोड्या समोरून दिसणारा नदीचा देखावा

सहा सुसंवादाच्या पॅगोडा समोर फोटोन लीशलीश दिसत आहे

सहा सुसंवादाच्या पॅगोड्याच्या पायथ्याशी

बुद्ध मंदिरा बाहेर असलेली मुर्ती

पॅगोड्यामध्ये दुरुस्तीचे काम चालू होते म्हणून आंत जाता आले नाही. शेजारीच बुद्ध मंदीर आहे तेथे गेलो.

ह्या मंदीरात शिसवी लाकडापासून केलेली बुद्धाची मूर्ती आहे.

शिसवी लाकडाची बुद्धाची मुर्ती

बुद्ध मंदीर बघून चहाच्या मळ्यात गेलो. तेथे चहाची बरीच लागवड केलेली दिसली. लींगलींग आम्हाला चहाच्या झाडा बद्दल माहिती सांगत होती. झाडाची फक्त तीनच कोवळी पाने काढायची असतात. पुर्वी ती पाने फक्त सम्राट व त्यांच्या नातेवाइकांना ग्रीन टी करण्याकरता वापरत असत. ह्या पानांची किंमत जास्त असल्यामुळे हल्ली समाजातील उच्चभ्रू वर्ग कींवा ज्यांना किंमत परवडते तो समाज ही पाने वापरतो. नंतरची कोवळी पाने बाकीच्या समाजाला ग्रीन टी करता विकली जातात व खालची जून झालेली पाने लिप्टन चहा कंपनीला विकली जातात.

नंतर काळा चहा कसा तयार करतात ते दाखवले. नंतर ग्रीन टी वर आमचे बौद्धिक घेतले. ग्रीन टी कसा उकळावा. कसा प्यावा, त्याचे गुणधर्म काय, त्याने कोण कोणते रोग बरे होतात, कोणत्या रोगांना प्रतिबंध होतो इत्यादी माहिती दिली आणि मग चहा विकण्यास सुरुवात केली. आम्ही सर्वानी चहाचे पॅकेज विकत घेतले.

जशी काही एवढी कापा कापी पुरेशी झाली नाही म्हणून आम्हाला सिल्क फॅक्टरी दाखवायला नेले. आधी सिल्क कसे तयार करतात ते सांगितले व मग अर्थात त्यांच्या दुकानात नेले. आम्हाला पुनः वजनाचा प्रश्न होता. आम्ही येतांना जपानमार्गे आलो होतो. जपान मार्गावर प्रत्येकी दोन बॅगांना परवानगी होती. पण जातांना शँघाय वरून जाणार होतो. शँघाय मार्गावर माणशी फक्त एकाच बॅगेला परवानगी होती. मी त्यांच्याशी वाद घालत होतो की एकाच तिकीटावर आम्ही जपान – चीन प्रवास करत आहोत म्हणजे सुरुवातीपासून शेवटपर्यंत आम्हास एकच कायदा लागू केला पाहिजे. पण मी ज्याच्याशी बोलत होतो त्यांचे ज्ञान तुटपुंजे होते म्हणजे ही मंडळी कम्प्यूटरच्या स्क्रीनवर येणारी माहिती वाचून दाखवणारे कारकून होते. जास्त खोलात जाऊन माहिती काढून मला देण्याची तसदी घेण्याची त्यांना गरज वाटली नाही. मी बरेच वेळा फोन करून काही फरक पडला नाही. त्यामुळे सिल्कची रजई घ्यावी की नाही हा प्रश्न मला सोडवता आला नाही. शेवटी शँघायला गेल्यावर पुनः एकदा एअर लाइनला फोन करून जर दोन बॅगा

न्यायची परवानगी मिळाली तर शँघायला रजयांची खरेदी करू असे ठरवले व हँगझाऊला रजया घेतल्या नाहीत. सुलभाने, शशीने व खोपकरांनी खरेदी केली.

सहा वाजता लींगलींगने आम्हाला ट्रेन स्टेशनवर आणून सोडले. निघण्यापूर्वी तिने सर्व स्त्रियांना एक गुपित सांगितले की किपू रोडवर शॉपिंग करायला जा तेथे तुम्हाला भरपूर शॉपींग करता येईल. ७ वाजताची आमची ट्रेन ८ वाजता शँघायला आली. स्टेशनवर जॅक (गाईड) आला होता. त्याने आम्हाला हॉटेलवर सोडले.

हॉटेलवर आल्यावर आधी किपू रोड कोठे आहे त्याची चौकशी केली. तेंव्हा कळले की तो रस्ता हॉटेल पासून चालत फक्त १० मिनीटे एवढ्या जवळ होता. आमच्या हॉटेलचे स्थान फारच चांगले होते. उत्तरेला १० मिनीटे चालण्याच्या अंतरावर बंड, पश्चिमेला १० मिनीटे चालण्याच्या अंतरावर किपू रोड व पूर्वेला १० मिनीटे चालण्याच्या अंतरावर नानजींग रोड.

दमलो असल्यामुळे रात्री लवकर झोपलो. दुसरे दिवशी आमचे आम्हीच फिरणार होतो कारण सहल कंपनीने काही कार्यक्रम ठेवला नव्हता. सकाळी किपू रोडवर व रात्री नानजींग रोडवर जाण्याचे ठरले.

किपू रोडः सकाळी ८।। वाजता न्याहरीला सर्वजण भेटलो. काय काय शॉपिंग करायचे व कोठे करायचे ते ठरवले. किपू रोडवर नाही मिळाले तर फेक मार्केटमध्ये जाण्याचे ठरले व त्याप्रमाणे आधी किपू रोडवर गेलो.

किपू रोडवर आलो. ही तर शॉपींगची पंढरी होती. तो रस्ता व आजुबाजूचा जवळ जवळ मैलभराचा भाग सर्व दुकाने व मॉलने गजबजलेला होता. मी तर वेडाच झालो. सर्व प्रकारची दुकाने तेथे होती. आम्ही तेथे फिरत असता एकजण आमच्या जवळ आला आणि त्याने आम्हाला विचारले की तुम्हाला फेक माल बघायचा आहे का? आम्ही हो सांगितल्यावर तो आम्हाला एका १ ल्या मजल्यावरच्या दुकानात घेऊन गेला. तेथे बरेच

नेमब्रँडचे सामान अर्ध्या किमतीत होते. आम्ही काही नायके व रॅाल्फ लोरेन कंपन्यांचे टी शर्ट घेतले. खरेदी करून हॅाटेलवर परत आलो. खोलीत आराम करून परत ७ वाजता नानजींग रोडवर जाण्यास निघालो. समोरच्या एका गल्लीतून रस्ता जात होता. १० मिनीटात नानजींग रोडवर पोचलो.

नानजींग रोड

नानजींग रोडः ह्या रस्त्यावर कायम दिवाळी असते. रस्त्यावर वाहनांना परवानगी नाही. तेथे काही ट्रामसारख्या शटल बसेस फेऱ्या मारत होत्या. त्या शिवाय दुसरे वाहन नव्हते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला सर्व मोठ्या कंपन्यांची दुकाने होती. रस्त्यावर व दुकानांवर दिव्यांची रोषणाई केलेली होती.

नानजींग रोड

नानजींग रोड

ह्या भागात रात्रीच यावे. रात्रीच ह्याची शोभा जास्त खुलून दिसते. आम्ही रस्त्याच्या टोकापर्यंत चालत गेलो व उलटे फिरून बंडपर्यंत गेलो. पुनः बंडवर फिरलो. आम्ही नदीच्या ज्या बाजूला होतो तो शँघायचा जुना भाग व नदीच्या पलिकडे असेलेला भाग नवीन आहे. नवीन भागातील इमारती १९८० नंतर बांधण्यास सुरुवात केली आहे. अजून नवीन इमारती बांधण्याचे काम चालू आहे. सध्या फायनॅनशियल वर्ल्ड नावाची इमारत बांधत आहेत. ही टॉवर सारखी इमारत बांधून पूर्ण झाल्यावर ८०० मीटर उंच असेल. सध्या असलेल्या इमारतीत ही इमारत सर्वात उंच असेल. येथे थोडा वेळ बघून परत हेगन डाझमध्ये आइस क्रीम खाल्ले व हॉटेलवर परत आलो. दुसरे दिवशी सि. टी. एस. चा गाइड आम्हाला शँघाय दाखवायला घेऊन जाणार होता.

शँघाय सहल कंपनी बरोबरचा दिवसः

सकाळी नाश्ता करून तयार झालो. गाईड सकाळी ९॥ वाजता आला. खोपकर दांपत्य आमच्या बरोबर आले नाही. त्यांचे संध्याकाळी ४ वाजता ऑस्ट्रेलियाला परत जाणारे विमान होते म्हणून त्यांनी जवळच्या भागात फिरणे पसंत केले.

बंडः

जॅकने आमला प्रथम बंडवर नेले. दिवसा उजेडी बंडवर आम्ही प्रथमच जात होतो. दिवसाच्या उजेडात तेथले सौंदर्य वेगळेच दिसत होते. हवा गरम, दमट, कुंद व ढगाळ होती.

बंड

बंड

आजूबाजूची माहिती देतांना जॅक

बंड, नदीच्या पलिकडच्या दिसणाऱ्या इमारती
ओरिएंटल टि व्ही टॉवर

बंड, नदीच्या पलिकडच्या दिसणाऱ्या इमारती
वर्ल्ड फायनांशियल सेंटर
शँघाय टॉवर

बंड, नदीच्या पलिकडच्या दिसणाऱ्या इमारती

झॉगशॉन रोडवरच्या इमारती

नदीकाठी बांधलेल्या वाटेवरून खाली उतरलो, तेथे एक मोठा बैलाचा पुतळा आहे. त्याला बंड बुल म्हणतात. हा बुल न्युयॉर्क स्टॉक एक्स्चेंजसारखा आहे.

झॉगशॉन रस्त्यावर असलेला बंड बूल

जेड बुद्ध मंदीरः

पुढे आम्ही जेड बुद्ध मंदीरात गेलो. येथे ब्रम्हदेशातून आणलेल्या बुद्धाच्या दोन मूर्ती आहेत. त्या जेडपासून बनवलेल्या आहेत. चीनचा बौद्ध मठाधिपती हुइ जेन ब्रम्हदेशात गेला असता तेथे स्थाईक झालेल्या एका धनिक चीनी गृहस्थाने त्याला ५ बुद्धाच्या मूर्ती दान केल्या. त्यातील दोन मूर्ती समुद्र मार्गे शँघाय येथे आणून १८८२ साली मंदीर बांधून त्या मूर्तींची येथे स्थापना केली गेली.

जेड बुद्ध मंदिर

येथे बुद्धाची चार रुपे दाखवली आहेत. हिंदू धर्मात जसे नीरनिराळे देव आहेत व जशी त्यांची कार्ये वेगवेगळी आहेत. जसे लक्ष्मी ही धनाची देवता आहे, सरस्वती ही विद्येची देवता आहे, मारुती हा शक्तीचा देव आहे त्याचप्रमाणे बौद्ध धर्मात बुद्ध हाच ही सर्व कार्ये करतो. त्याची ही रुपे येथे दाखवली आहेत.

आधी आम्ही खालच्या भागात गेलो. तेथे बरेच पुतळे आहेत.

जेड बुद्धाच्या मंदिरातील पुतळे

जेड मंदिरातील लाकडावरचे नक्षिकाम

जेड बुद्धाच्या मंदिरातील पुतळे

जेड बुद्धाच्या मंदिरातील पुतळे

खालचे मंदीर बघून आम्ही वरच्या मजल्यावर गेलो. तेथे बुद्धाची जेडची बसलेली मूर्ती होती.

नंतरच्या दालनात बुद्धाची पहुडलेल्या व उजव्या हातावर डोके ठेवलेल्या अवस्थेतील मूर्ती आहे. जो जेडचा पुतळा आहे तो लहान आहे व दुसरा संगमरवराचा पुतळा आहे तो मोठा आहे.

बुद्धाची जेडची बसलेली मुर्ती

पहुडलेल्या अवस्थेतील संगमरवरी पुतळा

ह्या इमारतींच्या मध्ये एक चौक आहे. तेथे बऱ्याच दगडाच्या कोरीव काम केलेल्या वस्तू आहेत.

दगडा पासुन केलेल्या वस्तू

येथे आम्ही काही उदबत्तीचे पुडे विकत घेतले. भारताच्या माजी राष्ट्रपती श्री. प्रतिभाताई पाटील ह्यांनी ह्या मंदीराला भेट दिली होती त्यावेळचा फोटो येथे दिसला.

भारताच्या माजी राष्ट्रपती श्री. प्रतिभाताई पाटील ह्यांनी ह्या मंदिराला भेट दिली होती

हे मंदीर बघून झाल्यावर युयूआन गार्डन बघायला गेलो.

युयूआन गार्डनः

युयूआन गार्डन म्हणजे मींग राजसत्तेच्या काळात पान युनडुआन नावाच्या सरकारी अधिकाऱ्याने आपल्या आई वडिलांकरता बांधलेले घर व आजुबाजूचा बगिचा आहे. हे घर म्हणजे बऱ्याच इमारतींचा समूह आहे.

चीनी वास्तूशास्त्रामध्ये बऱ्याच श्रद्धा आहेत. त्या सर्व येथे आणण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे पुष्कळ पाणी असेल तर पुष्कळ पैसा येतो. म्हणून येथे भरपूर पाणी आहे. पाण्याचा धबधबा पैशांची भरपूर उलाढाल करणारा म्हणून तो येथे आहे, मासे सुदैवी असतात ते येथे आहेत. निरनिराळे भाग भिंतींनी विभागले आहेत. ह्या भिंती ओलांडून जाण्याकरता भिंतीत दरवाजे वजा भगदाडे आहेत. त्यांना वेगवेगळे आकार दिले आहेत. एकास एक लागून असलेल्या भगदाडांना सारखेच आकार आहेत. त्यामुळे ती भगदाडे एकात एक असल्या सारखी दिसतात.

समोरा समोर असणारी भगदाडे

ह्या भगदाडांना वेगवेगळे आकार दिले आहेत. काही रांजणाच्या आकाराचे आहेत तर काही चौकोनी

आहेत तर काही वर्तुळाकृती आहेत. वर्तुळ हे शुभ मानतात. पाण्यात कासवे, दगडांचे ड्रॅगनस् इत्यादी बरेच प्रकार आहेत. बहुतेक इमारतीत नैसर्गिकरित्या हवा खेळती राहील अशी व्यवस्था आहे.

ह्या महालांच्या जंजाळातून बाहेर आलो व शॉपिंगच्या भागात शिरलो. तेथे आम्हाला २ तास खरेदी करण्याकरता दिले व आमचा गाईड निघून गेला. थोडी खरेदी करून निघालो. ३॥ वाजता हॉटेलवर परत आलो. खोपकर मंडळी तयार होती. आम्ही त्यांना बाय बाय केले व गाईड त्यांना घेऊन विमान तळावर गेला.

संध्याकाळी मी व शशी पुनः किपू रोडवर खरेदी करण्या करता गेलो, पण बहुतेक दुकाने बंद झाली होती. दुसरे दिवशी आम्ही अमेरिकेत परत येण्यास निघणार होतो. इंटरनेटवरून आमचे बोर्डिंग पास घेतले. त्यावरून आम्हास माणशी दोन बॅगा नेण्यास परवानगी होती असे समजले. पण आता उशीर झाला होता. आधी समजले असते तर रेशमी रजया घेता आल्या असत्या. कदाचित शेवटपर्यंत आम्हाला किती बॅगा नेता येतील ते न कळविण्याचे विमान कंपनीचे धोरण असावे. रात्रीच सर्व सामान आवरून ठेवले. माणशी दोन म्हणजे एकंदर चार बॅगा होत्या. त्यामुळे बॅगेत सामान भरण्याकरता झटापट करावी लागली नाही.

शेवटचा दिवस व परतीचा प्रवासः

आज शँघायमधला शेवटचा दिवस होता. अर्धा दिवसच होता कारण दुपारी १२:५० वाजता आमचा गाईड आम्हाला विमानतळावर सोडण्यास येणार होता. मी व वर्षा सकाळी नानजींग रोडवर खरेदी करण्यास गेलो. वर्षाला बूट घ्यायचे होते. बूट मिळाले नाहीत पण थोडी खरेदी करून ११ वाजता हॉटेलवर परत आलो. १२ वाजता खोली रिकामी करून त्यांच्या ताब्यात दिली व गाईडची वाट बघत थांबलो.

१२:५० ला वेगळाच गाईड आला व तो बरोबर छोटी मिनी व्हॅन घेऊन आला. आमचे ११ नग व ६ माणसे कशी बसणार हा प्रश्नच होता. शेवटी कसे बसे सामान व माणसे भरून १ वाजता विमानतळावर जायला निघालो. वाटेत ५ मिनीटां करता 'युयूआन गार्डन' येथे थांबायचे होते. आदल्या दिवशी आम्ही खरेदी केलेल्या वस्तू दुकानातच विसरलो होतो. ती आणण्याकरता जावे लागणार होते. त्याप्रमाणे वस्तू मिळाल्या त्या घेऊन २। वाजता विमानतळावर पोहोचलो.

झटपट गाडीत सामान घालून डेल्टाच्या काऊंटरवर गेलो. तेथे बरीच मोठी लाईन होती. सुलभा पुढे गेली होती. तिने येऊन सांगितले की बॅगा ड्रॉप करायला वेगळी लाईन आहे. मी आत जाऊन त्या लाईनमध्ये जाऊन उभे राहीलो. तेथेच बाजूला त्यांचा कम्प्यूटर होता. त्यावर मी आमचे बोर्डींग पास प्रिंट केले व बॅगा त्यांच्या ताब्यात दिल्या. तेथे अशी पद्धत आहे की बॅगा सेक्युरिटीतर्फे पास झाल्या खेरीज बोर्डींग पास मिळत नाही. म्हणून आम्ही सेक्युरिटीच्या खोलीत गेलो. तेथे त्यांनी मला कॅमेऱ्याच्या बॅटऱ्या काढून घेण्यास सांगितले. त्या काढल्यावर बॅगा पुढे गेल्या व मी बाकी सर्वजण उभे होते तेथे आलो. सुलभा व शशीला बाय करून इमिग्रेशन विभागात गेलो. आमची पुढची काम पटापट झाली व आम्ही डी ६७ नंबरच्या गेटवर आलो. ३:५० ला विमानाचे बोर्डींग सुरू झाले.४:५८ ला विमानाने धावपट्टी सोडली व आम्ही परतीच्या वाटेला लागलो.

"सि. टी. एस." ने आखलेला आमचा प्रवास मार्ग. (आयटिनेररी) ह्या लेखाच्या शेवटी दिलेली आहे.

June 1, Sat. ARRIVE/NARITA – TOKYO

<Mr. & Mrs. Shashidhar Dandekar>

6:15 a.m. Arrive at Narita Airport Terminal 2 by **QF021** from Sydney.
After clearing immigration and customs, you will be met by our representative, "Airport Terminal Service" 090-9239-6479.

<Mr. & Mrs. Vasant Dandekar>

Arrive at Narita Airport Terminal 1 by ¬295 at 4:25 p.m. on May 31 and stay in Narita on your own. Kin¬y meet the party at the arrival lobby of Narita Airport Terminal 2 on June 1.

<Party of four persons>

You will be assisted to pick-up Airport Limousine Bus for Keio Plaza Hotel leaving at 7:00 a.m. or 7:40 p.m. (bus tickets included). Upon arrival, kin¬y check-in the hotel on your own (check-in time: 2:00 p.m.). You can leave the baggage at the hotel.
Accommodation for two nights at Keio Plaza Hotel.
2-2-1 Nishi-shinjuku, Shinjuku-ku, Tokyo 160-8330
Tel. 03-3344-0111 / Fax. 03-3345-8269

June 2, Sun. TOKYO

8:00 a.m. Kin¬y be ready at the lobyy of your hotel.
8:10 a.m. Check-in for Tokyo Morning Tour (Sunrise Tours, 03-5796-5454) visiting:
- Tokyo Tower observation deck
- Imperial Palace Plaza
- Asakusa Kannon Temple and Nakamise shopping arcade

Drive through Ueno and make a brief stop at Akihabara.
The tour will disband upon arrival at Tokyo Station.
Afternoon: Free at leisure.

June 3, Mon. TOKYO – MT. FUJI – HAKONE

Kin¬y leave your suitcases at the bell desk. They will be collected by KTC's regular truck (03-3965-2381) and transferred to your hotel in Kyoto separately. Kin¬y bring overnight bag to Hakone.

8:10 a.m. Kin¬y be ready at the lobby of your hotel.

8:20 a.m. Check-in for 1-Day Mt. Fuji & Hakone Tour (Japan Gray Line, 03-5275-6525) without lunch including:

- 5th station of Mt. Fuji
- Hakone Sky Gondola
- Owakudani Valley
- Pirate boat cruise on Lake Ashi

Off the tour at Hakonemachi. Taxi transfer to your hotel is included.

Accommodation for one night at Hakone Hotel.

65 Hakone, Hakone-machi, Ashigarashimogun, Kanagawa 250-0521 Tel. 0460-83-6311 / Fax. 0460-83-6314

June 4, Tue. HAKONE – ODAWRA – KYOTO – NARA – KYOTO **(Breakfast)**

Breakfast at the hotel.

8:45 a.m. Driver of Izu-Hakone Kotsu (055-984-1502) to meet and transfer by private car to Odawara Station.

10:08 a.m. Leave Odawara for Kyoto by bullet train **"Hikari 507"**.

(Car No. 11, Seat No. 10DE, 11DE)

12:14 p.m. Upon arrival at Kyoto, escort (Ms. Masumi Matsumoto, 080-5340-9800) to meet at the platform and transfer on foot to your hotel to leave your bag. (Check-in time is 2:00 p.m.)

1:30 p.m. Kin¬y ready at the lobby of your hotel.

1:40 p.m. Check-in for Nara Afternoon Tour (Sunrise Tours, 075-341-1413) visiting:

- Todaiji Temple with great Buddha
- Nara (Deer) Park
- Kasuga Shrine

Upon return to the hotel, kin¬y check-in the hotel on own and pick-up your checked baggage.

Accommodation for two nights at New Miyako Hotel.

17 Nishi-kujoinmachi, Minami-ku, Kyoto 601-8412
Tel. 075-661-7111 / Fax. 075-662-3235

June 5, Wed. KYOTO **(Lunch)**

8:45 a.m. Check-in for Kyoto 1-Day Tour (Sunrise Tours, 075-341-1413) including:

- Kiyomizu Temple Nijo Castle
- Golden Pavilion (Kinkakuji Temple)

- Kyoto Imperial Palace
- Western style buffet lunch
- Heian Jingu Shrine
- Sanjusangendo Hall

June 6, Thu. KYOTO – OSAKA/DEPART

6:00 a.m. Escort, Ms. Masumi Matsumoto to meet and transfer on foot to Kyoto Station Bus Depo (bus tickets included).

6:40 a.m. Leave Kyoto for Kansai Airport by Airport Limousine Bus (90 min.). Upon arrival at the airport (Terminal 1), kin¬y check-in the flight on your own.

Leave Japan for Beijing.

07 June Arrive in Beijing, meet & transfer to **Jianguo Garden Hotel** (4*) or similar for **3 nights**.
08 June Visit to Tian'anmen, Forbidden City, Old Beijing Hutong (B/L)
09 June Visit to Juyongguan Great Wall, Temple of Heaven, Peking Duck Dinner (B/L/D)
10 June Transfer to the airport, fly to Xi'an, upon arrival, visit to Wild Goose Pagoda, City Wall, Grand Mosque, check in at **Grand New World HOtel**(4*) or similar for 2 nights (B/L)
11 June Visit to Terra-Cotta Warriors, Art Ceramic & Lacquer Ware Factory, Banpo Museum, Huqqing Hot Springs (B/L)
12 June Transfer to the airport, fly to Chengdu, upon arrival, visit Local Tea House, Jinli Street, Duifu Cottage check in at **Sunshine Hotel** (4*) or similar for **2 nights** (B/L)
13 June Visit to Panda Research Institute, Huanglongxi Ancient Town (B/L)
14 June Visit to Dujiangyan Ancient Dam Project, Jisha Museum,transfer tp the railway station, take train T22/T23 (2055/1635+2) to Lhasa, overnight on the train (B/L/D)
15 June On the train
16 June Arrive in Lhasa at 1540, upon arrival, meet & transfer to Tibetan Hotel(4*) for 3 nights (D)
17 June Visit Potala Palace, Jokhang Temple and Bakhor Market.(B/L/D)
18 June Visit Norbulinka Park, Sera Monastery, Drepung Monastery (B/L/D)
19 June Transfer to the airport, fly to Shanghai, on arrival meet & visit to the Bund, Nanjing Road, Yu Garden, Jade Buddha Temple, transfer to the Bund Riverside hotel Shanghai (4*) for 3 nights, (B/L)

20 June Transfer to railway station, take train no. G7361 (0755/0925) to Hangzhou, upon arrival, visit to West Lake, Six Harmony Pagoda, Tea Plantation, transfer to the railway station, take train no. G7326 (1900/2004) back to Shanghai.. (B/L)
21 June Transfer to railway station, take train no. G7042 (0825/0858) to Suzhou, upon arrival, visit to the Garden of Fish Net Master, Silk Spinning Mill, the Grand Canal, the Silk Embroidery Institute, transfer to the railway station, take train no. G7243 (1800/1831) back to Shanghai.. (B/L)
22 June Free till transfer to the airport for departure (B)
23 June Free day in Shanghai
24 June free day in shanghai
25 June free day in Shanghai
26 June depart to airport to leave China



हा राजकीय नकाशा नाही त्यामुळे राष्ट्रांच्या सीमा दाखवण्यात चूक होण्याचा संभव आहे

जपान

आमचा जपानमधील प्रवासाचा मार्ग



आमचा चीनमधील प्रवास मार्ग

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं…

…आणि स्वत:ही लिहायला हवं.

www.esahity.com

esahity@gmail.com